# माणूस

शनिवार
४ ऑगस्ट १९७९
पंचाहत्तर पैसे




एक अनिश्चितता
संपलेली असते.
भविष्य यापेक्षाही
अस्थिर असतं,
अंधारमय असतं.
आज लाल किल्लाही
अवाक झालेला असतो...

झंझावातानंतर चक्रावून
गेलेली दिल्ली
खास वार्तापत्र ( पृष्ठ ...७ )

# ॥ २६ जुलै १९७९ ची कविता ॥

प्रिय देशा,
तू
आणि तुझा तस्साच नागरिक
मी
दोघेही असे असहायपणे
का बसलो आहोत ?
का बघत आहोत ?
देशा,
हल्ली हल्ली अंधाराने आपल्याला
का ग्रासले आहे ?
अगदी पांढऱ्या–शुभ्र टोप्यांमधूनही
अंधारच का झिरपतो आहे ?

ज्यांच्यापासून तुला वाचवले
त्यांच्या नंग्या नाचात
ज्यांनी वाचवले
तेही कसे सामील झालेत
हिरवी फडकी फडकवत ?

आणि सर्वच असे एकदम डावे कसे झाले ?
डावे तर बोलूनचालूनच डावे,
आणि आता तर–
डाव खेळणारेही डावे
उजव्यांशी भांडलेले किंवा उजव्यांनी
डावललेले
उजवेही डावे,
घड्याळाचे काटे उलटे फिरवणारेही
डाव्यांच्या कळपात डावेच !
तात्पर्य:
हे देशा,
ढुंगण धुण्यापुरतेच डावे असणारेही
आज हातोहात डावे आहेत !

देशा,
डाव्यांना जात कशी असते ?
डाव्यांना धर्म कसा असतो?
पुराणकथा त्यांच्या तोंडी कशा असतात ?
डाव्यांना बुवा–बाबाही कसे असतात ?
खरे तर देशा,
या नव–डाव्यांना कशाचीही लाज नसते
त्यांना फक्त खुर्चीचीच खाज असते
म्हणून ते हातोहात होतात डावे
मूळ डावेही त्यांना बिनदिक्कत म्हणतात डावे
आणि तुझ्या खरजेवर म्हणे हे सारे
चोपडणार असतात
खास आयुर्वेदिक डावे मलम !

प्रिय देशा, तू,
तुझ्यासाठी अंधारातून प्रकाश आणणारा तो;
त्याच्या स्वप्नातली ती संपूर्ण क्रांती,
आणि तुम्हा तिघांचा सामान्य भाविक मी–
आपण सारेच कसे रुग्णशय्येवर पडलो
आहोत !
आणि आपली नावे घेऊन
आपली दोंदे भरणारे ते मलमवाले
डाव्या कुशीवर कसे सुखात लवंडले आहेत !

ज्यांच्या हाती आम्ही तुझे-आमचे भवितव्य
देत आलो
आणि आमच्या स्वप्नांचे मंगल कलश
सुपूर्द करत गेलो
ज्यांना आम्ही आमचे अश्रू दिले, घाम दिला,
रक्तही दिले
ते सर्वच–
डावे, उजवे,
मधले
असे चोर कसे निपजतात ?
खुर्चीनामक कोणा मोहिनीवर
हे सर्वच लंपट
लाइनी कसे मारतात ?
ती रांडही
आळीपाळीने त्यांच्याखाली कशी जाते ?
आणि तरीही कंड जिरत नाही म्हणून का
ते सगळे
आमच्या आशा–आकांक्षांवर बलात्कार
करतात ?
आणि वर सांगतात–
" बलात्कार अपरिहार्य असतो
तेव्हा निदान तो एंजॉय करावा ! " ?

प्रिय देशा,
तुझ्या सर्वच क्षेत्रांतील ही विलक्षण सड
केव्हा झडणार ?
तुझ्या सनातन सहनशील देहाला
नवे कणखर हात केव्हा फुटणार ?
त्या हातांनी तू
बुरखे केव्हा फाडणार,
भिंती केव्हा पाडणार,
आमची अनाथ स्वप्ने
साकार केव्हा करणार ?
देशा, तुझ्या मनात आग कधी रे भडकणार ?
तुझे डोळे अंधार निपटणारे सूर्य कधी
होणार ?
तुझे हे डगमगते पाय खंबीरपणे उभे
केव्हा राहणार ?
आणि देशा, मुख्य म्हणजे तुझ्या पाठीला
कणा केव्हा येणार ?
हे देशा. . .
प्रिय देशा. . .

–राजा दीक्षित


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : दहावा
४ ऑगस्ट १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

# श्री भगवान उवाच....

**श्री भगवान उवाच**

अर्जुनाला कृष्ण बोले
प्रश्न काही तुवा पुसले
मन माझे चिंतित झाले
प्रश्नांनी त्या

मीही सारे पहात होतो
कोण कैसा कोठे जातो
कोलांटया अन् कोण मारतो
पक्षामधूनी ।

सत्तेसाठी विविध रंग
विविध रूपं, विविध ढंग
असंगाशी करती संग
जन येथले ।

कोणी येवो कोणी जावो
सत्तेमध्ये स्थान राहो
हिस्सा आपल्या पदरी येवो
व्यवस्थित ।

काल आपण काय बोललो
काय बोलत इकडे आलो
अन् खुशीनं वस्त्रही त्यालो
आज ऐशी ।

कोणासंगे काल झुंजलो
कोणासंगे झुंजत मेलो
आज पुन्हा अन् मरून जन्मलो
कोणासंगे ।

कोण दुश्मन, कोण साथी
कोणाचा हा हात हाती
आज अचानक परके होती
कोण कोण ।

लढा आपुला कोणासाठी
कोणासंगे पडल्या गाठी
तत्त्व, नीतीच्या कुठल्या गोष्टी
सांगतो आज ।

साक्षात्कार हा काय जाहला
म्हणूनी आपण पक्ष सोडला
नवा स्नेहसंबंध जोडला
आज ऐसा ।

विधिनिषेध ना ज्यांना याचा
लोभापायी कुंठित वाचा
स्वार्थासाठी जन्म जयांचा
जाहला येथ ।

उठो कुणी वा कुणी पडू द्या
खुर्चीसाठी कुणी लढू द्या
विजयाच्या नौबती झडू द्या
कुणाच्याही ।

उठणाऱ्याला द्यावा हात
पडणाऱ्याला देऊन लाथ
आणि करूनी त्याचा घात
धन्यही व्हावे ।

हीच ज्यांची नीती नेहमी
जे सत्तेचे असती प्रेमी
तत्त्व हेच हे अंतर्यामी
जयांच्या नित्य ।

समाजवादाचा जनी प्रचार
सत्तेविन ना मनी विचार
त्यासाठी सदासर्वत्र लाचार
होती जे ।

बोललो कसे नि वागलो काय
नीती-अन्नूचे ना ज्यांना कधी भय
त्यातच ज्यांचे जीवन, क्षय
होतसे ।

वेगळे काय ते देशा देणार
अत्तर लावत फक्त फिरणार
माकडचाळे सदा करणार
जनामध्ये ।

लोकरंजनाचे यांना कंत्राट
लोकांची परी ते लावती वाट
स्व-विनाशाचा घातला घाट
स्व-हस्ते ।

किती काळ हे राज्य करणार
पदांसाठी हे सदा भांडणार
स्वार्थ दुखावता पक्ष फोडणार
ब्रीद यांचे ।

यांना कोणी तरी ऐसा भेटेल
खिंडीत यांच्याच यांना गाठेल
पुन्हा एकदा सारे पेटेल
त्या समयी ।

यांचेच घालील यांना डावपेच
सभासदांची पुन्हा खेचाखेच
मागला शहाणा पुढल्यास ठेच
होईल त्या क्षणी ।

—सतीश कामत

'कुरुक्षेत्र केरळ'—लेखांक आठवा जागेअभावी या अंकात देता आला नाही.
तो पुढील अंकी येत आहे.

# पुढची वाट
## काही मूलभूत प्रश्न
वा. दा. रानडे

दिल्लीत जे घडले ते का आणि कसे घडले यासंबंधी बरेच लेखन झालेले आहे. त्याची पुनरुक्ती न करता या पेचप्रसंगातून उपस्थित होणारे काही मूलभूत प्रश्न आणि पुढची वाट यासंबंधी काही विचार मांडीत आहे.

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न पक्षांतराचा. कारण दिल्लीत जे सत्तांतर घडले ते पक्षांतरामुळेच घडले. तेव्हा आपले राजकारण शुद्ध व स्वच्छ करण्यासाठी पहिली आवश्यकता आहे ती पक्षांतरबंदीची. या संबंधात उपस्थित केला जाणारा एक मूलभूत प्रश्न म्हणजे अशी बंदी घटनेशी सुसंगत आहे का? सुप्रीम कोर्टात हा प्रश्न कोणी नेल्यास बिल बेसनदशीर ठरण्याचा कितपत संभव आहे? मतस्वातंत्र्य किंवा विचारस्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कांशी पक्षांतरबंदी विसंगत आहे असा घटनात्मक मुद्दा यासंबंधात उपस्थित करता येण्यासारखा आहे. एखाद्या पक्षाची विचारप्रणाली मला पटेनाशी झाली किंवा त्या पक्षानेच आपली मूळची विचारप्रणाली बदलली आणि ते मला मान्य नसेल तर पक्षांतराचा हक्क मला असला पाहिजे असा युक्तिवाद पक्षांतराच्या बाजूने कोणी केला तर तो तार्किकदृष्ट्या पटण्यासारखा आहे. पक्षांतराचा विचार करताना वैचारिक भूमिकेवरून केलेली प्रामाणिक पक्षांतरे आणि सत्तेसाठी केलेली संधिसाधू पक्षांतरे असा भेद करायला हवा. प्रामाणिक पक्षांतराला मोकळीक हवी हे तत्त्वतः मान्य करायला हवे; पण पक्षांतर प्रामाणिक की संधिसाधु हे कोणी कसे ठरवायचे? कारण संधिसाधू पक्षांतर करणारेही तात्त्विक भूमिकेचा मुखवटा धारण करीत असतात. हा मुखवटा दूर करून कार्यकर्त्यांनी अशा संधिसाधूंच्या खऱ्या स्वरूपाचे दर्शन जनतेला घडवायला हवे.

पक्षांतरबंदी घटनेच्या दृष्टीने सनदशीर ठरो किंवा न ठरो; पण त्याबरोबर येणारा मतदारांचा विश्वासघात किंवा प्रतारणा संपली पाहिजे, संपविली पाहिजे. पक्षांतर करावे असे तुम्हाला मनापासून वाटत असेल, तर जरूर करा; पण त्याबरोबर ज्या पक्षाच्या पाठिंब्याने तुम्ही निवडून आलात ती विधानसभेतली किंवा लोकसभेतील जागाही सोडा ही न्याय्य मागणी आहे. त्याप्रमाणे कायदा करण्यात तत्त्वतः अवैध किंवा घटनेशी विसंगत काही नाही. कारण अशा बिलाने पक्षांतराला पूर्ण बंदी करण्यात येणार नसून फक्त काही अटी घातल्या जाणार आहेत. हे बिल लौकर पास करून घेण्यासाठी सर्व लोकशाहीवादी पक्षांनी आग्रह धरला पाहिजे, सरकारवर त्यासाठी दडपण आणले पाहिजे. जनता पक्षाने आपल्या कार्यक्रमात या मागणीस अग्रक्रम द्यावयास हवा आणि कायदा पास होण्याची वाट न पाहता राजकीय पक्षांनी याबाबत आचारसंहिता केली पाहिजे. इतर पक्ष करोत किंवा न करोत जनता पक्षाच्या लोकनियुक्त प्रतिनिधींनी आपल्यापुरता हा संकेत मानला पाहिजे. काँग्रेस समाजवादी पक्षाने काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्या पक्षाच्या आमदारांनी व खासदारांनी आपल्या जागांचे राजिनामे दिले. समाजवाद्यांच्या तत्त्वनिष्ठेचे उदाहरण म्हणून या घटनेचा उल्लेख केला जातो; पण आता मात्र जनता पक्षातून बाहेर पडलेल्या समाजवादी गटास या तत्त्वाचा विसर पडल्याचे दिसते. मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस यांनी पक्ष सोडताना लोकसभेतील आपल्या सभासदत्वाचा राजिनामा का दिला नाही? त्यांच्या मतदारसंघातील मतदारांनी तशी मागणी केली पाहिजे, सत्तेसाठी नव्हे तर काही मूल्यांसाठी झगडणारे नेते म्हणून जनता ज्यांच्याकडे पहात आली, तेच असे वागू लागल्यावर जनतेने विश्वास कोणावर ठेवायचा? पक्षांतर करणारांना पुढच्या निवडणुकीत निवडून द्यावयाचे नाही आणि मी पक्षांतर करणार नाही व केल्यास विधानसभा किंवा लोकसभेतील माझ्या जागेचा मी राजिनामा देईन असे उमेदवारांकडून लेखी अभिवचन घ्यावयाचे असा मतदारांनी निर्धार केला पाहिजे. उमेदवारीच्या अर्जाचा भाग म्हणूनच उमेदवाराकडून असे प्रतिज्ञापत्रक घेतले तर पक्षांतराला आळा घालण्याच्या दृष्टीने ते सुलभ होईल. घटनातज्ज्ञ व कायदेपंडित यांनी याचा विचार करावा.

आपल्या लोकशाहीस बळकटी येण्यासाठी पक्षांचा कारभार लोकशाही कार्यपद्धतीने चालला पाहिजे. पक्षांतर्गत लोकशाहीला या दृष्टीने फार महत्त्व आहे. आमचे राजकीय नेते लोकशाहीची भाषा बोलतात; पण आपल्या पक्षात लोकशाही प्रथा व संकेत पाळले जावेत याबद्दल ते कितपत आग्रही असतात? पक्षाची रीतसर सभासदनोंदणी होऊन तळापासून वरपर्यंतच्या समित्या निवडल्या गेल्या पाहिजेत. जनता पक्षाच्या निवडणुकांचा वाद बराच गाजला. पक्ष फुटण्याचे तेही एक महत्त्वाचे कारण आहे. निवडणुकांचा कार्यक्रम अनेकदा पुढे ढकलण्यात आला. जनसंघाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांचे मदतीने मोठ्या प्रमाणावर सभासदनोंदणी केली व पक्ष त्यांच्या नियंत्रणाखाली जाणार असे दिसू लागले तेव्हा निवडणुकाच उधळून लावण्याच्या हालचाली इतर घटक पक्षांच्या नेत्यांनी सुरू केल्या. भालोदने निवडणुकांवर बहिष्कार घातला. बनावट सभासदनोंदणी मोठ्या प्रमाणावर झाली आहे. निवडणुका घेण्यापूर्वी त्याची प्रथम छाननी झाली पाहिजे, अशी मागणी मधु लिमये यांनी केली. निवडणुका नकोत,

सहमताने (कॉन्सेन्सस) समित्या निवडा अशीही मागणी या दोन पक्षांतर्फे पुढे आली. बनावट मतदारांची छाननी व्हावयास हवी, ही मागणी बरोबर आहे. तशी यंत्रणा पक्षाने उभारायला हवी होती. पक्षाच्या निवडणुकांचा कार्यक्रम लौकर पुरा करण्याचा निर्णय राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला. अडथळा आणणारे पक्षाबाहेर पडले असल्याने आता हा निर्णय लौकर अंमलात येईल अशी आशा बाळगायला हरकत नाही.

दुहेरी निष्ठेचा प्रश्नही राष्ट्रीय कार्यकारिणीने योग्य पद्धतीने सोडविला आहे. हिंदुराष्ट्र, इस्लामी राष्ट्र अशी धर्माधिष्ठित राज्याची कल्पना जनता पक्षास मान्य नाही. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादावर आमचा पूर्ण विश्वास आहे. धर्माधिष्ठित राज्यकल्पनेवर विश्वास असणारांना पक्षाचे सभासद होता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद पक्षाच्या घटनेत एका दुरुस्तीने करण्यात आली आहे. वास्तविक ही दुरुस्ती यापूर्वीच केली असती तर पक्षाची फूट टळली नसती का? असा विचार मनात येतो. ही दुरुस्ती केल्यानंतर वास्तविक या कारणासाठी पक्षातून बाहेर पडलेल्यांनी परत यावयास हवे. ते आले नाहीत तर पक्षातून बाहेर पडण्यासाठी दुहेरी निष्ठा हे केवळ एक निमित्त त्यांनी केले होते. खरी कारणे निराळीच होती असेच म्हणावे लागेल.

महत्त्वाच्या प्रश्नांवर पक्षसभासदांना विश्वासात न घेता नेत्यांनी निर्णय घ्यावयाचे ही प्रवृत्तीही लोकशाही कार्यपद्धतीशी विसंगत आहे. पर्यायी सरकारबाबत आपले धोरण ठरविताना काँग्रेसनेत्यांनी हा संकेत पाळला नाही. चरणसिंग इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्यावर अवलंबून आहेत हे स्पष्ट दिसत असता त्यांना पाठिंबा देण्याचा निर्णय चव्हाण आणि स्वर्णसिंग यांनी घेतला. अनेक खासदारांचा यास विरोध होता. काहींनी पक्षाची बैठक बोलावून निर्णय घेण्याची मागणीही केली होती; पण ती मान्य करण्यात आली नाही.

समर्थ नेतृत्वाचा अभाव या पेचप्रसंगात प्रकर्षाने जाणवला. देशाला असे नेतृत्व नेहमीच लाभते असे नाही. सध्याच्या परिस्थितीतून नव समर्थ नेतृत्व उदयास येईलही; पण तोपर्यंत कार्यकर्त्यांनी आपापल्या आघाड्यांवर कार्य करीत राहिले पाहिजे. नेतृत्वाच्या बाबतीत आणखी एक विचार म्हणजे नेत्यांनाही निवृत्ति असली पाहिजे. सरकारी नोकर कामगारनिवृत्तीचे वय झाल्यानंतर निवृत्त होतात तसे नेत्यांनीही स्वच्छेने निवृत्त झाले पाहिजे. साठ वर्षे झाल्याबरोबर कोणताही गाजावाजा न करता निवृत्त होणारे माजी ब्रिटिश पंतप्रधान हेरॉल्ड विल्सन याबाबतीत आदर्श म्हणता येतील. साठीच्या पुढे त्यांनी मार्गदर्शन करावे, सल्ला द्यावा, निरनिराळ्या प्रश्नांवर आपली मते स्पष्टपणे मांडावीत; पण प्रत्यक्ष निर्णय तरुण नेतृत्वालाच घेऊ द्यावा. हा बदल घडवून आणण्यात तरुण नेतृत्वानेच पुढाकार घ्यावयास हवा. □

# न-नाट्य

प्रेक्षकांना आपल्या चाळ्यांनी
खदखदा हसवणारा विदूषक
केव्हा खलनायक बनला
ते आम्हाला समजलेच नाही.

यात कमाल कोणाची
पडद्यामागच्या सूत्रधाराची?
नाटककाराची की
खुद्द नट-नट्यांची?
हे आम्हाला समजलेच नाही.

खरं म्हणजे नाटक त्याच्या
क्लायमॅक्सला पोहोचले होते.
जे ते पात्र आपापली भूमिका
तन्मयतेने वठवत होते.
इतकी तन्मयता की
संत्रस्त प्रेक्षक
शिट्या मारून,
बेंबीच्या देठापासून
आरडाओरड करीत असताना
पात्रांचे प्रेक्षकांकडे ध्यानच नव्हते.
विदूषकाने पडदा मध्येच पाडला
आणि रंगलेले नाट्य संपुष्टात आले.

प्रेक्षकांनी क्षमा करावी
तिकिटाचे पैसे परत घेऊन
त्यांनी नाट्यमंदिर त्वरित
खाली करावे.
नव्या नाटकाचा शुभारंभ
नव्या नामांनी, नव्या घोषणांनी
आम्ही धुमधडाक्यात करणार आहोत.

प्रेक्षकांनी अशीच गर्दी करावी
आम्ही यापेक्षा सुंदर नाट्य
यापेक्षा सुंदर कथानकात
पेश करतो आहोत.
तेवढं तिकिट काढायचं मात्र
विसरू नका; फ्री पासेस
अजिबात बंद आहेत.

विदूषक पुढच्या नाटकात
पडदा पाडणार नाही
याची आम्ही दक्षता घेऊ.
वाटलंच तर ते काम
आम्ही स्वत: करू.
मायबाप प्रेक्षकांनो,
आमचे सुटलेले पोट तुम्ही भरा.
तुमचे रिकामे खिसे
आम्ही खाली करू.
एकमेका सहाय्य करू,
अवघे धरू स्मशानपंथ

धुळे —शरद रावळ

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# पहिला सार्वजनिक माणूस

इ. स. १८२८ साली जन्म होऊन इ. स. १८८० साली, केवळ बावन्नाव्या वर्षी थोडयाशा आजाराने मृत्यू पावलेल्या सार्वजनिककाकांचा स्मृतिदिन दरवर्षी पुणे येथील थोरले बाजीरावपथावरील सार्वजनिककाकांनीच बांधलेल्या नवा विष्णुमंदिरात, त्यांनीच स्थापन केलेल्या सार्वजनिक सभेतर्फे साजरा होत असतो. यंदाही त्यांचा नव्याण्णवावा स्मृतिदिन त्याच जागी आषाढ वद्य ४ रोजी साजरा झाला. योगायोग असा की, देशातील राजकीय स्थिती अत्यंत गोंधळाची झाली असताना तो दिवस आला. कदाचित सार्वजनिककाकांनी देशाची कामे कशी निष्ठेने व त्यागाने केली याची आजच्या लोकप्रतिनिधींना व लोकांनाही आठवण आणून देण्यास तो आला असावा.

दीडशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या सार्वजनिककाकांची आज कुणाला आठवण नाही किंवा त्यांच्या सार्वजनिक सभेचीही नाही. त्यांच्या नव्याण्णवाव्या स्मृतिदिनी त्या दिवशी नवा विष्णुमंदिरात उणेपुरे दहा श्रोते नव्हते. प्रमुख वक्ते होते बा. रं. सुंठणकर. एवढे थोडे श्रोते पाहून त्यांनाही बरे वाटले नाही. त्या दिवशीच्या वर्तमानपत्रांत हा कार्यक्रम कुणी दिला नव्हता म्हणून श्रोते कमी असावेत असे वाटले. विचारता कळले की, दरवर्षी या कार्यक्रमाचे पत्र सेक्रेटरी वर्तमानपत्राकडे धाडतात, पण वर्तमानपत्रवाले छापीत नाहीत. मला वाटते, वर्तमानपत्रवाले चूक करताहेत, एक तर त्यांनी दीडशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या या सार्वजनिककाकांचे चरित्र मिळवून वाचावयास हवे होते किंवा श्री. सुंठणकर यांचे व्याख्यान ऐकण्यास यायला हवे होते. त्यांना कळले असते की, आज वर्तमानपत्रांचा व्यवसाय जो भरभराटला आहे, त्या वर्तमानपत्राचा पाया सार्वजनिककाकांनीच घातला. अनेक पहिल्या गोष्टी काकांनी केल्या. पहिली जाहीर सभा त्यांनी भरवली, सद्यःस्थितीचे चित्र लोकांपुढे उभे करण्यास त्यांनी पहिले त्रैमासिक काढले. त्यांनी पहिला प्रचारक किंवा बातमीदार बाहेर धाडला. त्यांनी पहिली खादी व स्वदेशीची चळवळ सुरू केली. लोकशाही पद्धतीची निवडणूकपद्धत त्यांनी देशात पहिल्यादा 'सार्वजनिक सभेच्या' सभासभासदांची निवड करताना आणली. त्यांच्या घरी, त्यांच्या उत्तेजनाने, त्यांच्या पत्नीने व त्यांचे सहकारी गोवंडे यांच्या पत्नीने, स्त्रीशिक्षणाचा फैलाव करण्यासाठी हिंदुस्थानातील पहिली स्त्रीसभा 'स्त्री विचारवती सभा' या नावाने काढली. खरे म्हणजे एवढ्या गोष्टी करणाऱ्या माणसाच्या स्मृतिदिनास एक श्रोता येत आहे तोपर्यंत वर्तमानपत्रवाल्यांनी त्या समारंभाचे वृत्त दिले पाहिजे.

सार्वजनिककाकांचे संपूर्ण नाव गणेश वासुदेव जोशी. जन्म सन १८२८ एप्रिलमध्ये सातारा येथे. आईचे नाव सावित्रीबाई. वडील लहानपणीच गेले. साताऱ्यास मराठी शिक्षण. नाझरकचेरीत नोकरी. नोकरीत कुभांड व सस्पेंड. वकिलीची परीक्षा दिली. कुभांडातून सुटका; पण नंतर वकिलीच केली. ते शरिराने उंच, सडपातळ, वर्णाने किंचित काळे व पोक आलेले असे होते. प्रकृति अशक्तच; पण तसा आजार नव्हता. अखेरच्या वर्षात त्याना हृदयाचा विकार जडला. अठराशेसत्तर साली सार्वजनिक सभा स्थापली. तेव्हापासून १८८० पर्यंत दहा वर्षे त्यांनी सभेचे अविरत काम केले. त्याच वर्षी चार-पाच दिवस ताप येऊन आईच्या मांडीवर त्यांनी प्राण सोडला. त्यांना तीन मुलगे व एक मुलगी होती.

सार्वजनिककाकांचे असे थोडक्यात चरित्र सांगून ज्या सार्वजनिक सभेचे संस्थापक म्हणून काकांना, 'सार्वजनिककाका' असे नाव पडले ती सार्वजनिक सभा कशी स्थापन झाली याचा इतिहास व्याख्याते सुंठणकर यांनी सांगितला. पर्वतीसंस्थानच्या कारभारात गडबड होती. नेमणुकांचा पैसा योग्य रीतीने खर्चला जात नव्हता. ही अंदाधुंदी बंद करण्यासाठी भक्तमंडळीत विचार सुरू झाला. पंचांवर फिर्याद करण्याचा उपाय होता; पण अशी फिर्याद करण्याचा कुणाला अधिकार आहे हे कळेना. तेव्हा एखादी लोकप्रतिनिधींची सभा स्थापन केली तर तिला अशा वेळी लोकांच्या वतीने बोलता येईल, अशी तोड निघाली. त्याप्रमाणे एक सभा बोलावली; पण नंतर पर्वतीसंस्थानचे एकच एक काम न करता दुसरी लोकोपयोगी अशी सार्वजनिक कामेही या सभेने करावी असे ठरले व तिला प्रातिनिधिक स्वरूप येण्यास तीत श्रीमंत, गरीब, जातगोत किंवा धर्म हे न पाहता सर्वांचा समावेश करण्याचे ठरले. त्याप्रमाणे ही सार्वजनिक सभा दि. २–४–१८७० या दिवशी वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर औंधकरांचे वाड्यात श्रीमंत श्रीनिवासराव प्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली. सार्वजनिककाका ऊर्फ ग. वा. जोशी यांनीच ती स्थापण्यात मोठी खटपट केली.

सुंठणकर नंतर म्हणाले की, काकांची ही सार्वजनिक सभा राजकारण शिकणाऱ्यांचे आद्यपीठ झाली. अनेक थोर राजकारणी पुरुषांनी येथे लोकसेवेचे धडे गिरविले. सार्वजनिक सभेने फार मोठी परंपरा घडविली. सार्वजनिक सभेतले काकांचे कर्तृत्व न्या. रानडे यांच्या मोठ्या कीर्तीत विसरले गेले. काकांमधे जे नेतृत्व व धाडस होते ते रानड्यांत नव्हते. सार्वजनिक सभेचे रानडे हे डोके होते तर काका धड होते.'

आज आपल्याला सार्वजनिक सभेसारख्या आद्य राजकीय संस्थांची कल्पना येणं फार कठीण आहे. तेव्हा पेशवाई जाऊन इंग्रजांचे राज्य आल्याला फक्त पन्नास वर्षे झाली होती. पेशवाईतील पुरुषांना पाहिलेली वृद्ध मंडळी अजून हयात होती. इंग्रजांचे राज्य म्हणजे काय आहे याचा हळूहळू आवाका येऊ लागला होता. त्यांच्याशी कसा लढा द्यावयाचा हेही हळूहळू ध्यानात येऊ लागले होते. पर्वतीसंस्थानचा गैरकारभार दूर करताना उपाय सापडला होता– तो म्हणजे लोकप्रतिनिधींची सभा, काकांनीच तिला सार्वजनिक सभेचे परिणत रूप देऊन महाराष्ट्राच्या राजकारणाचा व लोकशाहीचा पाया घातला.

सुंठणकर म्हणाले सार्वजनिक सभेने दोन नियम केले. एक व्यक्तिविषयक बाबीत न शिरणे. दुसरा धार्मिक बाबीत न शिरणे. काकांनीच सभेची घटना केली. प्रत्येक सभासदाने पन्नास माणसांचे मुखत्यारपत्र द्यावे. तेव्हा एकशेदहा सभासद झाले व त्यांच्यासाठी सतरा हजारांनी मते दिली. ही प्रतिभा काकांची. तसेच प्रत्येक सभासदाला, 'सार्वजनिक सभेने सोपवलेले काम मी निष्ठापूर्वक करीन' अशी शपथ घ्यावी लागे. सभेचे कार्यकारी मंडळ निवडणुकीतूनच ठरे.

¤

आम्ही ज्या नवा विष्णुमंदिरात बसलो होतो त्या देवाला बायक्या विष्णूही म्हणत. जातिभेद न मानता पुण्यातील सर्व स्त्रियांचे एक सार्वजनिक हळदीकुंकू करण्याचा उपक्रम काकांनी सुरू केला. तेव्हा त्या काळच्या काही टिंगलखोर लोकांनी या देवाला बायक्या हे नाव दिले. देवळाचा सभामंडप पन्नासएक मंडळी बसतील असा लहानसाच आहे. मूर्ती संगमरवरी व सुबक आहेत. देवळाचा पुरातनपणा जुन्या विटक्या लाकूडकामाने व वर टांगलेल्या राजा रविवर्म्याने काढलेल्या चित्रांच्या तसबिरींनी उठून दिसतो. देवघरासमोर एका घडवंचीवर फुलांच्या माळांची महिरप करून त्यात सार्वजनिककाकांचा फोटो ठेवला होता. हे देऊळ सार्वजनिककाकांनी बांधले. ते वकिली करू लागल्यावर एक अशिल खटला घेऊन आले. अशिलाने काकांना म्हटले की, 'खटला चालविण्यासाठी माझ्याजवळ पैसा नाही. तुम्ही आज फी न घेता केस चालवा. खटला जिंकला तर मिळणाऱ्या इस्टेटीतील निम्मी तुम्हाला देईन!' काकांनी ते मान्य केले. काका खटला जिंकले आणि खरोखरीच अशिलाने त्यांना त्यांच्या वाटणीची निम्मी रक्कम दिली. ती इतकी प्रचंड होती की, काकांना हर्षवायूचा झटका आला. तेव्हा त्यांच्या आईने सांगितले की, 'बाबा! प्रकृति चांगली तर सर्व चांगले. या पैशाचे देऊळ बांध. तुला आराम पडेल!' त्याप्रमाणे काकांनी हे मंदिर बांधले.

¤

सार्वजनिककाकांनी काय काय कामे केली हे सांगताना श्री. सुंठणकरांनी सांगितले की, न्या. रानडे यांच्याशी विचारविनिमय करून देशी वस्तूंच्या प्रचारासाठी त्यांनी 'देशी व्यापारोत्तेजक संस्था' स्थापली. जागोजागी देशी मालाची दुकाने उघडली. एवढेच नव्हे तर देशी कापड वापरण्याची शपथ घेऊन काकांनी मरेपर्यंत जाडीभरडी खादी वापरली. दिल्लीदरबारला ते याच जाडयाभरडया कपड्यांतून गेले. ते स्वत: हाताने सूत कातीत व त्यांनी घरात माग ठेवले होते त्यावर आपले कापड विणीत. एवढेच काय पण त्यांनी स्वत:च्या घरात आगपेटीचा कारखाना व छत्र्यांचा कारखाना काढला. त्यात खूप तूट आली.'

¤

सार्वजनिककाकांनी स्वदेशीची पहिली लाट काढली. मी म. गांधींनी काढलेल्या दुसऱ्या लाटेत होतो. सार्वजनिककाकांच्या चरित्रात 'लोक स्वदेशीची शपथ घेत; पण वर्षभरात तलम विलायती कापड वापरू लागत; पण काकांनी तसे केले नाही.' असे कौतुकाने लिहिलेले आढळते. बोलावयाचे एक व करावयाचे एक हाही अनुभव आम्ही आमच्या वेळी घेतला. चहा पिऊ नका म्हणून प्रचार करणारे पहाटेच्या अंधारात प्यालेल्या चहाचा गाळ टाकायला जात. शाळेत असताना आम्ही पाच–सहा मुलांनी हातगाडीवर देशी वस्तू घालून विकल्या. आम्ही पाच-पाच रुपये काढून भांडवल उभे केले. शाळा सुटल्यावर व सुट्टीच्या दिवशी आम्ही आळीपाळीने गावात गाडी हिंडवत असू. तीन-चार महिने आम्ही हातगाडी फिरवली व शेवटी काकांसारखी तोटा खाऊन बंद केली. मला वाटते ध्येयवादाने करावयाच्या गोष्टींत नेहमीच तोटा खावा लागतो. हा तोटा खाल्ल्यावरच लोकांच्या मनावर गोष्टींतील तत्त्वे ठसतात. सार्वजनिककाकांपासून ते आमच्या हातगाडीपर्यंतच्या त्यागामुळेच पुढे देशी उद्योगधंदे सरसावले असे आम्ही समजतो.

स्वदेशीचे व्रतच नव्हे तर काकांनी देशहितार्थ अनेक गोष्टी केल्या. पुणे शहरसुधारणेपासून देशी भाषेत कायदे व्हावे, देशी न्यायधीश नेमावे, म्यु. पालिटचा लोकनियुक्त कराव्यात, पार्लमेंटमधे हिंदुस्थानचा प्रतिनिधी घ्यावा, या गोष्टींसाठी त्यांनी खटपट केलीच; पण शेतकरी व सावकार यांत बेबनाव होऊन जेव्हा दंगे झाले तेव्हा त्या दंग्यांची चौकशी सार्वजनिक सभेतर्फे करून काकांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी म्हणून अतोनात मेहनत घेतली. १८७६/७७ मध्ये जेव्हा महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला तेव्हा सरकारला त्याची जाणीव करून दिलीच; पण सार्वजनिक सभेने आपली माणसे सर्वत्र धाडून खरी माहिती आणून न्या. रानडे यांनी लेख लिहून सरकारची अनेक हयगयींच्याबाबत कानउघडणी केली. काकांनी केलेल्या या वेळच्या धडपडीचे सर्वत्र कौतुक झाले. स्वस्त धान्याची दुकाने उघडणे, दुष्काळकमिट्या स्थापन करणे, दुष्काळासाठी फंड उभारणे वगैरे गोष्टी काकांनी केल्या. अठराशेअठ्ठ्याहत्तर साली कलकत्त्यास काकांनी वृत्तपत्रांचे संमेलन भरवले. वर्तमानपत्रे लोकांना चिथवतात, सरकारविरुद्ध हवं ते लिहितात, याला आळा बसावा म्हणून लॉर्ड लिटनसाहेबांनी कायदा आणावयाचा ठरविला. या कायद्याविरुद्ध वर्तमानपत्रांनी चळवळ सुरू केली. त्याला संघटित रूप यावे म्हणून काका व न्या. रानडे यांनी ही संमेलनाची कल्पना काढली. हे संमेलन काकांनी संपूर्ण जबाबदारी घेऊन पार पाडले. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यासाठी झगडलेले सार्व-

जनिककाका हे पहिले वृत्तपत्रकार होत !

□

सार्वजनिककाकांनी आपल्याभोवती केवढी थोर थोर मंडळी गोळा केली होती हे सार्वजनिक सभेच्या दिवाणखाण्यात आज गेलो तरी कळते. यावरून काकाही केवढे थोर होते हे कळते. हा हॉल दाणेआळीत आहे. आज तेथे तळमजल्यावर चिनीमातीची वॉशबसीन, फरशा वगैरेचे दुकान आहे. मधल्या मजल्यावर सुप्रसिद्ध कथाकार ग. ल. ठोकळ यांचे श्री लेखन वाचन भांडार हे पुस्तकाचे दुकान आहे व तिसऱ्या मजल्यावर सार्वजनिक सभेची कचेरी आहे. तिथल्या हॉलमध्ये शिरताच मागील बाजूस १९५२ साली जळलेला भाग दिसतो. इमारतीस आग लागून दोनतृतियांश भाग जळून गला. यांत सार्वजनिक सभेचे सर्व कागदपत्र राख झाले. ही आग तेथे कुणी तरी लावलेल्या दारूभट्टीमुळे लागली असे म्हणतात. एकूण आधीच उतारास लागलेली सार्वजनिक सभा या संकटातून वर येऊ शकलेली नाही हे तेथे जाताच कळते. एखाद्या जुन्या संस्थानिकाच्या घरात जावे तसे तेथे वाटते. हा वाडा वाळवेकरांचा. तो १८८४ साली सभेने १५००० रुपयांस खरेदी केला. काकांनी ही पूर्वभागातील इमारत घेतली याचे कारण बहुजन-समाजात काम करता यावे म्हणून.

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा
मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

वासुदेव बळवंत फडके यांना पकडल्यावर त्यांच्यावतीने खटला चालविण्यास काका पुढे झाले. हे मोठे धाडसच होते. अनेकांनी काकांना असे करू नका म्हणून सांगितले; पण काकांनी खटल्याचे काम घेतले तेव्हा आता, वासुदेव बळवंतबरोबर काकाही फाशी जाणार असे लोक म्हणू लागले. काकांनी उत्तर दिले, 'हे मला कळतंय म्हणूनच यात पडलो. वासुदेव बळवंत जर फाशी गेला तर मीही फाशी जाईन !' काकांनी वासुदेव बळवंतांची फाशीची शिक्षा जन्मठेपेवर आणली.

तुम्ही सार्वजनिक सभेच्या, जुने ऐसपैस कोच ठेवलेल्या, ऐसपैस खिडक्या व उंच दारे असलेल्या, काहीशा विटक्या सरंजामी दिवाणखान्यात उभे राहिलात की, वाटते भोवतालच्या भव्य फोटोंतील सार्वजनिककाका, न्या. रानडे, पंतप्रतिनिधी, महर्षी अण्णासाहेब पटवर्धन, रावसाहेब साने, रावबहाद्दूर गोवंडे वगैरे मंडळी फोटोंतून खाली उतरतील, आपापली उपरणी सावरीत ते कोचावर बसतील आणि सार्वजनिक सभेपुढे असलेल्या नव्या कामावर चर्चा सुरू होईल.

□

सार्वजनिक सभेला पन्नास वर्षे झाल्यावर एक अर्धसांवत्सरिक प्रसिद्ध झाले. त्यात गजानन भास्कर वैद्य यांनी लिहिलेल्या एका लेखाचा भाग उद्धृत करतो. लेखाचे शीर्षक आहे 'सार्वजनिक सभेची लोकसेवा'... तिकडे इंग्लंडात, प्रॉटेस्टंट, भागवतधर्म, मुद्रणकला, वर्तमानपत्रे, सभा, संस्था, शाळा, शेक्सपिअरची नाटके, नौकानयन यांचे मंगलकार्य घडत होते व त्याने उज्ज्वल असा लोकाधिकार विकसित होता. इकडचे राज्य इंग्लंडचे व ते चालविणारे लोक तिकडच्या (लोकराज्याच्या) परिस्थितीत वाढलेले आणि तिकडच्या (लोकराज्याच्या) परिस्थितीत शिकलेले, त्यांनी इकडे पुरे एकतंत्री नोकरशाहीचे राज्य चालविण्याचे कितीही ठरविले तरी ते त्यांना शक्य झाले नाही व होण्यासारखे नव्हते. त्यांचा इतिहास तसा नव्हता व इतिहासाने घडविलेला स्वभावही तसा नव्हता. नोकरशाही पुढे परिणत झाली तरी अशा लोकांतून झाली... त्यांना आपला इतिहास विसरताच आला नाही. आमच्या राजकीय उद्धाराचे बीज त्यातच होते. नोकरशाहीने आपला इतिहास बरोबर आणला होता आणि लोकमनाची प्रवर्तक व प्रदर्शक अशी सार्वजनिक सभा, ही पन्नास वर्षांपूर्वी येथे स्थापन व्हावी हा भाग इंग्लंडच्या त्या उज्ज्वल इतिहासाचा होय.'

लोकशाहीची परंपरा अशी सार्वजनिक सभेपर्यंत आणून ठेवल्यावर लेखाचा शेवट करताना लेखक म्हणतो,

हिंदुस्तानच्या देवाचे आता हे मनोगत आहे की, हिंदुस्तानाने आता तेजस्वी 'महाराष्ट्र' व्हावे. जसे भक्त त्या 'एका वस्तुलागी' तपोबलाची पराकाष्ठा करतात. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत,

> जया लाभाचिया आशा ।
> करूनि धैर्यबाहूचा भरंवसा ।
> घालीत षट्कर्मांचा धारसा ।
> कर्मनिष्ठ ।। ज्ञा. ६·४७४.

तसे आम्ही देशभक्त आणि लोकसेवक नव्या आशेने प्रेरित होऊन आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करू. अखिल हिंदुस्तान आता एक 'महाराष्ट्र' होत आहे. हिमालय ते सिंहलद्वीप आणि सप्तसिंधु ते ब्रह्मदेश असे एकराष्ट्र, हिंदुस्तान पूर्वी कधीही नव्हते. आर्यांचे नव्हते, पांडवांचे नव्हते, रामाचे नव्हते, मराठ्यांचे नव्हते, मोगलांचे नव्हते, आमचे आता होईल व तेथे ब्रिटिश नागरिकत्वसंपन्न लोकराज्य होईल. असा आमच्या देशाचा मान वाढला म्हणजे आमच्या देहाला मान मिळेल. आमच्या वाणीला मान मिळेल. अंती आमच्या ज्ञानमय धर्माला मान मिळेल. हिंदुस्तानात लोकराज्य व पृथ्वीवर हिंदुधर्म होईल!'

असा दुर्दम्य आशावाद मांडणारे सभासद सार्वजनिक सभेने निर्माण केले आणि अशी सार्वजनिक सभा सार्वजनिकाका ऊर्फ गणेश वासुदेव जोशी यांनी स्थापन केली. राष्ट्राच्या त्या अत्यंत निराशेच्या काळात ज्या पुरुषाने त्यागाने व देशभक्तीने देशबांधवांच्या आशा फुलविल्या त्याचे स्मरण आज ज्या गोंधळाच्या काळातून आपण जात आहोत त्या गोंधळाच्या काळात सर्वांना व्हावे यासाठी हा प्रपंच.

□

। झंझावातानंतर चक्रावून गेलेली दिल्ली ।

। खास वार्तापत्र । क्रमांक दोन । लेखक : मंदार फडके ।

आयाराम-गयारामांचा विजय झालेला असतो.
सत्तेची नशा वातावरणात भरून जाते.
चरणसिंगांच्या बंगल्यातील कोलाहल व गजबजाट इतका वाढतो की
निष्पाप चिमण्यांचा चिवचिवाट कुठल्या कुठे विरून जातो.
अगदी शेवटी, रात्री आठाच्या सुमारास एक छोटा मोर्चा येतो.
मोर्चातून घोषणा उठत असते–
चरणसिंगने लायी आँधी
देशकी नेता इंदिरा गांधी

# यमुनेचं पाणी पुन्हा थरारतं लाल किल्लाही अवाक होतो....

## सोळा जुलै

१५ जुलैला जनता सरकार पडलं. त्यामुळं राजनारायण गोटात आनंदीआनंद गडे असं वातावरण असतं. आपल्या घरी जमलेल्या चाहत्यांना लाडू वाटतात ! आपल्याच पक्षाची होळी करणारे दिवाळी साजरी करत असतात. चरणसिंगांचं ईप्सितकार्य पुरं झालेलं असतं. ते राजीनामा देतात. राजीनामासत्र पुरं होतं. जनता (एस.)चे नेते म्हणून चरणसिग यांची निवड होते.

पंतप्रधान बनण्याची मनीषा बाळगणाऱ्यांच्या आशा पल्लवित होतात चरणसिंग गोटात तर ते पंतप्रधान बनले आहेत असाच थाट असतो. राजनारायण स्वतःला चर्चिलचे वंशज समजत असावेत. कारण टी. व्ही., कॅमेरेवाले व वृत्तपत्राचे फोटोग्राफर्स फोटो घ्यायला येतात तेव्हा ते दोन बोटं उंचावून 'व्हिक्टरी' सूचित करणारी 'व्ही'ची खूण करतात. पुढचे काही दिवस राजनारायण यांना त्याचाच छंद जडतो. कोणी फोटोग्राफर फोटो घेत असला तर त्याला थांबायला सांगून ते त्याच्यापुढं ती 'व्ही'ची खूण धरतात ! आपल्या शिष्योत्तमाचं हे वर्तन चरणसिंगांना पसंत नसतं. ही 'फिरंगी' लोकांची पद्धत आपल्याकडं कशाला ? असं ते राजनारायण यांना दटावतात आणि मग तेव्हापासून राजनारायण यांचं हे बोटांनी 'व्ही' दाखवणं थांबतं. दोन–चार दिवसांनी ते दाखवायचं कारणही उरत नाही म्हणा !

सकाळी ११ वाजता संसदेची बैठक भरणार असते. अविश्वासाचा ठराव चर्चेस येण्याची शक्यताच नसते. तो निरर्थकच ठरला होता. १०॥ वाजल्यापासूनच संसदभवनात गर्दी व्हायला लागते. खासदारांसाठी ठेवलेल्या खास मिनीबसेसमधून खासदारांची पथकेच्या पथके येऊन दाखल होतात. आता पुढं काय ? हा प्रश्न सर्वांच्या मुखी असतो. मणिराम बागडी हे राजनारायण यांचे विश्वासू सरदार. ते सभागृहाची बैठक सुरू होण्याआधी पंतप्रधानांच्या जागेवर जाऊन बसतात. लोकशाहीच्या त्या पवित्र मंदिरातला हा पोरखेळ असहायपणं पाहण्यावाचून गत्यंतर नसतं ! बैठक सुरू होण्याआधी काही क्षण काळजीवाहू पंतप्रधान मोरारजी देसाई सभागृहात शिरतात. त्यांची नेहमीचीच अविचल मुद्रा ! ते सभागृहात आपल्या आसनाकडे येत आहेत असं दिसताच बागडी त्या आसनावरून उठतात व शांतिभूषण यांच्या शेजारी काही क्षण बसून मग विरोधकांच्या बाजूला निघून जातात. सभापती के. एस. हेगडे पंतप्रधानांचं राजीनाम्याचं पत्र व राष्ट्रपतींचं ते स्वीकारल्याचं पत्र सभागृहात ठेवतात. सौगत रॉय, एदुआर्दो फालेरो हे आक्षेप घ्यायचा प्रयत्न करतात. पु. ग. मावळंकर म्हणतात, 'पंतप्रधान व राष्ट्रपतींची पत्रे ठेवल्यावर हरकतीचे मुद्दे कसे उपस्थित करता यतील ? सभा-

गृहाची बैठक ताबडतोब तहकूब करा!' सभागृहात गडबड, कोलाहल चालू असतानाच लोकसभेचं चालू अधिवेशन स्थगित झाल्याचं सभापती जाहीर करतात. ते कोणाला फारसं ऐकूही येत नाही; परंतु सभापती आपल्या जागेवरून उठून जायला निघतात. त्यामुळं बैठक तहकूब झाल्याचं सर्वांना समजतं. हा सारा प्रकार अवघ्या चार मिनिटांत संपतो.

नक्षीदार पाइप ओढीत इंदिरा काँग्रेसचे वसंत साठे विजयी मुद्रने चाललेले दिसतात. 'आता कोण होणार पंतप्रधान ?' असं विचारता त उत्तरतात, 'तुलसीदासानं म्हटलंय –

'कोई नृप हो, हमें का है ?'

(कोणीही राजा होवो आम्हाला काय त्याचं ?)

'त्यात थोडा बदल हवा' असं सांगून साठे म्हणतात,

'कोईभी नृपहो हमे तो हानि'

(कोणाही राजा झाला तरी आम्हाला ते हानिकारकच)

खरं तर कोणीही पंतप्रधान झाला तरी इंदिरा काँग्रेसच्या दृष्टीनं हानी कसली ? लाभच लाभ असतो.

लोकसभा व राज्यसभा यांच्या बैठका स्थगित होतात; परंतु सेंट्रल हॉलमध्य बहुधा या दोन्ही सभागृहांची बैठक चालू असावी असं दृश्य असतं. हा गालाकार हॉल खासदारांनी व राजकीय नेत्यांनी फुलून गेलेला, १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळालं ते याच हॉलमध्ये ! आज तो हॉल गमावलेल्या दुसऱ्या स्वातंत्र्याचा साक्षीदार असतो. हॉलमधील महात्मा गांधी, पंडित नेहरू, लोकमान्य टिळक आदी भारताच्या भाग्यविधात्यांची पोर्ट्रेट्स देखील खिन्न वाटतात. आता पुढं काय ? हाच प्रश्न त्या हॉलमध्ये चर्चिला जात असतो. सेंट्रल हॉलच्या गोलाकार कडेला अर्धवर्तुळाकार कठडे आहेत. त्याखालून थंड हवा सोडण्याची व्यवस्था आहे. अशा एका कठड्यावर जॉर्ज फर्नांडिस बसलेले असतात. माझ्याबरोबर पस्तीस समाजवादी खासदार आहेत. आम्ही सोशलिस्ट ब्लॉक म्हणून सभागृहात वेगळे बसणार आहोत असं ते ठणकावून सांगत असतात.

मोरारजीभाईंचे विश्वासू सहकारी व राज्यमंत्री सोनुसिंग पाटील भेटतात. 'जनता संसदीय पक्ष नवा नेता कधी निवडणार ?' असं विचारताच ते उसळून म्हणतात, 'नवा नेतानिवडीचा प्रश्न येतो कुठं ? जनता संसदीय पक्षानं मोरारजीभाईंची पाच वर्षांसाठी नेतेपदी निवड केलेलीच आहे!' मोरारजी देसाईंनी फक्त पंतप्रधानपदाचा राजीनामा दिलेला असतो, जनता संसदीय पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा दिलेला नसतो. ते तो देणार नाहीत हेच पाटलांना सूचित करायचं असतं. पक्ष सोडून बाहेर लोक गेले त्यामुळं क्षीणपंखी बनलेल्या जनता पक्षाला नेतेपदाच्या प्रश्नामुळं तडाखा बसणार, गुंतागुंत अधिकच वाढणार असं वाटू लागतं.

दरम्यान मोरारजी देसाई आकाशवाणी व दूरदर्शनवरून भाषण करायचं जाहीर करतात. कालच त्यांचं भाषण व्हायचं होतं; परंतु लोकसभेचं अधिवेशन चालू असताना महत्त्वाचं निवेदन सभागृहाबाहेर करता येत नाही हे लक्षात आणून दिल्यावर त्यांनी भाषण करण्याचा बेत पुढे ढकलला होता. आज सरकारचा राजीनामा सादर केल्यावर व सभागृहाचं अधिवेशन स्थगित झाल्यावर भाषण करायला काही हरकत नाही असं वाटून त्यांनी भाषण करायचं ठरवलं. सगळीकडं ते जाहीर केलं गेलं. 'मोरारजी देसाई भाषण करताना–' असा एक फोटोही प्रेस इन्फर्मेशन ब्यूरोनं पत्रकारांना वाटला; परंतु राष्ट्रपतींनी तुम्ही आता काळजीवाहू सरकारचे पंतप्रधान आहात तेव्हा राष्ट्राला उद्देशून तुम्ही भाषण करणं उचित होणार नाही असं त्यांना कळवलं. तेव्हा भाषणाचा बेत रद्द करण्यात आला व तेच भाषण मोरारजीभाईंनी वर्तमानपत्राला आपलं प्रेस स्टेटमेंट म्हणून दलं.

घटना वायुवेगानं घडत होत्या. सरकारविना पोरकी बनलेली राजधानी राजकीय हालचालींनी ढवळून निघाली होती. मोर्चेबंदी सुरू झाली होती. चरणसिंग यांच्या १२ तुघलकरोड या निवासस्थानी त्यांच्या चाहत्यांची गर्दी तर जगजीवनराम यांच्या ६ कृष्णमेननमार्ग या निवासस्थानी त्यांच्या पाठीराख्यांची रीघ. बंगल्याबाहेर मोटारींच्या रांगाच रांगा. आज पावसाचा पत्ता नव्हता. सकाळपासूनच गदमरत होतं. राष्ट्रपतिभवनापासून ते इंडिया गेटपर्यंत असलेल्या राजपथावर एक विचित्र अस्थिरता पसरली होती. राजपथावरच्या दुतर्फा असलेल्या हिरवळीवर साळुंक्या मजेत फिरत होत्या आणि खारी झाडाझाडांवर सैरावैरा धावत होत्या.

समाजवाद्यांच्या गोटात वेगळीच धावपळ होती. तेथे जनता पक्ष एक ठेवण्याआधी समाजवाद्यांना एकत्र ठेवण्याचा प्रश्न महत्त्वाचा होता. बाबूजींच्या घराशेजारीच मधु दंडवते यांचा बंगला आहे. तेथही गाड्यांची वर्दळ होती. पत्रकारांना तातडीनं निरोप गेला, सुरेंद्र मोहन यांनी पाच वाजता बोलवलंय म्हणून. तिथं दुपारपासून बैठक सुरू होती. ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, पन्नालाल सुराणा, बिहारचे मुख्यमंत्री राम सुंदर दास, पंजाबचे मंत्री हरभजन सिंग आणि उग्रसेन, समर गुहा, रामदेव सिंग, मधु दंडवते, चंद्रदेव प्रसाद वर्मा, समरेंद्र कुंडू, यशवंत बोरोळे, युवराज अर्जुनसिंग भादोरिया, पी. एन. सिन्हा, रामजीलाल सुमन, लक्ष्मीनारायण नाईक, दिलीप चक्रवर्ती, श्यामसुंदर दास, रामानंद तिवारी, किशन सिंग, रामदास सिंग, डी. एस. परस्ते, सी. के. पाटील, रमापती सिंग व ह. वि. कामथ हे तेवीस खासदार बैठकीत हजर असतात.

पाच वाजता पत्रकारांचा तांडा हजर होतो. दंडवते, समरेंद्र कुंडू, एस. एम. जोशी, सुरेंद्र मोहन व रामानंद तिवारी कोचावर बसतात. काही पत्रकार खुर्चीवर तर काहीजण जमिनीवरच खाली बसतात. जनता पक्ष सोडून जाणाऱ्यांचे कृत्य हे राजकीयदृष्ट्या 'अनएथिकल व 'अनफरगिव्हेबल' आहे असं सुरेंद्र मोहन म्हणतात.

जनता पक्षातले जे समाजवादी ( मधु लिमये, फर्नांडिस ) पक्ष सोडून गेले त्यांचं म्हणणं की 'इव्हेंटस हॅव ओव्हर टेकन अस ! पण एस एम त्यांना सवाल विचारतात, 'या घटना निर्माण कोणी केल्या, तुम्हीच ना ?'

१४ जुलैला रात्री समाजवाद्यांची एक बैठक भरून एसेम व जॉर्ज फर्नांडिस यांनी एकत्रितपणे निर्णय घ्यावा असं ठरलं असतानाही एसेमना न विचारताच फर्नांडिस यांनी राजीनामा द्यायचं ठरवलं असं राज्यमंत्री समरेंद्र कुंडू सांगतात. ते म्हणतात, जॉर्जनी राजीनामा देण्याची पत्रकारपरिषदेत घोषणा करण्याआधी मी त्यांना जाऊन भेटलो होतो; परंतु त्यांनी माझं ऐकायला नकार दिला !' असा तपशीलही ते देतात.

मोरारजीभाईंनी तावडतोब जनता संसदीय पक्षाची बैठक बोलवावी अशी विनंती आम्ही त्यांना करणार आहोत असं सुरेंद्र मोहन यांचं सांगणं.

पत्रकारपरिषद चालू होती तेथेच मागे भिंतीवर लोकनायक जयप्रकाश नारायण यांचं चित्र लावलेलं असतं. पक्षाची शकलं पाहणं त्यांच्या नशिबी आलेलं असतं.

पत्रकारपरिषद संपताच पत्रकारांचा मोर्चा बाबूजींच्या बंगल्यात शिरतो. तिथं फूटपाथवर, प्रवेशद्वारापाशी, हिरवळीवर बंगल्याच्या मोर्चात माणसांचे थवेच्या थवे असतात. बंगल्याच्या उजव्या कोपऱ्यात असलेल्या कार्यालयात टेलिप्रिंटरवर ताज्या राजकीय बातम्या येत असतात. एक खाजगी सचिव बातम्यांचं भेंडोळं घेऊन बाबूजींच्या खोलीकडं धाव घेत असतो. बाबूजींची पत्रकारपरिषद ठरलेली नसते. त्यांचे सेक्रेटरी पत्रकारांना आत जाऊ देत नाहीत. बाबूजीच बाहेर प्रवेशद्वारापाशी येतात. त्यांचा मूड चांगला असतो. मुखावर हास्य विलसत असतं. जाड भिंगाच्या चष्म्यातून ते मिश्कील-पणं पाहत असतात. त्यांच्या नजरेत मुरब्बीपणाची स्पष्ट झाक असते. आल्या आल्याच बाबुजी म्हणतात, 'हमारे पास कहनेको कुछ नही है!'

ते मोघम व कुठेही आपण शब्दात सापडणार नाही अशा प्रकारे उत्तरं देतात.

'राजकीय परिस्थितीबद्दल तुम्हाला काय वाटतं?'

'अजून काही चित्र स्पष्ट झालेलं नाही.'

'तुम्ही काँग्रेस पक्षात जाणार असं म्हणतात...'

'अगदी हास्यास्पद कल्पना आहे ही! मी जनता पक्षातच आहे.'

'मोरारजीभाई यांची जनता संसदीय पक्षाच्या नेतेपदी पाच वर्षांसाठी निवड झाली आहे काय?'

'हो. तशी संसदीय पक्षाच्या घटनेतच तरतूद आहे.'

'पक्षाच्या दोनतृतीयांश सदस्यांनी विरोधी मत दिलं तर नेत्यानं नेतेपद सोडावं लागतं ना?'

'घटनेत अशी काही तरतूद असल्याचं मला आठवत नाही.'

'तुम्ही श्रीमती इंदिरा गांधी यांना आज सकाळी भेटला असं वृत्त पी. टी. आय. या वृत्तसंस्थेनं दिलंय.'

त्यावर बाबुजी मिस्किलपणं उत्तरतात —

'कुठं? पी. टी. आय.च्या ऑफिसमध्ये?'

पत्रकारपरिषद आटोपते. सूर्यास्त झालेला असतो. एरवी राजधानीत सारे व्यवहार सायंकाळी सात-साडेसातपर्यंत थंडावतात. काही हॉटेलं व सिनेमागृहं काय ती चालू असतात; परंतु सध्याचे दिवस हे तुफान वेगानं घडणाऱ्या राजकीय घडामोडींचे असतात. त्या रात्री राजकीय दिल्ली जागीच असते.

चंद्रशेखर यांच्या निवासस्थानी नेहमीसारखाच दरबार भरलेला असतो. पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी राजिनामा दिल्यावर जनता संसदीय पक्षनेतेपदाचाही राजिनामा द्यायला हवा होता आणि संसदीय पक्षाची बैठक बोलवायला हवी होती; परंतु मी मोरारजीभाईंना तसं सांगणार नाही किंवा जाहीर वक्तव्य करणार नाही असं चंद्रशेखर पत्रकारांना सांगतात. हे ऑफ द रेकॉर्ड आहे, छापायचं नाही असंही बजावतात. निधर्मीपणाचा टेंभा मिरवीत पक्षातून बाहेर पडलेल्यांची टिंगल उडवीत ते म्हणाले, 'भारतीय लोकशाहीवर कधी नाही इतका पुरोगामी, समाजवादी, निधर्मी तत्त्वांचा प्रचंड मारा होत आहे!'

आपल्या पक्षाचं सरकार गेलं तरी चंद्रशेखर यांच्या बंगल्यात नेहमीचंच खेळीमेळीचं वातावरण असतं. सत्ता गेल्याचं काही वाटत नसतं; परंतु बेफिकिरीची वृत्ती आश्चर्यकारक असते.

सत्तेचा खेळ सुरू झालेला असतो. मूल्यं, ध्येयं आदि मंडळी भेदरून गेलेली असतात. त्यांची फक्त बघ्याचीच भूमिका उरलेली असते. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेने पतंग उडवायला आरंभ झालेला असतो.

आणि काटाकाटीलाही सुरुवात झालेलीच असते.

## सतरा जुलै

सकाळी १० वाजता जनता संसदीय पक्षाच्या संसदभवनातील कार्यालयात मी जातो. पाच नंबरच्या त्या खोलीत कारकूनमंडळी दचकल्यासारखी उभी. जनता संसदीय पक्षाचे चिटणीस दिग्विजय नारायण सिंग आल्यानं जरा वातावरण दबलेलं. दिग्विजयबाबू हातात आपली लाकडी डनहिल सिगरेट पेटवत असलेले. 'नव्या नेत्याच्या निवडीसाठी जनता संसदीय पक्षाची बैठक कधी घेताय्?' असं विचारता सिगरेटचा एक झुरका घेऊन ते म्हणतात, 'उद्या सायंकाळी पाच वाजता. ही पहा पत्रं रवाना होतायत.' एरवी दिग्विजयबाबूंचा रथ जमिनीपासून दोन फूट उंचावरूनच चालत असतो; पण आज मात्र ते रिलॅक्स मूडमध्ये असतात. स्वतःहोऊन माहिती देतात. जगजीवनराम आज पंतप्रधानांना सकाळी भेटले. पंतप्रधान राष्ट्रपतींना दुपारी चार ते सायंकाळी सातच्या दरम्यान भेटणार आहेत इत्यादी आणि मग ते एक बॉंबशेल टाकतात. चंद्रशेखर यांनी पंतप्रधानांनी संसदीय पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा द्यावा असे आपण म्हणालेलो नाही असा खुलासा केलाय, असं ते ठासून सांगतात.

वरवर आश्चर्य दाखवीत मी बाहेर पडतो. खरं म्हणजे काल चंद्रशेखर यांनी उलटं सांगितलं होतं. मात्र हे ऑफ द रेकॉर्ड आहे, छापायचं नाही. कारण जाहीरपणं किंवा पंतप्रधानांना भेटून आपण अशी विनंती करणार नाही असंही त्यांनी स्पष्ट केलं होतं; परंतु गरमागरम बातम्यांच्या त्या दिवशी एका वृत्तसंस्थेच्या खास प्रतिनिधीला राहवलं नाही व त्यानं ती बातमी देऊनही टाकली. सकाळी सहा वाजल्यापासून रेडिओवर ही बातमी सतत सांगितली जात होती. त्यामुळं फारच गडबड उडाली. मोरारजीभाई संतापले. त्यांच्या घरून चंद्रशेखरना फोन आला. खुलासा विचारला गेला. चंद्रशेखर यांची पंचाईत झाली. पक्षाध्यक्षानं असं विधान करणं हे त्यांना अडचणीत आणणारं होतं. त्यांनी मी असं बोललोच नाही असं सांगून टाकलं, तरी पंतप्रधानांचं पुरतं समाधान होईना. अखेर तरुण चंद्रशेखर पंतप्रधानांना जाऊन भेटले आणि त्यांनी त्यांची समजूत काढली.

११ वाजायला आलेले. सेंट्रलहॉल गजबजू लागलेला. सरबत, दूधकोल्ड्रिंक, बालूशाही आदि पदार्थ घेऊन वेटर्सची धावपळ चाललेली. आज उष्मा वाढलेला तेव्हा पंखा असेल तेथील मोक्याची जागा पकडून नेतेमंडळी बसलेली. सेंट्रल हॉलमधले पंखे नारळाच्या झाडांसारखे आहेत. एक खांब व त्याला वर तीन पाती. सोनेरी रंगाचे हे पंखे दिसतात. मजेशीर पण कमी 'हवेशीर' आहेत, तर पंख्यांच्या परिसरात गटागटानं हिशेब चाललेले. कॉंग्रेसचे सौगत राय यांनी तर तीन कोष्टकं मांडून दाखवली. समर गुहा (जनता–माजी समाजवादी) आग्रहानं सांगतात की, जनता पक्षच सरकार बनवील. जनता पक्षाचे २२० (बाहेर गेलेले पाच जण परत आले बरं!) अण्णा द्रमुकचे १८, अकाली–९, नॅशनल कॉन्फरन्स–२, रिपब्लिकन (खोब्रागडे)– २ व अपक्ष–१२ म्हणजे २६३ झाले असा त्यांचा दावा होता. गेले काही दिवस गणितं ऐकून डोकं भणभणायला लागलं होतं तेव्हा तिथून सटकलो.

एका बाकावर रामकृष्ण हेगडे, कृष्णकांत व सुरेंद्र मोहन बसलेले. सुरेंद्र मोहन अत्यंत हुशार गृहस्थ. चिकित्सक बुद्धी आणि परिस्थितीचं सुंदर विश्लेषण करण्याचं त्यांचं कसब वाखाणण्याजोगं चंद्रशेखर पंतप्रधान झाले तर उत्तम होईल; परंतु रिॲलिटी पाहिली पाहिजे. त्यामुळं सध्याच्या परिस्थितीत बाबू जगजीवनराम यांनाच पाठिंबा देणं योग्य ठरेल असं ते म्हणतात. इतक्यात एक पत्रकार येऊन ताजी खबर देतो. कॉंग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत चांगलीच शाब्दिक चकमक झडलीय्. चरणसिंगना पाठिंबा देण्याबाबत कॉंग्रेस पक्षात दुमत आहे. ही बातमी येऊन थडकताच धमाल उडते. कॉंग्रेस पक्षात फूट पडली तर कितीजण जगजीवनरामच्या बाजूला येतील याचे तर्क मांडले जातात. नवी गणितं सुरू होतात.

१ वाजायला आलेला असतो. पार्लमेंटमधलं कॅंटिन गजबजायला लागलेलं असतं. दारावरचे व्हेल्वेटचे पिवळे पडदे सारून कॅंटिनमध्ये शिरतो तोच पी. जी. मावळंकर भेटतात. नेहमीसारखीच प्रसन्न मुद्रा आणि बोलणंदेखील प्रसन्नच. विचारानं भरलेलं पण सोपं. मावळंकर हे अपक्ष सदस्य. तुम्ही काय ठरवलंत? असं विचारता ते म्हणतात, 'मला राष्ट्रपतींनी बोलावून तुमचा कोणाला पाठिंबा आहे ते लिहून मागितलं तर मी नकार देईन. मला माझ्या मतदारांनी लोकसभेवर निवडून दिलं. तेव्हा मी जी काय भूमिका मांडीन ती सभागृहात!' त्यांचं लॉजिक पटणारं असतं.

जेवण उरकून समाजवाद्यांच्या मठीवर म्हणजे मधु दंडवते यांच्या घरी आम्ही दोन–चार पत्रकार दाखल होतो. तीन वाजायला आलेले असतात. काळजीवाहू मंत्रिमंडळाची बैठक तीन वाजता बोलविण्यात आलेली असते. आजारातून बरे होत असलेले मधु दंडवते त्या बैठकीला हजर राहण्यासाठीं निघतात. पन्नालाल सुराणा मुंबईला परतण्याच्या तयारीत असतात. आम्हाला भेटतात नानासाहेब गोरे. आदल्याच दिवशी गोरे व एसेम, यशवंतराव चव्हाण यांची भेट घेऊन आले होते. कॉंग्रेस पक्षाचा कल चरणसिंग यांना पाठिंबा देण्याचा दिसला, असे गोरे म्हणतात. जनता पक्षातच राहण्याचा निर्णय घेतलेल्या तेवीस माजी समाजवादी खासदारांनी जगजीवनराम यांना पाठिंबा द्यायचं ठरवलेलं असतं.

जनता संसदीय पक्षाचा राजीनामा दिलेल्या जॉर्ज फर्नांडिस यांना आपण घाईघाईने निर्णय घेण्यात चूक झाली असं वाटत असून ते आता फेरविचार करताहेत अशी कुणकुणही तिथंच लागते.

पंतप्रधान मोरारजी देसाई दुपारी साडेचार वाजता राष्ट्रपतींना भेटणार असतात. आमची स्कूटर राजपथावरून धावू लागते. प्रजासत्ताकदिनाचं भव्य संकलन याच पथावरून होत असतं. समोर राष्ट्रपतींचा प्रासाद. त्याच्या एका बाजूला साउथ ब्लॉक व दुसऱ्या बाजूला नॉर्थ ब्लॉक या सरकारी कचेऱ्यांच्या इमारती, त्यात पंतप्रधान, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री व गृहमंत्री यांची कार्यालयं. मग थेट इंडियागेटपर्यंत दोन्ही बाजूंना हिरवळ व यापलीकडं एकेका मंत्रालयाच्या इमारती. हे जसं आहे तसंच होतं; पण पोरकं वाटत होतं.

राष्ट्रपतिभवनात राष्ट्रपती ज्या भागात राहतात त्याच्यापाशी जाऊन आम्ही पोचतो. छायाचित्रकारांचा व इतर पत्रकारांचा तांडा हजर असतोच. दारातून आतला पॅसेज दिसत असतो. घटनेवर स्वाक्षऱ्या होतानाचं एक पेंटिंग समोरच्या भिंतीवर असतं. अगदी समोर गौतमबुद्धाचा पुतळा असतो. छतावर सोनेरी नक्षी असते व झुंबरं लटकत असतात. खाली मऊ गालीचा. बरोबर साडेचारला पांढऱ्या ॲम्बॅसॅडरमधून पंतप्रधान व त्यांचे खाजगी सचिव टोणपे उतरतात आणि राष्ट्रपतींच्या भेटीस रवाना होतात. भेट बराच वेळ चालते. पत्रकार ताटकळतच असतात. साडेपाच वाजता इंपोर्टेड मोटारीतून आंध्रमधील इंदिरा कॉंग्रेस सरकारचे मुख्यमंत्री डॉ. चेन्ना रेड्डी येतात. त्यांना आरंभी वाटतं पत्रकार आपल्यासाठीच थांबले आहेत. क्षणातच त्यांचा भ्रमनिरास होतो. ते आत गेल्यावर पाचसात मिनिटांतच पंतप्रधान बाहेर येतात.

दोन दिवसांपूर्वी आपला राजिनामा सादर करायला पंतप्रधान आले होते, तेव्हा इथंच छायाचित्रकारांनी त्यांचे फोटो घेतले होते. त्याचा संदर्भ मनात ठेवून मोरारजीभाई म्हणतात, 'परवाचाच फोटो वापरायचा; आता पुनः कशाला?' मला काहीही सांगायचं नाही असं म्हणत ते आपल्या मोटारीकडं निघतात. पत्रकार कोंडाळं करून त्यांच्याभोवती उभे राहतात. एक विचारतो, 'तुम्ही जनता संसदीय पक्ष नेतेपदाचा राजीनामा द्यावा असं राष्ट्रपतींनी सांगितलं का?'

मोटारीकडं निघालेले मोरारजीभाई गर्रकन वळतात आणि म्हणतात, 'ते कसं सांगतील?' त्यांनी मला भेटीला बोलावलं होतं.'

'तुम्ही पक्षनेतेपदाचा राजिनामा देणार का?'

'मी राजिनामा देणार नाही!'

'पक्षसदस्यांच्या विनंतीवरून जनता संसदीय पक्षाची बैठक बोलावली गेलीय् का?'

'मीच संसदीय पक्षाची बैठक बोलाविली आहे.'

'राष्ट्रपतींशी समाधानकारक चर्चा झाली का?'

'मी तुमच्याशी, सर्वांशीच समाधानी असतो.'

'पुढं काय?'

'मी काहीही सांगणार नाही!' एवढं बोलून ते गाडीत बसतात आणि रवाना होतात.

मी संसदीय पक्षनेत्याचा राजिनामा देणार नाही हे त्यांचं वाक्य अनेकदा प्रतिध्वनी यावा तसं घुमत राहतं. संसदेच्या परिसरात चर्चा

पृष्ठ २० वर

बिंदु कथा

# मोहीम

बिंदुसार

महामंडळाच्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील प्रशस्त सभागृहात सभा होती. इमारतीसमोरच्या रस्त्यावर, सुमारे पंचवीस मोटारींची रांग उभी होती. तिच्यावरून सभेचे महत्त्व स्पष्ट होत होते.

आपल्या शेजारच्या, दोन्ही बाजूंच्या बड्या अधिकाऱ्यांशी हाउसिंग सेक्रेटरी श्री. साठे, आय. ए. एस. हे जुजबी हास्य-विनोद करीत होते. मध्येच सभागृहात नजर फिरवून आणि कोण कोण यायचे राहिले आहेत त्याचा अंदाज घेत होते. ठरलेल्या वेळेला सभा सुरू करणे आवश्यक होते; पण अद्याप काही आमंत्रित यायचे होते.

मागच्या रांगा पकडून, तुरळक बसलेले बडे अधिकारी हलक्या आवाजात गप्पा मारीत होते. दोन–चार जणांनी सिगारेटी पेटविल्या होत्या.

'आमची स्केल्स रिव्हाईज होत नाहीत. अजून घोळ चालला आहे.'

'परवा दिल्लीला मिनिस्टर काय आचरटासारखं बोलले हो मीटिंगमध्ये!'

'इंडियन एअर लाइन्सची सर्व्हिस खराब होणार आहे तरी किती?'

'एमडींना मी सरळ सांगितलं–धिस् केसिस कॅनॉट कंटिन्यू.'

अशा वाक्यांचे तुकडे हवेत उधळत होते. एअरकंडिशण्ड सभागृहात, धुराचा वास कोंडू लागला होता. काहीजण घड्याळाकडे अधीर दृष्टिक्षेप करीत होते.

अर्बन डेव्हलपमेंट कमिशनर श्री. दट्टाणी, आपला अवजड देह सावरीत गडबडीने सभागृहात आले. त्यांच्या मागोमाग आणखी दोन-चार सूटवाले आले.

स्थिरस्थावर होताच हाउसिंग सेक्रेटरी सेठ यांनी अर्धवट स्वगत पृच्छा केली.

'शॅल वी बिगिन?'

'हो हो–शुअर–आधीच उशीर झाला आहे,' असे उद्‌गार निघाले.

चर्या निर्विकार करीत सेठनी समोरच्या कागदपत्रांची चाळवाचाळव केली. नेहमीचा चष्मा एका हातात काढून घेत, दुसऱ्या हाताने, वाचायचा चष्मा त्यांनी डोळ्यावर चढवला. टेबलावरच्या कागदाकडे दृष्टी टाकीत ते म्हणाले,

'मागच्या वर्षीच्या गांधीजयंतीला सरकारने हरिजनांसाठी स्वस्त घरे बांधण्याचा कार्यक्रम जाहीर केला. साडेसात कोटी रुपये या कार्यक्रमावर खर्च व्हावयाचे आहेत असे उद्दिष्ट आहे. या रकमेत तीस हजार घरे तयार होतील. प्रत्येक घरामागे दहा टक्के सबसिडी आहे.' त्यांचे बोलणे सुरू असताना कडक पांढऱ्या युनिफॉर्ममधल्या दोन जमादारांनी चहाबिस्किटे आणून प्रत्येकासमोर ठेवण्यास सुरुवात केली.

सेठ या व्यत्ययाने अवस्थ झाले. वाचायचा चष्मा काढून घेऊन त्यांनी पुन्हा नेहमीचा चष्मा डोळ्यांवर चढवला आणि जरा जादा थंडपणे विचारले.

'शॅल आय कंटिन्यू?' सभोवर नजर फिरवीत त्यांनी चष्म्यांची पुन्हा अदलाबदल केली. आपला अधिकार समोरच्यांवर ठसविण्यासाठी ते ही लकब वापरीत होते हे स्पष्ट दिसत होते.

समोरच्या रांगेतील लोकांनी चहाचे कप तोंडाला लावीत होकारार्थी मान हलवली. सेठ पुढे ठाशीव आवाजात बोलू लागले.

'हा मार्चमहिना चालू आहे. नियमाप्रमाणे मार्चअखेरीस सर्व तरतूद खर्च व्हावयास पाहिजे; पण सरकारने खास जी. आर. काढून जूनपर्यंत 'स्पिल ओव्हर' करण्यास परवानगी दिली आहे. इज इट नॉट सो, दट्टाणी?' पुन्हा चष्म्यांची अदलाबदल झाली.

टायवर पडलेला बिस्किटाचा ओला तुकडा निपटून टाकीत असलेल्या दट्टाणींनी दचकून वर पाहिले व यांत्रिकपणे ते म्हणाले,

'येस सर–आपणच खास एफर्ट्स केले त्यासाठी.'

समाधानाचे सूक्ष्म हसू केवळ ओठ दुमडून दर्शवीत सेठनी पुढे भाषण चालू केले 'सरकार या कार्यक्रमाविषयी अतिशय कन्सर्न्ड आहे. मला वाटतं आतापर्यंत काय प्रगती झाली त्याचा आढावा घेतला तर ठीक होईल.'

एका संस्थेचे नाव घेऊन शार्पली सेठनी विचारले.

'यांनी किती घरे फायनान्स केली?'

मागच्या रांगेतला एक सफारी सूटवाला धडपडत उठला आणि काही तरी पुटपुटला.

'आमच्या बोर्डाकडून या कार्यक्रमासाठी अद्याप मंजुरी आली नाही.'

सेठनी अतिरेकी आश्चर्याने त्याच्याकडे पाहिले व ते म्हणाले, 'सरप्राइजिंग! हा कार्यक्रम युद्धपातळीवर राबवायचा अशा ऑर्डर्स आहेत. बरं, तुम्ही किती अर्ज गोळा केले?'

'पंचवीस' फाइल पहात सफारी सूटने उत्तर दिले. हास्याची एक मंद लकेर सभागृहात उठली.

सेठ दट्टाणींकडे वळून म्हणाले, 'यांच्या बोर्डाला एक डी. ओ. लेटर तयार करा–नेक्स्ट?'

यानंतर एकामागोमाग एक आमंत्रित उठून त्यांनी आकडेवारी दिली. तिचा मथितार्थ एवढाच होता की, हरिजनांना घरे बांधून देण्याच्या कार्यक्रमावर एकूण चाळीस हजार रु. सर्वांनी मिळून वाटले होते. दोनशे अर्ज दप्तरी पडून होते. घर मात्र अजून एकही बांधून झाले नव्हते. निरनिराळ्या सरकारी खात्यांबाबत उपस्थितांनी अनेक तक्रारी केल्या.

बराच वेळ असा गदारोळ चालू राहिला. सेठनी घड्याळात पाहिले आणि घसा साफ करून ते म्हणाले,

'जंटलमेन– जून महिन्यापर्यंत हा कार्यक्रम पुरा करण्याचा सरकारचा निर्धार आहे– एवढेच नव्हे तर या कार्यक्रमाची एकूण तरतूद पाच कोटी रुपयांनी वाढवून साडेबारा कोटी करण्यात आली आहे. आजच्या मीटिंगचा उद्देश हा आहे की, ही जादा तरतूद तुमच्यामध्ये अ‍ॅलोकेट करायची.'

दट्टाणींनी एक कागद सेठपुढे सरकवला व त्यांच्या कानात काही तरी सांगितले. किंचित हसून सेठनी समोरच्या माणसाला विचारले, 'तुम्ही किती घेता?'

घुटमळत तो अधिकारी म्हणाला, 'साहेब, आम्हाला अगोदरच पन्नास लाखांचे टार्गेट दिले आहे.'

'मग तुम्ही पंचाहत्तर लाखपर्यंत कमिटमेंट करा– बाय द वे, आतापर्यंत तुम्ही किती रक्कम वाटली?'

'दीड लाख मंजूर केली आहे; पण एक अडचण आहे, साहेब!'

'ठीक आहे.' सेठ हात हवेत फिरवीत म्हणाले, 'तुम्ही आम्हाला पत्र लिहा– आम्ही सर्व अडचणी दूर करू.'

मग भराभर सेठनी कागदावरील आकडे वाचून सर्वांचे टारगेट वाढवून दिले. लोक कुजबुजत होते; पण फारसे कोणी काही बोलले नाही.

जंत्री वाचून होताच सेठनी पुन्हा नेहमीचा चष्मा लावला व ते खुर्चीवर मागे रेलले.

दट्टाणी उठून उभे राहिले व टायवर हात फिरवीत म्हणाले, 'आजची मीटिंग फारच उपयुक्त झाली. मुद्दाम येथे येऊन सेठसाहेबांनी मार्गदर्शन केलं त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आपण सर्व येथे आलात त्याबद्दल–' खुर्च्यांची सरकवासरकवी सुरू झाली. लोक उठले– पांगापांग होऊ लागली. गर्दीतून वाट काढीत एक सूटवाले दट्टाणींपाशी आले व वाकून हलकेच म्हणाले, 'साहेब, एखादा खराबडहमवा बंगला आहे का पाहणार? ना जरा माझा रेसिडेन्स चेंज करीन म्हणतो.' ❑

## बिवलीच्या गावकऱ्यांमध्ये आत्मशक्तीची ज्योत जागवणारा

# गोपाळदादा पवार

विनय सहस्रबुद्धे

उद्धरेत् आत्मनात्मानम्
आत्मानमवसादयेत् ॥

असं एक संस्कृत वचन प्रसिद्ध आहे. 'उद्धारावा स्वये आत्मा' असा त्याचा साधा सरळ अर्थ मला माहीत होता; पण परवा चिपळूणजवळ बिवलीला गोपाळदादा पवार यांच्या प्रेरणेने गावकऱ्यांनी सामूहिक प्रयत्नातून गावच्या सर्वांगीण विकासाचा जो प्रयोग घडवून आणला आहे, तो पाहिल्यावर उद्धरावा स्वये आत्मा हा या संस्कृत वचनाचा अर्थ मला खऱ्या अर्थाने समजला.

बिवलीच्या या 'ग्रामोदयाच्या' प्रयोगाची बातमी समजली ती लोकराज्य या सरकारी साप्ताहिकातून. दारूबंदीपासून सुरुवात करून, श्रमदानातून घरबांधणी, त्यानंतर हुंडाबंदी, अस्पृश्यताविरोध इ. आर्थिक, सामाजिक उपक्रमांपर्यंत यशस्वी झालेल्या या प्रयोगाची अधिक माहिती मिळवावी, गोपाळ पवार व त्यांच्या सहकाऱ्यांशी सविस्तर बातचीत करावी या उद्देशाने बिवलीला जाण्याचं ठरवलं.

चिपळूणहून बिवलीला जायचं तर कापरा गावावरून जाणाऱ्या बसनं जावं लागतं; पण कापरा ते बिवली हा रस्ता कच्चा असल्यानं पावसाळ्यात बंद असतो. एस. टी. बस कापऱ्यापर्यंतच जाते. पुढे तीन-साडेतीन मैल पायी जावं लागतं. माझ्याबरोबर बिवलीला जाणारा एक लाकडाचा व्यापारी होता. चांगला बोलका होता. त्यामुळं चिपळूण ते कापरा या तास-दीड तासाच्या प्रवासात त्यानं गोपाळ पवार, आमदार राजाराम शिंदे, रत्नागिरी जनता पक्ष, पूर्वीचं काँग्रेसचं राजकारण इ. अनेक विषयांवर सुरस आणि चमत्कारिक माहिती पुरवली.

कापऱ्यापर्यंतचा रस्ताही तसा अर्धाकच्चाच आहे. कोकणचं निसर्गवैभव या रस्त्यावर ठायी ठायी दिसून येतं. कापऱ्याहून बिवलीला नेणारा पायरस्ताही असाच डोंगरकड्यांच्या अंगाखांद्यावरून जातो. वळणावळणाचा हा मार्ग बिवलीच्या शाळेपाशी संपतो. बिवलीच्या शाळेची ही घरकुलवजा इमारतही गोपाळ पवारांच्या प्रेरणेनं श्रमदानातून उभारण्यात आल्याचं समजलं. या शाळेच्या पुढं एका पाऊलवाट बिवलीच्याच एका वाडीकडे जाते. गर्द झाडीत लपलेली ही वाडी लाकडाच्या व्यापाऱ्यांची असल्याचं समजलं. थत्ते आडनावाच्या एका लाकूडव्यापाऱ्याशी ओळख झाली. गृहस्थ मोठा बोलका ! बिवलीबद्दल त्यांनी बरीच माहिती दिली. बहुसंख्य थत्तेकुलोत्पन्नांचं बिवली हेच मूळ गाव असल्याचं त्यांनी सांगितलं. रामशास्त्री प्रभुण्यांनंतर पेशव्यांनी ज्यांना न्यायाधीश म्हणून नेमलं ते न्यायमूर्ती थत्ते बिवलीचेच ! थत्त्यांची ही माहिती खरी असल्याचं पुढं लक्षात आलं. कारण बिवली, कापरा, चिपळूण या गावांच्या पंचक्रोशीत किमान दीड-दोन डझन थत्तेपरिवार असल्याचं समजलं.

बिवलीतल्या वनराईत लपलेल्या या खालच्या वाडीतून वर गोपाळ पवार जिथे रहातात त्या धरणवाडीत आम्ही जायला निघालो. डोंगराच्या कडेकडेनं अरुंद, दगडाळ आणि वळणावळणाच्या पाऊलवाटेनं किंचित उताराचा मार्ग उतरावा लागतो. वाट इतकी अरुंद आणि निसरडी होती पण तिची चिंता आम्हालाच ! आमच्याबरोबर थत्त्यांची सात-आठ वर्षांची दोन मुलं वाट दाखवायला आली होती ती मात्र माकडासारखी पटापट उड्या मारून पुढं पुढं जात होती. ज्या डोंगराच्या माथ्यावर बिवलीची धरणवाडी आहे, त्याच डोंगराच्या पायथ्याशी एक बारीकशी नदी आहे. गुडघाभर पाण्यातून ती नदी ओलांडून आम्ही चढ चढायला सुरुवात केली, खूपसा सरळ असलेला हा शे–दोनशे मीटर उंचीचा चढ चढताना चांगलीच दमछाक झाली. बिवली गावात पाण्याची सोय नाही. त्यामुळे बिवलीकर-गृहिणी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या या छोटेखानी नदीचंच पाणी कळशा-दोन कळशा भरून सकाळ–संध्याकाळ हा चढ चढून घेऊन येतात हे जेव्हा समजलं तेव्हा मनातल्या मनात त्या गृहिणींना मी साष्टांग दंडवत घातला !

चढ चढून हाश–हुश करीत वर आलात की, कोकणात क्वचितच दिसणारी मंगलोरी कौलांनी शाकारलेली चहूबाजूंनी उतरत्या छपरांची टुमदार घरं दिसू लागतात. हीच बिवलीची धरणवाडी. एक-दोघांना विचारत विचारत आम्ही गोपाळ पवारांच्या घरी येऊन पोहोचलो.

पवारांचं घरही चांगलं ऐसपैस आहे. कोण, कुठून आलो वगैरे झाल्यावर गोपाळरावांचा मुलगा शेतावर गेलेल्या आपल्या वडिलांना बोलवायला गेला.

पाच–दहा मिनिटांतच गोपाळ पवार आले. बोडकं डोकं, बसलेल्या गालांचा चेहरा, एक वेगळीच चमक असलेले डोळे, पानानं रंगलेले तोंड, काळाकभिन्न तगडा देह, कमरेला साधी लंगोटी, तिलाच लटकणारं खुरपं, मर्ढेकरांनी वर्णन केलेल्या कातीव काळ्या सागवानासारख्या मांड्या अशा रूपात ७३ वर्षांचे गोपाळराव पवार

माझ्यासमोर उभे राहिले तेव्हा अवध्या गावाचा कायापालट करणारे ते गोपाळराव हेच काय ? असा प्रश्न माझ्या मनात आला.

आम्ही राजाराम शिंद्यांकडून आल्याचं सांगताच त्यांचा चेहरा भक्तिभावानं फुलून आला. हवापाण्याच्या गोष्टी झाल्यावर माजघरातून बिनदुधाचा पण तरीही लज्जतदार चहा आला नि मग गाडी मूळ मुद्द्यावर आली.

'पंधरा वर्षांपूर्वी दारू म्हणजे गावकऱ्यांचं दैवत होतं, लोक दारू पियाले की काम घडायचं नाही. मग पैसा कुठून येणार ? अशा प्रस्तावनेनं गोपाळरावांनी पंधरा वर्षांपूर्वी सुरू केलेल्या प्रयोगाची साद्यंत हकीगत सांगायला सुरवात केली.

कोकणातच काय पण सर्वत्रच लहान लहान खेड्यांमधूनही दारूचे गुत्ते असतात आणि आहेतही. पंधरा वर्षांपूर्वी तसे ते बिवलीतही होते. सूर्यास्ताच्या सुमारास गावकरी एकत्र जमत आणि सामुदायिक मदिराप्राशन सुरू होई. गावात जशी दारू होती, तसेच दारूचे दुष्परिणामही होते. दारू पिऊन लोकं झिंगायची आणि आपसात कडाडून भांडायची. त्यातून दोन कुटुंबांत जन्माचं वैर निर्माण व्हायचं. पुढं पुढं दारूचं हे प्रस्थ आटोक्याबाहेर जाऊ लागलं. काळवेळ न पाहता सकाळ–संध्याकाळ कोवळी तरुण मुलंसुद्धा गावठी दारू पिऊन दारूच्या नशेत दिवसभर लोळत पडू लागली. यांच्यापैकी ज्यांची लग्नं झाली होती त्यांचे संसार उघड्यावर पडले. तरुण मुलं वडीलधाऱ्यांचा मान राखेनाशी झाली. हे सारं मला खूपच विचित्र वाटत होतं.' असं गोपाळरावांनी सांगितलं.

खुद्द गोपाळरावांनी दारू पिणं हे व्यसनात जमा होण्यापूर्वीच दारू सोडली होती. गावालाही दारूचे दुष्परिणाम समजावून सांगून दारू सोडण्यासाठी त्यांची मनं वळविणं आवश्यक आहे हे गोपाळरावांनी जाणलं. प्रथम समवयस्क प्रौढांशी त्यांनी विचारविनिमय केला नि मग गावकऱ्यांची एक सभा घ्यायची असा निर्णय त्यांनी घेतला. वाघजाई या ग्रामदेवतेच्या देवळातच बोलाविलेल्या या सभेत पाचसातशे लोकवस्तीच्या या गावातील झाडून सारे कुटुंबप्रमुख त्या दिवशी मोठ्या उत्सुकतेनं आले. गोपाळरावांनी नीटपणे सगळ्यांना आपल्या मनातला हेतू समजावून सांगितला. त्यासाठी काय करायला हवं हेही समजावून सांगितलं. या सभेची हकिगत मोठ्या समाधानानं सांगताना गोपाळराव म्हणाले, 'दारूचा वाईटपणा सगळ्यांना ठाऊक होता, त्यामुळे मी सांगेन तसं वागायला सारेजण तयार झाले.'

ठरलं ! दारू सोडायची. वाघजाईदेवीच्या साक्षीनं गावकऱ्यांनी प्रतिज्ञा केली की इथून पुढे दारूच्या थेंबाल्याही शिवायचं नाही आणि सुखद आश्चर्याची गोष्ट म्हणजे गावातल्या सर्वच गावकऱ्यांनी पंधरा वर्षं हा नियम अत्यंत कसोशीनं पाळला आहे आणि तोही केवळ बिवलीतच नव्हे, तर बिवलीबाहेरही. आज शंभरावर बिवलीकर तरुण, चाकरमाने म्हणून मुंबईत आहेत; पण तेही कधी दारूला स्पर्श करीत नाहीत असं गोपाळरावांनी अभिमानानं सांगितलं.

त्यातूनही चुकूनमाकून एखाद्यानं दारू प्यायलीच तर ? गावकऱ्यांकडे त्याही प्रश्नाचं उत्तर आहे. मुळात असं प्रकरण क्वचित कुठं तरी घडतं. तसं ते घडलंच तर त्या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार घालण्यात येतो. दारू पिणारा दारूपासून परावृत्त व्हावा यासाठी हे हत्यार चांगलं लागू पडतं असं एकूण मत दिसून आलं.

## 'ग्रामनिधी'

पण नुसतं दारू सोडून भागणारं नव्हतं. गोपाळरावांनी ठरवलं की या निमित्तानं गावकरी एक झाले आहेत. तेव्हा या एकीचा फायदा घेऊन गावाच्या भल्यासाठी आणखी जे जे करता येईल ते ते केलं पाहिजे. गावकरी दारू प्यायचे, त्यात प्रचंड पैसा खर्च व्हायचा. गोपाळरावांनी प्रत्येक गावकऱ्याकडे हा जो वाचलेला पैसा होता त्यातून गावासाठी फंड जमा करायला सुरवात केली. देवळातच एका पेटीत हे पैसे टाकायचे असा नियम घातला गेला आणि 'ग्रामनिधी' गोळा होण्यास सुरवात झाली. मजुरी हे गावकऱ्यांचं एक उत्पन्नाचं साधन ! त्यातूनही थोडी भर या ग्रामनिधीत घालावी असं ठरलं. आठवड्यातील एका दिवसाची मजुरी सगळ्यांनी गावासाठी द्यायची असा निर्णय झाला. गोपाळराव म्हणाले, 'वर्षाकाठी प्रत्येकाचे हजार-बाराशे रुपये दारूत जात होते. ते सारेच्या सारे गावाला मिळाले. शिवाय गावकऱ्यांना चांगलं वळण लागलं ते वेगळंच.'

या पैशाचा विनियोग कसा करायचा ? याच पैशातून पावसाळ्यात असुरक्षित अशा गवताच्या घरांऐवजी आम्ही कौलांची घरं उभारण्याची योजना आखली. पाळीपाळीनं प्रत्येकाचं घर सर्व गावकऱ्यांनी बांधून द्यायचं. सुतारकाम, गवंडीकाम, लोहारकाम, ज्याला जे जमेल ते त्यानं करावं. सुबकसं भक्कम दगड-विटांचं घर उभं राहिल्यावर ते कौलांनी शाकारून द्यायचं, तेही सामूहिकपणे, सर्वांनी मिळून. घरबांधणीच्या या मोहिमेत प्राधान्य देण्यात आलं ते एका विधवेच्या घराला. होता-करता सर्वांचीच घरं बांधून पूर्ण झाली.

गोपाळरावांनी एकामागून एक विधायक कामं हाती घेण्याचा जणू विडाच उचलला होता. घरबांधणी झाली तरी गावाचा फंड संपलेला नव्हता. त्यातून मग जातिवंत हापूस आंब्यांची ५०० कलमे विकत आणून गावकऱ्यांना वाटण्यात आली. गावात शिक्षणाची सोय नव्हती, त्यासाठी एक शाळेची इमारत श्रमदानातून बांधण्यात आली. खटपट करून शाळेला जिल्हा परिषदेची मान्यता मिळवण्यात आली; पण नुसती शाळा बांधून गावकरी थांबले नाहीत. प्रत्येक घरातली मुलं नियमितपणे शाळेत जातील याकडेही त्यांनी लक्ष दिलं.

'गावाची प्रत्येक समस्या गावानेच सोडवावी. त्यासाठी सर्वांनी एकीने, परस्परांच्या सहकार्याने, पडेल ते काम केलं पाहिजे' अशी भावना बाळगणाऱ्या गोपाळदादा पवारांनी बिवलीची पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी गावकऱ्यांना चिकाटीने जे प्रयत्न करायला लावले त्यांचं मोल असामान्य आहे. पिण्याच्या पाण्यासाठी डोंगरमाथा उतरावा लागू नये यासाठी गावातच विहीर खणायची असा निर्णय गावकऱ्यांनी घेतला. नेहमीप्रमाणे सामुदायिकपणे श्रमदानाला सुरवात झाली. चांगलं चार–पाच पुरुष खोल खणून झालं; पण पाण्याचा पत्ता नाही; तरी गावकरी हताश झाले नाहीत. आणखी एकदा प्रयत्न करून पहायचं त्यांनी ठरवलं. दुर्दैवानं त्यालाही यश आलं नाही. अगदी अलीकडे पुन्हा एकदा नव्या ठिकाणी विहीर खणण्यात आली; पण कोकणच्या पाषाणहृदयी जमिनीला पाझर काही फुटू शकला नाही !

इतकं झालं तरी प्रगतीची आस संपलेली नव्हती. गोपाळरावांनी सबंध गावासाठी दुग्धव्यवसायाचा प्रयोग करून पहायचं ठरविलं. बँकेचं कर्ज काढून पंधरा–वीस म्हशी विकत घेण्यात आल्या आणि दुधाचा धंदा सुरू झाला. गावकरी आता सरासरी प्रत्येकी तीन–चार

लिटर दूध सरकारी योजनेत देतात आणि चांगला पैसा मिळवितात.

गोपाळ पवारांच्या प्रयत्नांतून बिवलीकर स्वाभाविकच आर्थिक-दृष्ट्या संपन्न बनत गेले. लिहिता-वाचता देखील न येणाऱ्या गोपाळरावांच्या मनात आलं, 'गावकऱ्यांना बचतीची सवय लावायला हीच योग्य वेळ आहे.' त्यांनी गावकऱ्यांपुढं काही बचतीच्या योजना ठेवल्या आणि गावालाही त्या कल्पना पटल्या. आज एकूणएक गावकऱ्यांचं पोस्टात बचतखातं आहे आणि खात्यात बऱ्यापैकी बचतीची रक्कम आहे.

पंधरा वर्षांपूर्वी आधी स्वत: दारू सोडून, नि मग अवघ्या गावाला दारू सोडायला लावून गोपाळराव पवारांनी गावाच्या विकासाची जी वाटचाल सुरू केली तिची आणखीही काही वैशिष्ट्ये आहेत. गावफंडाचा योग्य तऱ्हेनं उपयोग व्हावा म्हणून त्यांनी काही चांगल्या प्रथा पाडल्या.

बिवलीसारख्या दळणवळणाची सोय नसलेल्या गावात आजारी व्यक्ती किंवा बाळंतीण यांना आवश्यक तेव्हा त्वरित मदत मिळण्याची सोय नाही. गोपाळरावांनी प्रथा पाडली की जेव्हा असा प्रसंग येईल तेव्हा पाळीपाळीने चार-पाच जणांनी मिळून डोली करून त्या व्यक्तीला जवळच्या कापरा गावापर्यंत पोहोचवायचं. शिवाय एखादं महत्त्वाचं ऑपरेशन असेल तर त्यासाठी गावफंडातून ५०० रुपये देण्याचीही प्रथा त्यांनी सुरू केली.

त्याचबरोबर एखादी व्यक्ती मृत पावल्यानंतर अंत्यविधीसाठी तिच्या कुटुंबियांना ४५ रु. देण्याचीही पद्धत त्यांनी सुरू केली.

लग्नकार्याच्या निमित्तानं प्रचंड पैसा खर्च व्हायचा. त्यात कपात व्हावी म्हणून गोपाळरावांनी सामुदायिक लग्नं सुरू केली आणि प्रयत्नपूर्वक हुंड्याची पद्धतही थांबविली.

अस्पृश्यतेबद्दल मी प्रश्न विचारला तेव्हा गोपाळरावांनी स्वच्छच सांगितलं की, गावात औषधालाही भेदाभेद दिसणार नाहीत. गावात तीन-चार ब्राह्मणांची घरं आहेत; पण ते अजिबात अस्पृश्यता पाळत नाहीत.

सविस्तर गप्पा झाल्यावर गोपाळरावांसह मी जेव्हा सबंध गाव बघितला, या गावकऱ्यांची घरं बघितली तेव्हा असं जाणवलं की, या गावचे गावकरी खाऊनपिऊन सुखी आहेत. 'आमच्या गावात कोणीही कधीही बेकार राहू शकत नाही.' असं गोपाळराव आवर्जून सांगतात.

गावाच्या विकासाची विविध कामं हातात घेतानाच गावफंड जसाच्या तसाच रहावा यासाठीही गोपाळरावांनी प्रयत्न केले. 'आम्ही सारे गावकरी एकत्रितपणे काही कामाची कंत्राटं पुरी करून देतो. (उदा० पाटलाचं शेत लावणं, नांगरणं, कुंपण घालून देणं इ.) यातून जो पैसा आम्हाला मिळाला तो आम्ही ग्रामनिधीत उपयोगाला आणला.' असं गोपाळरावांनी सांगितलं.

बिवलीच्या या अवघ्या विकासाची गंगोत्री म्हणजे गोपाळरावांनी सुचविलेली व गावानं अमलात आणलेली दारूबंदी! त्यामुळं एकूण दारूबंदीबद्दल व तिच्या अंमलबजावणीबद्दल गोपाळरावांना काय वाटतं हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला, तेव्हा गोपाळराव म्हणाले— 'दारू सोडायची असा ज्याचा त्यानं निश्चय केला तरच दारूबंदी येऊ शकेल. दारूबंदीचा कायदा करून दारूपासून लोकांना वाचविता येणार नाही. शिवाय पोलिसांच्या माध्यमातून दारूबंदी राबविण्यात काहीच तथ्य नाही. माझ्या मते प्रत्येकानं आधी आपल्या घरापासून सुरुवात केली तर दारूबंदी होणं कठीण नाही.'

पंधरा वर्षं गोपाळरावांनी समाजसेवेचे, गावकऱ्यांमधला वयंकार जागृत करण्याचं हे जे महान कार्य पार पाडलं त्याला आमदार राजाराम शिंदयांनी प्रकाशात आणलं. त्यांच्या प्रयत्नातूनच अखेर गोपाळरावांच्या या महान कार्याची नोंद घेणारा 'गोपाळदादा' हा चित्रपट राज्यसरकारच्या चित्रपटविभागातर्फे प्रकाशित झाला आहे. गेल्या २० एप्रिलला मुंबईत मुख्यमंत्री शरद पवार यांच्या हस्ते गोपाळरावांचा जाहीर सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी गोपाळरावांच्या या अलौकिक कामाचा गौरव तर केलाच; पण बिवलीला पाणी आणि वीज मिळवून देण्यात अग्रक्रम देण्याची गोपाळरावांची विनंतीही मान्य केली. या सगळ्याचा परिणाम इतका चांगला झाला की, मालदोली, करबोणे, भिला, भोंग, कापरा, गोंदला इ. आसपासच्या बऱ्याच गावांनी गोपाळरावांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या गावात दारूबंदी राबविण्याचा निर्णय घेतला आहे

हे सारं गोपाळरावांना सुचलं तरी कसं? गोपाळरावांनी सांगितलं की, लहानपणापासूनच कोणी कुणाला नाडत असेल पीडत असेल तर मला वाईट वाटायचं. मी त्या असहाय पीडिताच्या मदतीला नेहमी धावून जायचो.

७२ वर्षांचे गोपाळराव आजही रोज आठ तास काम करतात. गोपाळरावांना एकूण चार मुलं आणि दोन मुली. दोन मुलं मुंबईत कामाला असतात आणि मुलींचीही लग्नं झाली आहेत. त्यामुळं गोपाळरावांचा परिवार आता सर्वच दृष्टींनी सुखी-समाधानी आहे.

गोपाळरावांबरोबर तास-दीड तास गप्पा मारून आणि नंतर गाव बघून झाल्यावर आम्ही पायवाटेनं कापऱ्यापर्यंत यायला निघालो. कापऱ्याहून चिपळूणला जायला बसला उशीर होता. तेवढ्या वेळात कापऱ्याच्या केतकर आडनावाच्या एका किराणा दुकानदाराशी ओळख झाली. केतकरांनी गप्पांच्या ओघात गोपाळरावांनी न सांगितलेले, बिवलीच्या आगळ्यावेगळ्या प्रयोगाचे अनेक नवनवे पैलू सांगितले.

बिवलीला किराणा मालाचं मोठं दुकान नाही, त्यामुळं अनेक बिवलीकर कापऱ्याला केतकरांच्या दुकानात खरेदीला येतात. केतकर सांगत होते की, कापरा किंवा अन्य गावातल्या गावकऱ्यांना उधारीवर माल घेण्याची खूप सवय आहे. बिवलीकर सहसा उधार-उसनवार मागत तर नाहीतच, त्यातूनही त्यांनी मागितलंच तर त्यांना उधारीवर माल देण्यात भीती वाटत नाही. कापऱ्याच्या या दुकानदारांना गोपाळ पवारांच्या स्टँडिंग सूचना आहेत की, बिवलीतला कोणी उधारीवर माल घ्यायला आला तर त्याला नाही म्हणू नका. त्यानं पैसे बुडविलेच तर ते आमचा गाव फेडील!

सहसा बिवलीत भांडणं होत नाहीत. क्वचित कधी ती झालीच तर कुणाकडूनही कोणत्याही अपराधाबद्दल दंड वगैरे घेतला जात नाही. अन्य गावात गावकीपुढं दंड भरावा लागतो नि या दंडाचा विनियोग गावातली वडी मंडळी आपल्या खाण्या-पिण्याच्या मौज-मजेसाठी करतात. इथं मात्र आपसातली भांडणं दंडाच्या नव्हे तर समजूतदारपणाच्या जोरावर सोडविली जातात.

केतकरांनी अन्य गावं व बिवली यांच्यातील वातावरणातच फरक आहे हे सांगताना जे उदाहरण दिलं तेही नोंदणीय आहे. अन्य गावात, खुद्द कापऱ्यात माणूस आजारी पडला तर डोली करून दवाखान्यापर्यंत त्याला न्यायचं म्हणजे मोठा प्रश्न असतो. माणशी पाच-सहा रुपये देऊनसुद्धा कोणी डोली वाहायला येत नाही. बिवलीत हा प्रश्न नसतो. पैशाचा तर नसतोच; पण माणसांचाही नसतो. केतकरांच्याच शब्दात सांगायचं तर गोपाळ पवारांनी अवघ्या बिवलीत एक सहकार्याचं, सामंजस्याचं, प्रेमाचं असं वातावरण निर्माण केलं आहे. आज पंधरा वर्षांनंतर हेच वातावरण आपणा सर्वांच्या उन्नतीला पोषक आहे असा अतूट विश्वास या गावकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे.

बिवलीविषयी मी जे वाचलं होतं त्यापेक्षा मी जे पाहिलं ते अधिक थक्क करणारं होतं. 'दारुबंदी यशस्वी होणार नाही. कारण लोक स्वेच्छेनं दारुबंदी स्वीकारणार नाहीत' हाच घोषा लावणाऱ्यांनी बिवलीचं उदाहरण पहाण्यासारखं आहे. दारूचे दुष्परिणाम ज्यांनी अनुभवले ते एका ज्येष्ठ गावकऱ्याच्या आवाहनाला प्रतिसाद देतात, निग्रहानं दारुबंदी स्वीकारतात आणि सर्वांगीण विकासासाठी जणू वेडे होऊन काम करतात ही गोष्ट सामान्य नाही!

या संपूर्ण प्रयोगाच्या यशस्वितेत गोपाळ पवारांचे परिश्रम व गावकऱ्यांनी त्यांना दिलेली साथ यांचा वाटा महत्त्वाचा आहे हे निर्विवाद! पण त्याहीपेक्षा आपण एकत्रितपणे, नेटानं काम केलं तर इतक्या मागासलेल्या गावाचाही कायापलट घडू शकेल, आपण चांगलं काही तरी घडवू शकू हा प्रयत्नवादातून निर्माण झालेला जो अढळ विश्वास या गावकऱ्यांनी आपल्या मनात जागवला, ज्या एका श्रद्धेनं, तळमळीनं त्यांनी काम केलं, ती श्रद्धा आणि तो विश्वास लाख मोलाचा आहे.

गोपाळरावांनी समाजवादावरची पुस्तकं बघितलेलीही नाहीत, ग्रामीण अर्थशास्त्राचे सिद्धान्त त्यांना ठाऊक नाहीत. कागदावर सुंदर दिसणाऱ्या सरकारी योजनांचीही माहिती त्यांना नाही. तरी देखील चिकाटीनं प्रयत्न करून अवघ्या गावाचा कायापलट त्यांनी घडविला याचं कारण गावाच्या मागासलेपणाचं खरं कारण कोणतं हे त्यांनी अचूक जाणलं होतं. दारूच्या दुष्परिणामांच्या गर्तेत सापडलेल्या गावकऱ्यांना त्यांनी त्यांच्या अधःपतनाची जाणीव करून दिली. आपला उद्धार आपल्यालाच करायला हवा हेही पटवून सांगितलं. साऱ्या गावकऱ्यांमध्ये एक आत्मशक्तीची ज्योत जागवली आणि साऱ्या गावाच्या विकासाची, खऱ्याखुऱ्या 'ग्रामोदयाची' दारं आपोआप खुली झाली!

गरज आहे ती या प्रयोगाचा नीट अभ्यास करण्याची; सर्व पातळींवर त्याला प्रोत्साहन देण्याची- या सर्व प्रयोगातला सामाजिक आशय खूप महत्त्वाचा आहे. हुंडाबंदीपासून सामूहिक कामातून गावफंड उभारण्याच्या कल्पनेपर्यंत विविध आघाड्यांवर पवारांच्या प्रयोगाची यशस्वी वाटचाल झाली आहे. तिची योग्य नोंद ग्रामीण-विकासाच्या चळवळीत काम करणाऱ्या सर्वांनीच घ्यायला हवी. या गावासाठी आणखी काय करता येईल, या गावाचं अनुकरण किती प्रमाणात आणि कुठं करता येईल याचीही चाचपणी व्हायला हवी.

देवळांच्या म्हैसाळपासून नानाजी देशमुखांच्या गोंडा प्रकल्पापर्यंत सर्वत्रच कोणी तरी बाहेरून येऊन गावकऱ्यांना बरोबर घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रयत्न केले आहेत. बिवलीत मात्र आधुनिक जगाचं वारंसुद्धा न लागलेले, पूर्णतः निरक्षर असे गोपाळ पवार गावाच्या उद्धारासाठी उभे राहिले आणि आपलं गाव स्वयंपूर्ण करण्याच्या दिशेनं त्यांनी यशस्वी प्रयत्न केले ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे.

उद्या कुणी सरकारी, बिनसरकारी माध्यमातून बिवलीकरांना मदतीचा हात देऊ केलाच तर बिवलीच्या गावकऱ्यांच्या या स्वोद्धाराच्या प्रवृत्तीला तडा जाणार नाही याची थोडीशी काळजी घ्यायला हवी. 'स्वयं उद्धरावा आत्मा' हे तत्त्व खूप मोलाचं आहे! प्रथम ते जाणून आणि नंतर ते जोपासून ग्रामीण विकासात रस असलेले सर्वजण बिवलीकरांच्या खांद्याला खांदा लावून आपापल्या क्षेत्रात काम करू शकतील. □

## बिवलीचे अर्थशास्त्र

कोकणातल्या अन्य खेडेगावांपेक्षा बिवलीचं अर्थशास्त्र पूर्णतः वेगळं आहे. सर्वसाधारणपणे दक्षिण-कोकणातल्या खेड्यांतून सामान्य शेतकरी वर्षातले ३ महिने उधार-उसनवारी करीत, कर्ज काढून असे कसेबसे ढकलतो. त्याच्या शेतात पिकणारं धान्य त्याच्या परिवाराला जेमतेम ९ महिनेच पुरतं. त्यामुळं नव्या पेरणीनंतरचे काही महिने, विशेषतः श्रावण महिना म्हणजे लहान शेतकऱ्यांचे हाल! अनेकदा उपाशीपोटी दिवस ढकलावे लागतात; पण बिवलीकरांवर ही वेळ येत नाही. याचं मुख्य कारण म्हणजे दारूवर खर्च होणाऱ्या पैशाची बिवलीकरांनी केलेली बचत. बिवलीचे गावकरी ९ महिने सुखानं, स्वतः पिकविलेलं धान्य खातात तर तीन महिने पुरेशा बचतीच्या आधारावर समाधानानं जीवन जगतात. मुंबईत राहणारे बिवलीकर चाकरमानेसुद्धा अन्य गावातील चाकरमान्यांच्या तुलनेनं अधिक पैसा अधिक नियमितपणे पाठवितात. परिणामतः गांगितलं तर खरंही वाटणार नाही एवढी, म्हणजे सुमारे ८५,००० रु. ची रक्कम आज बिवलीकरांच्या खात्यावर पोस्टात जमा आहे!

सत्तरी ओलांडलेले गोपाळराव रोज सकाळी पहाटे पाच वाजता उठतात. गुरांना शेतावर नेणं, म्हशीचं दूध काढणं, गुरं चरायला नेणं असं सध्याच्या त्यांच्या कामाचं स्वरूप असलं तरी लोहारकामापासून घरासाठी वापरण्याच्या जांभ्या दगडाची सुबक लादी करण्यापर्यंत सर्व प्रकारची कामं गोपाळराव सहजासहजी करू शकतात. त्यांच्या मुलाच्या सांगण्यानुसार रोज आठ तास काम केल्याशिवाय गोपाळरावांना चैनच पडत नाही. त्यांच्या इच्छाशक्तीइतकीच त्यांची शरीरप्रकृतीही बळकट आहे. बिवली ते चिपळूण हे जवळपास पंधरा-सोळा मैलांचं अंतर अनेकदा ते एकटे चालत चालत येतात.

आमदार राजाराम शिंदयांनी गोपाळ पवारांच्या प्रयत्नांना प्रसिद्धी दिल्यानंतर अनेक पत्रकारांनी बिवलीला भेटी दिल्या. 'बिवलीत दारूचा थेंबही मिळणार नाही' या गोपाळरावांच्या विधानाची सत्यता पडताळून पहायची असं त्यातल्याच एका पत्रकारानं ठरवलं.

गावातल्या इतर कुटुंबांशी गप्पा मारायला म्हणून निघालेले हे पत्रकारमहाशय एकटेच गावातल्या एका वृद्धेच्या घरी गेले. 'आपण रोज दारू घेतो त्यामुळे आज पेग-दोन पेग घेतल्याशिवाय रहावत नाही' अशी बतावणी करून ते म्हणाले, 'बघा आजीबाई, दारू आणून दिलीत किंवा ती कुठे मिळेल हे तुम्ही सांगितलंत तर त्याचा छानसा मोबदला मी पैशात देईन!'

म्हातारीनं ताडकन विचारलं– 'ही गोपाळदादांची बिवली आहे हे काय माहिती नाही तुला? कितीही दारुड्या असला तरी इथं त्याला दारू मिळत नाही. पाटावर बैस आणि लागेल तितकं सुखानं जेव, पण दारूचं नावसुद्धा काढू नको!' व्याकुळलेले पत्रकारमहाशय खजील होऊन परतले!

सविस्तर गप्पा मारताना खुद्द 'गोपाळदादा'नीच ही हकीगत ऐकविली. □

# पुस्तके

प्रसन्न, टवटवीत

# ' अनन्तिका '

चंद्रकांत वर्तक

काणेकर ह्या पुस्तकाच्या प्रस्तावात सांगतात की, ' अनन्तिका ' हे आत्मचरित्र मुळीच नाही – त्या आत्मचरित्रात्मक स्मृतिलहरी आहेत. त्यांचे म्हणणे खरे आहे; पण ह्या स्मृतिलहरी कवडशांसारख्या आहेत. दोन कवडशांमधला अंधार जसा उजळतो त्याप्रमाणे दोन स्मृतिलहरींमधले त्यांचे जीवन उजळून निघून त्यांचा जीवनपट आपल्यापुढे उलगडला जातो आणि काणेकर नामक एका दिलखुलास माणसाचे त्यांच्या उमद्या व्यक्तिमत्त्वासह वाचकाला दर्शन घडते.

ह्या स्मृतिलहरींची आयुष्यक्रमानुसार–कालक्रमानुसार व्यवस्था लावण्याचे जिकिरीचे काम प्रा. डॉ. मालशे ह्यांनी केले व त्यांना डॉ. भीमराव कुलकर्णी ह्यांनी मदत केली. ह्याचे कारण काणेकरांनी विविध वेळी, विविध प्रसंगी आठवणीवजा स्फुट लेखन पृथक् पृथक् असे केले. ते नीटपणे लावणे जरूर होते. कारण अशा लेखनात विपुल पुनरावृत्ती झालेली असते. ही पुनरावृत्ती काढून टाकून त्यातून नितळ पण समग्र असे काणेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडू शकेल अशा पद्धतीने हृया स्मृतिलहरींची मांडणी करण्याचे कष्टसाध्य काम डॉ. मालशे हृयांनी कुशलतेने केले, म्हणूनच ' अनन्तिका ' सिद्ध झाले व आपल्यापुढे आले.

काणेकरांच्या ह्या पुस्तकाचे वाचन करताना नकळत एक निराळेच वैशिष्टय जाणवले. ते म्हणजे काणेकरांबरोबरच त्या वेळच्या मुंबईचे एक वाङ्मयीन, सांस्कृतिक पातळीवरचे रूपही आपल्याला दिसते. एरवींच्या आत्मपर लेखनात एखाद्या सार्वजनिक चळवळीचे वर्णन आत्मनिवेदक करू लागला की, निवेदनातील आत्मपरता ढळू लागते. कारण आत्मनिवेदक व वर्णित सार्वजनिक चळवळ हृचात अभिन्न संबंध नसतो– दोहोंत दरी असते. काणेकरांच्या आत्मनिवेदनात असे होत नाही. कारण ती ती वाङ्मयीन वा सांस्कृतिक चळवळ हृचा दोहोंत एक प्रकारची तादात्म्यता आहे. म्हणून ह्या आठवणी काणेकरांबरोबरच त्या सांस्कृतिक चळवळीचेही दर्शन घडवतात.

काणेकर म्हणतात, ' माझे स्मरण चित्ररूप असते. जे आठवते ते रंगरूप–आकारांसह डोळयांपुढे येते. ' (पृ. २) तीव्रतेने भावलेले जे मनात राहृले पाहिजे ते स्मरणशक्तीत जसेच्या तसे राहते– अडगळ नाहीशी होते. चपखळ स्मरणशक्तीमुळे काणेकर सगळी आठवण तपशिलासह उभी करतात आणि त्या आठवणीशी निगडित असलेली माणसेसुद्धा मग आपल्यासमोर ठसठशीतपणे येतात. ह्या आठवणी सांगताना काणेकरांची दृष्टी कोणत्याही प्रकारे डागळलेली नाही. त्यांच्या मनात कसला विखार, आकस नाही. समयज्ञ, संयत अशा त्यांच्या दृष्टीमुळे आठवणींचे स्वरूप निरलस, स्वच्छ असे राहते. तसे पाहिले तर काणेकरांचे जीवन धकाधकीतच गेलेले आहे; गर्भश्रीमंतीतले नव्हे. तीन वर्षांचे असताना वडील वारल्यावर, आई हिंगण्याला शिक्षणासाठी गेल्यानंतर आजीजवळ सामान्य परिस्थितीत ते वाढले. गरीबीतच ते वावरले. गरीबीतच दिवस काढलेल्या माणसाची जगाकडे पाहण्याची दृष्टी कित्येकदा कडवट बनते. काणेकरांची दृष्टी कडवट झालेली नाही, मोकळीच आहे. काणेकर त्यांच्या बाळपणच्या ' हिरव्या मित्रा 'ची आठवण सांगतात तसेच आपल्या आजीचा करारीपणा सांगतात किंवा मलबारहिलवरच्या श्रीमंत मित्राकडे आयुष्यात ' पहिल्यांदा ' पाहिलेला पाव खाण्याचा प्रसंग वर्णितात. चाळीतल्या जीवनाचा ऐसपैसपणा जेव्हा वर्णन करतात ( चाळीमध्ये जातीजातींची उच्चनीचता नव्हती.) तेव्हा काणेकर गरीबी तर जरूर व्यक्त करतात; पण दुसऱ्या बाजूला स्मरणात कोरल्या गेलेल्या या प्रसंगांकडे आकसाने पहात नाहीत म्हणूनच त्यांच्या आठवणींचे रूप निरलस राहते.

काणेकरांच्या कॉलेजशिक्षणाचा काळ म्हणजे स्वातंत्र्याच्या चळवळीचा ऐन बहर होता. काणेकरांसारख्या संवेदनक्षम व्यक्तीचे मन त्या राजकीय वातावरणाकडे ओढून घेतले जाणे स्वाभाविक होते. ते बी. ए. होतात, एल्. एल्. बी. होतात– कामगारांच्या चळवळीच्या संदर्भात आलेले खटले लढवतात. सर जमशेदजी कांगा ह्यांच्यासारख्या नाणावलेल्या कायदेपंडिताशी न्या. चित्रे ह्यांच्या कोर्टात छोटीशी झुंज देतात. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा पगडा त्यांच्या मनावर बसलेला असतो. कराची कांग्रेसला ते जातात. तेथे भूमिगत मानवेंद्रनाथ रॉयना ' डॉ. महमूद ' समजून त्यांच्याशी ' थर्ड इंटरनॅशनल '-संबंधीच्या त्यांच्या सिद्धान्ताबद्दल वाद घालतात– काणेकरांच्या जीवनातले हे सर्व रोमहर्षक पर्व मुळातूनच वाचण्यासारखे आहे; त्यात महत्त्वाची गोष्ट ही की, काणेकर ह्या आठवणी सांगताना आपण काही तरी अद्वितीय करीत होतो अशी ' शूर वीराची ' भूमिका घेत नाहीत– आत्मप्रदर्शनाचा त्यात सोस नाही. उलट आपल्या सर्व मर्यादा लक्षात आणूनच त्या पर्वाचे वर्णन करतात. म्हणूनच आपल्या मनात ते पर्व ठसते.

राजकीय चळवळीने भारून गेलेले काणेकर वाङ्मयाच्या प्रेमानेही भारलेले होते. ' चांदरात 'मध्ये आलेल्या कविता ह्याच काळात लिहिल्या गेल्या. तसेच इब्सेनच्या

'डॉल्स हाउस'चे 'घरकुल' हे रूपांतर ह्याच वेळचे. कवि, नाटककार म्हणून त्यांना पुढे जी कीर्ती लाभली त्याची पाहिली पावले ह्या वेळी पडली. कोणताही लेखक त्याच्या स्वतःच्या साहित्यावर निश्चितच प्रेम करत असतो. पुष्कळदा भाबडे, आंधळे! काणेकर ह्या भाबडेपणाच्या वाटेलाही जात नाहीत. कुणी टीका केली म्हणून लगेच होरपळून, कोमेजून जाण्याइतके त्यांचे व्यक्तिमत्त्व हळवेही नाही; पण जर्थे भूमिका ठाम होती तर्थे अयोग्य अशा केल्या गेलेल्या टीकेला उत्तर द्यायला ते कचरत नसत. तेवढे तिखट ते होते. मर्ढेकरांनी 'लेखनपूर्व आत्मनिष्ठा' व 'लेखनगर्भ आत्मनिष्ठा' ह्याबद्दलचे विवेचन करताना 'काळ्याचे गाणे' ही काणेकरांची कविता 'लेखनपूर्व आत्मनिष्ठा' नसल्याचे द्योतक म्हणून सांगून चिकित्सा केली होती. आत्मपर आठवणींचा एक कवडसा ह्या कवितेत 'लेखनपूर्व आत्मनिष्ठा' कशी उत्कट व सच्ची होती हे सांगण्यात उजळला आहे. कवी जाणीवपूर्वक लिहीत असतो– उगाच काही तरी सुचेल तसे लिहीत असतो असे नसते. त्याची अनुभूती तितकी तरल असल्याशिवाय तो लिहिण्याला प्रवृत्त होणार नाही. अशीच एक आठवण वामन मल्हार जोशांबाबत आहे. 'व्याधाची चांदणी' या कवितेतल्या चांदणीच्या रंगाच्या उल्लेखाबद्दल त्यांनी आक्षेप घेतल्यावर त्याचे वैज्ञानिक स्पष्टीकरण तिथल्या तिथेच काणेकर देतात. हे सर्व आज वाचताना लक्षणीय वाटते. कारण त्यात अभिनिवेश नाही.

काणेकरांच्या जीवनातले एक महत्त्वाचे पर्व म्हणजे 'नाट्य-मन्वंतर' हेय. त्यासंबंधी खूप काही वाचायला मिळेल अशी अपेक्षा असते; पण ते म्हणतात, 'नाट्यमन्वंतर स्थापन करताना...अनेक अडचणी आणि कितो तरी बरे–वाईट अनुभव आम्हाला आले आणि म्हणूनच खूपसे प्रसंग आठवतील असे मला वाटले होते; पण हातात कागद आणि लेखणी घेऊन आता जेव्हा लिहावयाला बसलो तेव्हा काय सांगावे तेच समजेनासे झाले आहे...तरी व्यक्ती आणि संस्था यासंबंधी बऱ्याचशा आठवणी सांगण्यासारख्या आहेत; पण त्यांचे हितसंबंध लक्षात घेता त्या सांगणे इष्ट नाही. तेव्हा, दोनचार गमतीच्या गोष्टी आठवतात, त्या सांगून टाकतो.' (पृ. ७५) ह्या महत्त्वाच्या पर्वासंबंधी त्यांनी लिहिताना चटकन पसारा आवरावा त्याप्रमाणे लेखणी आवरली आहे– अधिक न बोलता. मात्र त्या वेळी सहवासात आलेल्या व्यक्तींची शब्दचित्रे उत्कटपणे रेखाटली आहेत. त्यांच्या 'घरकुला'चे दिग्दर्शक के. नारायण काळे, 'आंधळ्याची शाळा'कर्ते श्री. वि. वर्तक, ज्योत्स्नाबाई भोळे यांबद्दल लिहिताना काणेकर फुलून आले आहेत. काळ्यांची संयत, तर्कशुद्ध वैचारिकता, वर्तकांची भावनाप्रधानता, अत्युत्साह, साहित्यावरचे निस्सीम प्रेम, ज्योत्स्नाबाईंचा निगर्वी साधा स्वभाव, इंग्रजी विशेष येत नसताही 'मॅडम बटरफ्लाय'-सारख्या चित्रपटाच्या सौंदर्याचे त्यांना झालेले आकलन हे सारे ह्या शब्दचित्रांमधून सुरेखपणे प्रकट झाले आहे. काणेकर पत्रकाराचे, संपादकाचे आयुष्य जगण्यातल्या काळातले मो. ग. रांगणेकरांचे त्यांच्या हर्षामर्षासकटचे चित्र, दत्तू बांदेकरांच्या करुणरम्य व्यक्तिमत्त्वाचे चित्र ही शब्दचित्रे ह्या 'अनन्तिका'चे वैशिष्ट्य होत.

काणेकर एकांडे कधीच नव्हते. चारचौघांसारखे मिसळून जगणे हा त्यांचा स्थायीभाव असल्यामुळे निरनिराळ्या सामाजिक, वाङ्मयीन कार्य करणाऱ्या संस्थांशी त्यांचा नुसताच निकटचा संबंध आला नाही तर त्या संस्थांसाठी ते मनःपूर्वक राबले. डॉ. भालेरावांनी त्यांना मुंबई मराठी साहित्यसंघात ओढले व ते तेथे रमले. काणेकरांच्या लेखनातल्या नाविन्यतेने ते मोठे लेखक झाले. औरंगाबादच्या म. सा. संमेलनाचे १९५७ ऐन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी ते अध्यक्ष झाले. त्यांचे भाषण भाषावाद, भाषिक प्रांत ह्याबद्दल स्पष्ट, कडवे विचार व्यक्त करणारे होते. कुणा प्रतिष्ठित महाभागांनी काही ओळी अधोरेखित करून त्या त्यांनी वाचू नयेत असे सुचवले. काणेकरांनी त्याच ओळी उच्चरवाने, ठासून वाचल्या. साहित्यिकाला मत असते आणि जिवंत मन असते ह्याचाच तो स्पष्ट प्रत्यय होता.

या आत्मपर लेखनात आपल्या वाचनाबद्दल, लेखनाबद्दल, जीवननिष्ठांबद्दल त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे– ते मनोज्ञ आहे. मिस्किलपणाने त्यातही त्यांनी बरेच काही सुचविले आहे. ते म्हणतात, 'मिळेल ते वाचत गेल्यामुळे माझे मन विशाल झाले आणि माझी वाङ्मयीन दृष्टी व्यापक झाली असा माझा समज आहे. कदाचित हा समज चुकीचा असेल. एक ना धड, भाराभर चिंध्या, असाही प्रकार झाला असेल' (पृ. ११५) असे म्हणून मग टप्प्याटप्प्याने आपली वाचनाची पद्धत कशी बदलली हे त्यांनी दाखविले आहे. प्रथम प्रथम वाचताना डिक्शनरीचा उपयोग करणे, टिपणे करणे,– पुढे दोन्हीही सोडून देणे; नंतर कठीण शब्द ध्यानात ठेवून नंतर शब्दकोषात पाहणे– पहिल्यांदा पुस्तक संपूर्ण वाचणे ही अवस्था; पुढे पुढे ते चाळत चाळत वाचणे– मोठे लोक ह्याच तऱ्हेने वाचतात अशी स्वतःची समजूत घालून– हे सगळे त्यांचे वाचन करण्याचे प्रकार पाहिल्यावर 'एकूण काणेकर आपल्यासारखेच दिसताहेत' असे आपल्याला वाटते आहे तोच ते हळूच भाषाशैली सुधारणे, ज्ञान वाढविणे इ. हेतूंनी वाचन केले तर त्यातले सारे स्वारस्य निघून जाते – पुस्तक तल्लीनतेने वाचले पाहिजे असा कानमंत्र देतात आणि हार्डीच्या 'टेस्' कादंबरीच्या त्यांच्या वाचनाच्या अनुभवाचे उदाहरण देतात.

लेखनाबद्दल बोलतानाही निरनिराळ्या वाङ्मयप्रकारातले लेखन केले तरी ते प्रयोग म्हणून केले नाही– उलट प्रसिद्ध करण्याच्या ते लायकीचे असेल की नाही ह्याचीच शंका होती असे विनोदाने बोलून लेखाचा स्वच्छ आराखडा मनात उभा राहिल्याखेरीज कागदाला लेखणी लावत नाही; चहा, सिगरेटसारखी बाह्य साधने तंद्री लागण्यासाठी लागत नाहीत, लेख लिहिण्यापूर्वी त्याबद्दल चर्चा करणे वा दुसऱ्याचे मत घेणे आवडत नाही इ. सांगून लेखनाची प्रवृत्ती हा एक असाध्य रोग आहे किंवा ती एक पिशाच्चबाधा आहे असे आपल्या मनचे गुज सांगतात. आपल्या मनात वास्तववादापेक्षा आदर्श सृष्टीची चोरटी इच्छा दडून बसली आहे. साहित्यातून पैसे मिळाले पण त्याहीपेक्षा मुक्ततेचा आनंद प्राप्त झाला असे ते सांगतात.

काणेकर दत्ताला 'सोशॅलिस्ट दत्त' म्हणतात. ज्ञानेश्वर, तुकाराम ह्यांसारखी श्रेष्ठ संतमंडळी विठ्ठलापुढे लीन झाली मग आपल्याला त्याच्या पाया पडायला काय हरकत? अखेरीस मातब्बरी चैतन्याचीच आहे असे सांगणारे काणेकर सश्रद्ध आहेत आणि माणुसकीच्या तत्त्वापुढे विनम्र आहेत. ते आयुष्याला, जगाला विटलेले नाहीत, जगाकडे आनंदनिर्भरतेने पाहण्याइतके मनाने विशाल आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणूनच सदैव टवटवीत, ताजे आहे आणि त्याचाच साक्षात्कार आपल्याला 'अनन्तिका' मधून सातत्याने होत राहतो.

◻

अनन्तिका
अनंत काणेकर
प्रकाशक : दा. दि. कुलकर्णी,
श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०
किंमत सतरा रुपये पन्नास पैसे

# दिल्ली वार्तापत्र : पृष्ठ १० वरून

करत असलेल्या अनेक गोटांत बाबूजींच्या, चंद्रशेखर यांच्याविषयी ही बातमी पोचते. पत्रकार बाबूजींना गाठतात. कालच्याप्रमाणेच ते सांगतात. अजून चित्र काही स्पष्ट होत नाही. 'तुमच्या बाजूचे किती आहेत?' असं विचारता चटकन उत्तरतात 'बहुमत होतील इतके !'

बाबूजींची तयारी जोरात चाललेली. जाताना संसदीय पक्षाच्या नेतेपदी आपली निवड होताच दोन तासात एकूण २८० पाठीराख्यांची यादी मी सादर करू शकेन असं त्यांनी स्पष्ट केलं होतं. हरिजन, अनुसूचित जातीजमातींचे सुमारे ७६ खासदार लोकसभेत होते. त्या प्रत्यकाची त्याच्या घरी जाऊन बाबूजींनी भेट घेतली आणि पाठिंब्याचं वचन घेतलं होतं. चरणसिंग यांचे उजवे हात श्यामनंदन मिश्रा यांनी बाबूजींची भेट घेतली होती. बाबूजींच्या शत्रुगटाकडून आलेल्या या दूताची चाळीस मिनिटे चाललेली भेट फारच महत्त्वपूर्ण होती.

जनसघ-घटकाला बरोबर घेतल्याविना स्थिर सरकार बनवता येणार नाही हे बाबूजींना उमगलेले होते. जनसघनेत्यांनी कोठल्याही परिस्थितीत चरणसिग यांना पंतप्रधान बनू द्यायचे नाही असा निर्धार केला होता. मोरारजीभाईंना असलेला आपला पाठिंबा काढून घ्यायचा व बाबूजींना पाठिंबा द्यायचा असं त्यांनी ठरवलं आहे असं सांगितलं जात होतं. जातीयवादाचा शिक्का बसलेल्या जनसंघाला हरिजननेत्याला पाठिंबा देऊन आपण जातीयवादी नाही हे सिद्ध करण्याची संधी होती ती सोडायची नाही असं त्यांनी ठरवलं होतं.

चरणसिग यांच्या गोटात आज काहीसे निराशेचे वातावरण होते. काँग्रेसमध्ये त्यांना पाठिंबा देण्याच्या प्रश्नावरून दुफळी व्हायची पाळी आली होती. इंदिरा काँग्रेसचा बाहेरून देखील पाठिंबा द्यायला चरणसिंग यांच्याच अनेक पाठीराख्यांचा विरोध होता. ज्या राजनारायण यांनी इंदिरा गांधींचा निवडणुकीत पराभव केला तेच राजनारायण आता इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा घ्यायला तयार होते. दिवस तत्त्वशून्य राजकारणाचे होते हेच खरं. आदल्याच दिवशी ३०२ खासदाराचा आपल्याला पाठिंबा आहे असं चरणसिंग म्हणत होते परंतु त्यांनी दडपून नावं दिली होती. मार्क्सवादी कम्युनिस्ट गटाच्या बावीस खासदाराच्या नावाचा त्यात अंतर्भाव होता. अहिल्या रांगणेकर म्हणाल्या, आम्हा कोणाला विचारलं नाही, आमचा पाठिंबा नाही तरी आमची नावं पाठीराख्यांच्या यादीत घातली आहेत. सह्या न घेताच नावं सादर केली गेली होती. राष्ट्रपतींनी सह्या आणायला सांगितल्या होत्या. त्यानुसार चरणसिंग, राजनारायण, श्यामनंदन मिश्रा आणि त्यांचे दूत सह्या गोळा करण्याच्या मोहिमेवर होते; पण पुरत्या दोनशे देखील सह्या होईनात. कोणी म्हणे २७४ सह्या झाल्यासुद्धा; परतु ते खरं नव्हतं.

राजनारायण आज दिवसभरात सेंट्रल हॉलकडे फिरकले देखील नाहीत. राष्ट्रपतींना देखील भेटले नाहीत. गेल्या काही दिवसांत राष्ट्रपतींना ते वारंवार भेटले होते. तुम्हांला काय सल्ला द्यायचा तो तुम्ही मला दिला आहे. आता मी बोलावीन तेव्हाच या असं राष्ट्रपतींनी त्यांना सुनावलं असं सांगितलं जात होतं. एकूण चरणसिंग यांचे चान्सेस काहीसे मंदावले होते.

राजनारायण गट स्वतःला जनता (एस) म्हणवतो. एस. म्हणजे 'सेक्युलर' रात्री चंद्रशेखर यांच्या घरी जनता पक्षाचे सरचिटणीस रामकृष्ण हेगडे भेटले. ते जनता (एस.)वर उखडलेले, हे 'जनता सेक्युलर कसले ? हे तर जनता स्काऊन्ड्रल्स ! असा शेरा त्यांनी मारताच एकच हशा पिकला. हेगडे मात्र मूडमध्ये आले व चरणसिंग म्हणत असतील 'मेरा सुंदर सपना टूट गया' असं सांगत त्यांनी चक्क ही ओळ गाऊन दाखविली. चरणसिग यांनी आपल्या पाठीराख्यांची संख्या ३०२ जाहीर केली आहे. खुनाचा आरोप ठेवण्याबाबतच्या इंडियन पिनल कोडच्या कलमाचा नंबरही ३०२ आहे. तेव्हा ज्यांनी पक्षाच्या पाठीत सुरा खुपसून लोकशाहीचा खून केला त्यांची संख्या ३०२ असणार हे प्रतीकात्मक आहे असाही टोमणा हेगडे यांनी मारला.

तेथून बाहेर पडलो तेव्हा एकच प्रश्न सर्वांच्या मनाला सतावत होता — मोरारजी देसाई संसदीय पक्षाच्या दुसऱ्या बैठकीत नेतेपद सोडणार की नाही ? या बैठकीकडे साऱ्यांचंच लक्ष लागून राहिलं होतं.

## अठरा जुलै

सत्तेच्या राजकारणाचा खेळ अडून बसतो कारण जनता संसदीय पक्षाची बैठक रद्द करावी लागते. सकाळी जनता संसदीय पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक भरलेली असते. लाल कृष्ण अडवाणी यांच्या पुढाकारानं पंतप्रधानांच्या निवासस्थानी ही बैठक आयोजिलेली. दडपणाखाली आपण पक्षाचं नेतेपद सोडणार नाही असं मोरारजीभाई या बैठकीत निक्षून बजावतात.

रामधन त्यावर चिडून विचारतात 'चाळीस टक्के सदस्य विरुद्ध असले तरी मी पक्षनेतेपद सोडून देईन असं तुम्हीच काल काहीजणांना म्हणालात ना ?'

'माझी काल तशी भूमिका होती. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. माझी नेतेपदासाठी पाच वर्षांकरिता निवड झालेली आहे. त्याआधी मला या पदावरून दूर करावं असं सदस्यांना वाटत असेल तर त्यांनी खुशाल पक्ष बैठकीत माझ्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडावा !' मोरारजी असं ठामपणं उत्तर देतात.

त्यावर बोलणंच खुंटतं. नेतेपद सोडायला मोरारजी देसाई तयार नाहीत त्यामुळं गुंता वाढतो. संसदीय पक्षाच्या बैठकीत मोरारजीभाई विरुद्ध दोनतृतीयांश सदस्य जातील याची खात्री नसते. तेव्हा शेवटी, शेवटी कृष्णकांत सूचना करतात की आज सायंकाळी पाच वाजत

भरणारी जनता संसदीय पक्षाची बैठक रद्द करावी. या सूचनेला सर्वांचा पाठिंबा मिळतो. अडवाणी व रवींद्र वर्मा, जगजीवनराम, चंद्रशेखर व मधु दंडवते यांच्याशी तातडीनं संपर्क साधतात आणि बैठक पुढे ढकलण्याबाबत चर्चा करतात. पंतप्रधानही आपला होकार देतात. पाच वाजता बैठक ठरलेली असते. त्याच्या अवघ्या एक तासभर आधी बैठक रद्द करण्याचा निर्णय होतो. जनता संसदीय पक्षाचं कार्यालय कामाला लागतं. एकापाठोपाठ एकेका सदस्याला फोन जातो. बैठक रद्द झाल्याचं कळविलं जातं.

आजच्या संसदीय पक्ष कार्यकारिणी बैठकीला जगजीवनराम व चंद्रशेखर यांना खास निमंत्रित म्हणून आमंत्रण असतं; परंतु ते हजर राहत नाहीत. यामुळं अफवांचं पीक येतं. बाबूजी पन्नास जणांना घेऊन पक्षाबाहेर पडणार असं कोणी तरी सांगतं आणि ही बातमी वाऱ्यासारखी पसरते. जनता पक्षात एकच खळबळ माजते. या गुंतागुंतीत चंद्रशेखर आणखी भर टाकतात. मोरारजीभाईंनी स्वतः होऊन नेतेपदाचा राजीनामा दिला तर मी नेतेपदाची निवडणूक लढवीन असं चंद्रशेखर यांनी आपल्या निकटच्या मित्रांना सांगितलेलं असतं. त्यामुळं चंद्रशेखर पंतप्रधान बनणार अशीही बातमी जो तो सांगत सुटतो.

जनता पक्षाच्या नेतेपदाचा तिढा जोवर सुटत नाही, तोवर इतर पक्षांनाही काहीच ठरवता येत नसतं.

सर्वांचं लक्ष असतं राष्ट्रपतिभवनाकडं. तेथेही नेत्यांची वर्दळ चालू असते. राष्ट्रपतिभवनाच्या आवारात मोटारींची ये–जा खूपच वाढली आहे हे तेथल्या मातीवर उमटलेल्या टायर्सच्या खुणा दर्शवीत असतात. राष्ट्रपती सरकार बनवण्यासाठी कोणाला बोलावणार याबद्दल तर्क–कुतर्क व्यक्त केले जात असतानाच विरोधी पक्षाचे नेते यशवंतराव चव्हाण यांना राष्ट्रपतींनी पत्र पाठवलंय अशी बातमी येऊन थडकते. 'सध्याच्या काळजीवाहू सरकारची जागा घेऊ शकेल असं एकसंध व स्थिर पर्यायी सरकार स्थापन करण्याच्या शक्यतेचा आपण शोध घ्यावा' असं राष्ट्रपतींनी त्या पत्रात म्हटलेलं असतं.

चव्हाणांना असं पत्र आलंय असं समजताच प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्न उभा राहतो, 'चव्हाण सरकार स्थापू शकतील का ? अवघे ७५ खासदार असलेल्या काँग्रेसला आणखी दोनशेजणांचा पाठिंबा मिळवता येईल का ?'

चव्हाण मात्र मी सरकार बनव शकेन असं आत्मविश्वासपूर्वक सांगत असतात.

आतापर्यंत देशाचा पंतप्रधान नेहमी उत्तरेचा अशी परंपरा. जनता सरकार आलं तेव्हा कुठं पंतप्रधानपदाची उत्तरेकडील राज्यांची मक्तेदारी संपुष्टात आली आणि गुजरातेतील व्यक्ती पंतप्रधान बनली. गुजरातच्या शेजारीच असलेल्या महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण पंतप्रधान झाले तर उत्तरेकडील राज्याबाहेरील व्यक्ती पंतप्रधान बनण्याची सुरू झालेली नवी परंपरा पुढे चालू राहिली असती.

दिल्लीतील महाराष्ट्रीय माणसांना चव्हाण पंतप्रधान बनावेत असं वाटत होतं; परंतु दिल्लीतलं राजकारण इच्छेवर चालत नाही, पाठिराख्यांच्या संख्येवर चालतं. चव्हाणांच्या बाजूला संख्या कमी होती. महत्त्वाकांक्षी चरणसिंग चव्हाण यांना पंतप्रधान बनू देणं शक्य नव्हतं. जुना इतिहास आठवून मंडळी म्हणत होती 'हे सुरजमल जाट (चरणसिंग) चव्हाणांना पंतप्रधान होऊ देणार नाहीत !'

चरणसिंग व चव्हाण यांची भेट होते. आपण पंतप्रधान होणार व तुम्हाला उपपंतप्रधानपद दिलं जाईल असं चरणसिंग यांचं म्हणणं असतं.

सुब्रह्मण्यमस्वामी खळबळजनक बातम्या देण्यात पटाईत. ते सांगतात– 'चरणसिंग काल रात्री इंदिराबाईंना भेटले. गुपचूप. स्पेशल कोर्टस रद्द करणार असं लिहून द्या तर मी तुम्हाला पाठिंबा देईन असं इंदिरा गांधींनी चरणसिंगांना सांगितलंय. त्यांनी चरणसिंगांना चांगलं खडसावलंही !'

ही बातमी अशीच कोणी तरी उठवलेली असते; पण स्वामी नेहमीप्रमाणेच आपली ती खात्रीलायक माहिती आहे अशा थाटात सांगत असतात.

एक मात्र खरं की, चरणसिंग व इंदिरा काँग्रेस यांचं गुफ्तगू चालू असतं. चरणसिंगांचे दूत इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना भेटत असतात. इंदिरा गांधी पक्क्या हुशार! गेल्या वर्षी किसान मेळाव्याच्या वेळीच त्यांनी तुरुंगातून चरणसिंग यांना पुष्पगुच्छ व शुभेच्छा धाडलेल्या असतात. त्या पुष्पगुच्छाला आता अर्थ आलेला असतो !

एका बाजूला काँग्रेस व जनता (एस.) यांची सरकार बनविण्यासाठी धावपळ तर दुसऱ्या बाजूला जनता संसदीय पक्षात नेतेपदाचा प्रश्न कसा सोडवावा याबद्दल जोराने प्रयत्न चालू. एसेम जोशी वेगळीच कल्पना मांडतात पक्षातील पेचप्रसंगात जयप्रकाशनारायण यांनी हस्तक्षेप केला तर सारं कसं आलबेल होईल असं त्यांना वाटतं.

दिल्लीतील राजकीय घटनांची माहिती देणारं एक पत्र एसेम सरला भादोरिया यांच्याबरोबर जयप्रकाश यांना पाटणा इथं पाठवतात. रुग्णशय्येवरूनच जयप्रकाश मोरारजीभाईंना पत्र लिहितात. जगजीवनराम यांची जनता संसदीय पक्षाच्या नेतेपदी निवड व्हावी म्हणून तुम्ही नेतेपदाचा राजिनामा द्यावा. पक्ष व देशहिताच्या दृष्टीनं जगजीवनराम यांना संपूर्ण पाठिंबा द्यावा असं जयप्रकाश यांनी पत्रात म्हटलेलं असतं. ते चंद्रशेखरनाही एक पत्र लिहितात आणि बाबूजींची नेतेपदी निवड व्हावी म्हणून सहाय्य करावं असं कळवतात.

या पत्राचा राजकीय वापर केला जातो. सरला भादोरिया यांचे पती अर्जुनसिंग भादोरिया हे माजी समाजवादी. बोलणं धारदार. ते पक्के चरणसिंगद्वेष्टे. चरणसिंग आपल्या अनुयायांना मला वल्लभभाई पटेल म्हणा, पोलादी पुरुष म्हणा असं सुचवत असतात असं भादोरिया यांनी समाजवाद्यांच्या मेळाव्यात नुकतंच सांगितलेलं असतं. पत्रकार भादोरिया यांना 'कमांडर' म्हणतात. या भादोरियांची बाबू जगजीवनराम यांच्याशी चांगलीच दोस्ती. त्या दिवशी दुपारी ते बाबूजींसमवेत भोजन घेत असतानाच त्यांच्या पत्नी सरला भादोरिया यांचा पाटण्याहून फोन येतो. जयप्रकाश यांनी मोरारजीभाई यांना लिहिलेलं पत्रच त्या वाचून दाखवतात.

अर्जुनसिंग भादोरिया हे पत्र लिहून घेतात आणि ताबडतोब एका वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीला देतात. मोरारजीभाई, चंद्रशेखर व एसेम यांच्या हाती पत्र पडण्याआधीच ते वृत्तसंस्थेला मिळतं आणि देशातील वर्तमानपत्रांच्या कार्यालयात ते टेलिप्रिंटवरून पोचतं.

आपल्या पत्राचा मजकूर वर्तमानपत्राला आधी कळल्यानं

जयप्रकाशनारायण नाराज होतात, तर जयप्रकाश यांना या प्रकरणी हस्तक्षेप करायला लावायचा प्रयत्न केला म्हणून चंद्रशेखर खवळतात.

त्यांचा मूड आजही नेहमीसारखाच खेळकर असतो. काही नेत्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळं पक्षात सध्याचा पेचप्रसंग उद्‌भवला आहे असं त्यांचं म्हणणं. कधीकधी चंद्रशेखर योग्य तेच व वास्तव बोलतात याचा हा पुरावा असतो.

माझ्याकडं बऱ्याच मंत्र्यांची राजिनामापत्रं आली; परंतु मी ती वाचत नाही. पत्राचा शेवटचा परिच्छेद काय तो मी वाचतो. कारण आधी सारा त्यांचा नेहमीचाच मजकूर असतो. फक्त 'ऑपरेटिव्ह' भाग शेवटी असतो तेवढाच फक्त वाचायचा. असं ते हसत हसत सांगतात.

तेथून बाहेर पडत असताना रामकृष्ण हेगडे भेटतात. पंतप्रधान-पदासाठी मोरारजीभाई व जगजीवनराम सोडून आणखी कोण उमेदवार आहेत असं विचारता ते फक्त स्मित करतात. हेगडे यांना चंद्रशेखर यांनी पंतप्रधान बनावं असं वाटत असतं.

त्यांना एक पत्रकार विचारतो, 'तुमचा उमेदवार कोठल्या भागातला आहे? बलियाचा? (चंद्रशेखर यांचा मतदारसंघ)'

'वा, असं कसं सांगणार?'

चंद्रशेखर हे दाढी राखणारे. तेव्हा तो विचारतो, 'तुमचा उमेद-वार दाढीवाला आहे का?'

हेगडे यांना स्वतःलाही छोटी दाढी आहे. तेव्हा ते मार्मिक प्रत्युत्तर देतात, 'दाढीवाला पण छोटा दाढीवाला की मोठा दाढीवाला?'

तो पत्रकार त्यांच्या तोंडून चंद्रशेखर यांचं नाव वदवून घ्यायचा नाद सोडून देतो.

श्रीमती इंदिरा गांधी याही आज राष्ट्रपतींना भेटलेल्या असतात. जनसंघ, रा. स्व. संघ नसलेल्या पक्षाला आपला पक्ष पाठिंबा देईल असं श्रीमती गांधींनी सूचित केलेलं असतं.

म्हणजे ज्या राजनारायण यांनी त्यांचा पराभव केला त्यालाच पाठिंबा द्यायला त्या तयार होत्या! ज्या चरणसिंग यांनी त्यांना अटक केली, स्पेशल कोर्टसचा आग्रह धरला त्या चरणसिंग यांच्या पाठीशी त्या उभ्या राहणार होत्या!

हे शक्य नाही आणि राजकीय डावपेचात निष्णात असलेल्या श्रीमती इंदिरा गांधी यांनी पाठिंबा दिला तरी एकाधिकारशाही-विरुद्ध बंडाचं निशाण उभारणारे चरणसिंग– राजनारायण त्यांचा पाठिंबा घेणार नाहीत असं वाटत होतं.

राजकारणात कसलीच नैतिक मूल्यं राहिली नव्हती. सापशिडीचा खेळ चालू होता. तत्त्वं, ध्येयं गुंडाळणाऱ्या मंडळींची शिडीवर चढा-यला रीघ लागली होती. घरभेदे तत्त्वांच्या गप्पा मारीत होते तरी आणीबाणीचं भयंकर काळंकुट्ट पर्व आणणाऱ्या इंदिरा गांधींशी हात-मिळवणी करण्यापर्यंत या लोकांची मजल जाणार नाही अशी आशा वाटत होती.

परंतु राजकारणाचा कॅलिडोस्कोप क्षणाक्षणाला वेगळी चित्राकृती दाखवीत होता– दाखविणार होता...

## एकोणीस जुलै

दिल्ली हे पोस्टर्सचं शहर आहे. इथं नेहमीच 'पोस्टर वॉर' सुरू असते. इंदिरा गांधी यांना ७५ साली अलाहाबाद कोर्टानं दोषी ठरवलं तेव्हा अवघ्या दोन तासांत त्यांना पाठिंबा दर्शवणारी पोस्टर्स यशपाल कपूरनं शहरभर लावली होती. सध्याच्या पेचप्रसंगातही पोस्टर्सचं युद्ध चालू झालेलं होतं. 'महँगाईके जिम्मेवार, दलबदलूके सरदार चरणसिंग नहीं चँदरसिंग' असे एक पोस्टर झळकलं होतं. ही पोस्टर्स जनसंघवाल्यांनी लावली आहेत अशी तक्रार चरणसिंग-गट करत होता तर जगजीवनराम यांच्याविरुद्ध मोठ्या प्रमाणावर पोस्टर्स छापण्याची तयारी चरणसिंगगटानं चालविली आहे असं सांगितलं जात होतं.

जनता पक्षातला पेचप्रसंग आणखीन बिकट बनला होता. मोरारजी देसाई यांनी जयप्रकाश यांना पत्र पाठवून संसदीय पक्षाचं नेतेपद सोडायला आपण का तयार नाही हे कळवलेलं असतं. खरं तर आदल्याच दिवशी दुपारी पंतप्रधानांनी जयप्रकाश नारायण यांच्या पत्राला उत्तर पाठवलेलं आहे अशी बातमी एका वृत्तसंस्थेनं दिली होती; परंतु ती चुकीची आहे असा खुलासा पंतप्रधानांच्या कार्यालयानं केलेला असतो. पंतप्रधानांनी लिहिलेल्या पत्रातली भाषा अत्यंत कडक असते. त्यांनी हे पत्र पाठवू नये असा सल्ला त्यांना ज्येष्ठ सहकाऱ्यांनी दिलेला असतो व त्यामुळं ते पत्र रवाना होत नाही. दुसरं सौम्य भाषेतलं पत्र तयार केलं जातं व ते नंतर पाठविण्यात येतं.

मोरारजीभाई संसदीय नेतेपदावरून खाली उतरायला तयार नाहीत. त्यांचं मन वळवायचा अखेरचा प्रयत्न करावा असं एका बैठकीत ठरतं. मधु दंडवते यांच्या घरी आदल्या दिवशी रात्री एसेम बैठक आयोजित करतात. या बैठकीला एच. एम. पटेल, मोहन धारिया, सुरेंद्र मोहन, सुंदरसिंग भंडारी, लालकृष्ण अडवाणी, ईरा सेझियन, समरेंद्र कुंडू, नानाजी देशमुख, व्ही. रामचंद्रन प्रभृती हजर असतात. नेतेपदासाठी मोरारजी देसाई व जगजीवनराम यांच्यात वाद उत्पन्न झालेला असतो. तेव्हा पक्षात दोघांपैकी कोणाला खासदारांचा जास्त पाठिंबा आहे हे अजमावून पहावं असं सुचवलं जातं. मधु दंडवते यांनी हे काम करावं अशी सूचना केली जाते. मी एकटा हे काम करणार नाही, तिघांचं पॅनेल नेमावं असं ते सुचवतात. त्यानुसार दंडवते, सुंदरसिंग भंडारी व एच. एम. पटेल या तिघांची या काम-गिरीवर नियुक्ती झालेली असते.

जर पेचप्रसंग सुटला नाही व बाबूजी आपल्या पाठिराख्यांना घेऊन बाहेर पडले तर 'सोशल जस्टिस काँग्रेस' अशा नावाचा गट त्यांनी स्थापन करावा अशी कल्पनाही एसेम यांच्या मनात येऊन गेलेली असते; परंतु अखेरच्या क्षणापर्यंत जनता पक्षातील एकी टिकवून ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. दंडवते, पटेल व भंडारी बाबूजी व मोरारजी देसाई यांची भेट घेतात. त्यांना बाबूजींना जास्त पाठिंबा आहे असे आढळून येते; परंतु मोरारजीभाई नेतेपद सोडायला पुन्हा एकवार नकार देतात. बाबूजींना नेता बनू द्यायचं नाही असं त्यांनी ठरवलंय असं सांगितलं जात असतं.

काँग्रेस स्वतःच्या बळावर सरकार स्थापू शकणार नसतं. तेव्हा 'नंबर वन पोझिशन' (पंतप्रधान) काँग्रेसला मिळावी हा अग्रह मागे पडलेला असतो. चरणसिंग यांना काँग्रेस आणि जनता (एस.) गटाचे नेते मानलं जावं असं आता जवळजवळ ठरलेलं असतं.

अकाली दलाचं एक शिष्टमंडळ पाटण्याला जाऊन जयप्रकाश नारायण यांना भेटतं. तेव्हा जयप्रकाश जनता पक्षाला उद्देशून म्हणतात, 'बाग उजड गया' दिल्ली हे वृक्षांचं, उद्यानांचं शहर. झाडं जोपासण्यावर भर परंतु जनता पक्षाच्या वृक्षावर मात्र त्याच्याच फांद्या कुऱ्हाड बनून घाव घालीत असतात. सत्तेच्या बाजारात पक्षाचा लिलाव मांडला जात असतो. दुसऱ्या स्वातंत्र्याचा चमत्कार ज्यांनी घडवून आणला त्या जयप्रकाशांचं कोणीही ऐकत नाही. शारीरिक वेदना भोगणाऱ्या त्या महान नेत्याला हे मानसिक क्लेश सहन करताना किती कष्ट पडत असतील याची कल्पना करवत नाही !

सगळीकडं कसं भकास वाटत असतं. खुर्चीच्या साथीचा रोग सर्व मूल्यांना ग्रासून टाकत असतो. जंतरमंतररोडवरील पहिल्या मजल्यावरचं जनता पक्षाच्या अलिशान कार्यालयातलं चैतन्यच हरवलेलं असतं.

चंद्रशेखर तर अलीकडे कित्येक दिवसांत ऑफिसाकडे फिरकलेलेच नसतात. त्यांच्या घरीच बैठकांची सत्रं झडत असतात. नेहमीप्रमाणं सायंकाळी पत्रकार त्यांच्या घरी दाखल होतात. हिरवळीवरील खुर्च्यांवर स्थानापन्न होतात. राजनारायणप्रमाणे चंद्रशेखरना हल्ली नेताजी म्हणतात. नेताजी आतल्या खोलीत होते. बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर येतात; परंतु पत्रकारांना पाहून पुन्हा आत जातात.

चंद्रशेखर येतात तेव्हा ते काहीसे रागावलेले वाटतात. त्यांच्या बोलण्यातून त्यांचं प्रत्यंतरही येतं. जयप्रकाश यांना पत्र पाठवण्यास भरीला पाडलं याबद्दल ते संतापलेले असतात. पक्षांतर्गत भांडणात त्यांना 'इन्व्हॉल्व' करणं योग्य नाही असं सांगून ते म्हणतात, 'जयप्रकाश यांना असं इन्व्हॉल्व करायला मी नेहमीच नकार दिला आहे. मी जनता पक्षाचा अध्यक्ष होण्यापूर्वीची गोष्ट आहे. मला पक्षाचं अध्यक्ष करावं अशी पत्रं पक्षश्रेष्ठींना जयप्रकाश लिहिणार आहेत अशी मला कुणकुण लागली. मी लागलीच मुंबईत जाऊन जसलोक रुग्णालयात जयप्रकाश यांना भेटलो व त्यांनी असं पत्र लिहू नये असं सांगितलं. तुम्ही सुचवलं व म्हणून मला अध्यक्ष केलं तर तो माझा अपमान होईल आणि तुमचं ऐकलं नाही तर तो तुमचा माझ्यापेक्षाही मोठा अपमान ठरेल ! १९४७ नंतर महात्मा गांधींजींनी आचार्य नरेंद्र देव यांना काँग्रेसचं अध्यक्ष करावं असं पंडित नेहरूंना सुचवलं होतं; परंतु नेहरूंनी देवांना काही अध्यक्ष केलं नाही. तेव्हा तुम्ही गांधीजी असला तरी महात्मा गांधींइतके महान नाही व मी महत्त्वाचा असलो तरी नरेन्द्र देवापेक्षा अधिक महत्त्वाचा नाही. त्यामुळं तुम्ही पत्रं लिहू नका, हे माझं म्हणणं त्यांनी मानलं.

'मोरारजीभाई यांनी स्वतःहोऊन नेतेपद सोडलं असतं तर मी पण नेतेपदाची निवडणूक लढवीन असं काही मित्रांजवळ मी बोललो होतो; परंतु जयप्रकाश यांनी बाबूजींचं नाव सुचवलं असल्यानं मी काही नेतेपदासाठी उभा राहणार नाही.'

मोरारजीभाईंबरोबर अखेरपर्यंत राहणारी जी व्यक्ती असेल ती चंद्रशेखर असेल असं माझं नऊ जुलैला आणि आजही तेच मत आहे.'

चंद्रशेखर यांचा आज वेगळाच अवतार असतो. भडभडा ते बोलत राहतात, – 'मी जयप्रकाश यांच्याशी फोनवर बोलणार नाही. कारण हे सारं ऐकून ते 'इमोशनली डिस्टर्ब होतील !'

मध्येच त्यांचा संताप अनावर होतो. उसळून ते म्हणतात, 'या पेचप्रसंगात मी पक्षाध्यक्ष असल्यानं 'नॉनसेन्स'देखील टॉलरेट करतो; परंतु त्याचा अर्थ मी 'सबमिसिव्ह' आहे असा लावतात ! वाटतं नकोच ही कटकट – फ्री होना अच्छा !'

चंद्रशेखर यांच्याशी घनिष्ठ दोस्ती असलेला एक पत्रकार विचारतो –'कब फ्री होंगे ?'

आज त्याच्यावरही ते उखडतात – 'अकेला फ्री नहीं हूँगा कई लोगोंको फ्री करके मैं फ्री होऊँगा, समझे ?'

'आज आपका मूड बहुत सख्त है !' मी म्हणतो.

'नही भई. मेरा मूड तो फाइन है ! लो 'कम्पा कोला' पिओ' असं ते म्हणतात आणि मग नेहमीप्रमाणे हास्यविनोद सुरू होतो.

अकालीदलाचे ज्येष्ठ नेते जनता पक्षाला पाठिंबा देतात. ते म्हणतात, 'आम्ही जनता पक्षाबरोबरच पोहत राहू अथवा बुडू !'

परंतु पोहणारेच जनता पक्षाला बुडवणारे असतात !

जयप्रकाश नारायण यांच्या पत्रामुळं मोरारजीभाईंवर काही परिणाम झाला नसला तरी माजी जनसंघगटाला त्याचा उपयोग होतो. या पत्राचा आधार ते घेतात. कुशाभाऊ ठाकरे, यज्ञदत्त शर्मा व विजयकुमार मल्होत्रा हे तिघे एक संयुक्त पत्रक काढतात. जयप्रकाशांनी दिलेला सल्ला मानून पंतप्रधानांनी संसदीय जनता पक्षाचं नेतेपद सोडावं व बापूजींना नेतेपद दिलं जावं असं त्यांनी या पत्रकात म्हटलेलं असतं. याचा अर्थ जनसंघगट मोरारजीभाईंना असलेला आपला पाठिंबा काढून घेणार असतो.

कोणाचं सरकार येणार याबद्दल ठामपणं कोणीच काही सांगू शकत नाही. सर्व माजी काँग्रेसजन एकत्र येणार, इंदिरा गांधींना वगळून काँग्रेसवाल्यांची एकजूट होणार व त्यांचं सरकार येणार अशी एक बातमी पसरते. कोणी म्हणतं राष्ट्रपतींना राष्ट्रीय सरकार (नॅशनल गव्हर्नमेन्ट) हवंय. आता मध्यावधी निवडणुकांशिवाय पर्याय नाही असंही म्हटलं जातं. पंतप्रधानपदाची अभिलाषा बाळगणारे आणि सत्ता काबीज करण्यासाठी धडपडणारे ज्योतिषाच्या घरी खेटे घालत असतात; पण त्याचाही उपयोग होत नाही.

सकाळी न्याहारी करताना भेटलेला एक खासदार जनता पक्षाचा असला तरी दुपारच्या जेवणापर्यंत तो जनता पक्षाचाच राहील याची खात्री देता येत नाही. क्षणोक्षणी निष्ठा बदलत असतात.

सबंध देशाचीच दिशा हरवलेली असते.

## वीस जुलै

दिशा हरवल्याची जाणीव कोणालाच नसते. जो तो नेत्याच्या शोधात असतो; परंतु कधी नेता सापडतो; पण पुरेसे पाठीराखे मिळत नाहीत तर कधी पाठीराखे मिळतात; परंतु

नेता सापडत नाही. शोध जारीने सुरू असतो. जनता पक्षातील चिंता आणखीच वाढते. जनता (एस) गटही आज काहीसा नर्व्हस असतो. जनसंघ सदस्यांना जनता पक्षातून काढून टाकलं तर आपण पुन्हा जनता पक्षात सामील व्हावं म्हणजे जगजीवनराम पंतप्रधान बनण्याचा रस्ता बंद होईल असं सुचवलं जातं. त्यासाठी चंद्रशेखर यांची भेट घ्यायची असं ठरतं. राजनारायण यांनी आदल्याच दिवशी रात्री त्यांना फोन करून लगेच, भोजनाला बोलावलेलं असतं; परंतु वेळ नाही असं चंद्रशेखर सांगतात. तेव्हा आज सकाळी चरणसिंग यांच्याकडे न्याहारी व दुपारी राजनारायण यांच्याकडे भोजन असा चंद्रशेखर यांचा कार्यक्रम ठरलेला असतो. हा कार्यक्रम ठरवण्यात कर्पुरी ठाकूर यांचाही पुढाकार असतो.

या दोन्ही बैठकांतून काही निष्पन्न होत नाही. जनसंघवाल्यांना पक्षातून हद्दपार करायला चंद्रशेखर नकार देतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जनसंघ-सदस्यांनी संबंध ठेवावेत की नाही यावर विचार केला जाईल इतकंच आश्वासन चंद्रशेखर देतात. नंतर पत्रकारांनी या भेटीबाबत विचारलेल्या प्रश्नांना चंद्रशेखर उडवाउडवीची उत्तरं देतात. 'राजनारायणने अच्छा मुर्गा खिलाया. दाल भी अच्छी थी!' एवढंच ते सांगतात. त्यांच्या न्याहारी व भोजनकार्यक्रमाची फारच जाहिरात झालेली असते. काही तरी तोडगा निघालाय असं सेंट्रल हॉलमध्ये जो तो म्हणत असतो. सायंकाळी पाच वाजता जनता पक्ष कार्यालयात चंद्रशेखर यांनी पत्रकारपरिषद बोलाविली आहे असा त्याच वेळी निरोप येतो. त्यामुळं तर नक्कीच काही तरी मोठी 'अनाउन्समेन्ट' होणार असं वाटतं. त्यामुळं पत्रकारांची एकच गर्दी लोटते; परंतु ही पत्रकारपरिषद फुसकी निघते.

चंद्रशेखर जाहीर घोषणा करायला तयार नसले तरी दुहेरी निष्ठेचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनं त्यांचे प्रयत्न चालू असतात. सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्याशी ते संपर्क साधून असतात.

आज पंतप्रधान राष्ट्रपतींना भेटणार आहेत अशीही बातमी असते. पत्रकार तिकडं धाव घेतात. तिथं संस्कृत पंडितांना पुरस्कार देण्याचा एक समारंभ असतो व त्याला हजर राहण्यासाठी मोरारजी देसाई आलेले असतात. देसाई व राष्ट्रपती इतक्या सहजतेनं वागत-बोलत असतात की, जणू देशात काही घडलेलंच नाही.

काँग्रेस कार्यकारिणीचे एक सदस्य सी. सुब्रमण्यम यांनी काल केलेल्या एका वक्तव्यामुळं चरणसिंगापुढं नवी अडचण निर्माण झालेली असते. केंद्रात स्थापन करावयाचं संमिश्र मंत्रिमंडळ रा. स्व. संघ किंवा इंदिरा काँग्रेसचे सहकार्य मागणार नाही या सुब्रमण्यम यांच्या निवेदनामुळं इंदिरा काँग्रेसचे नेते चिडलेले असतात. जनसंघ व इंदिरा काँग्रेस यांच्या १६० खासदारांना बाजूला ठेवून सरकार बनावणं चरणसिंग यांना शक्य नसतं. जनसंघाच्या पाठिंब्याचा प्रश्नच नसतो. तेव्हा इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा चरणसिंगांना घ्यावा लागणार असतो. अशा वेळी त्यांना नाराज करणं हे परवडणारं नसतं.

स्पेशल कोर्टस रद्द करावीत, शहा आयोगांपुढं ज्यांनी साक्षी दिल्या त्यांना मंत्रिमंडळात घेता कामा नये, चव्हाण यांना मंत्रिमंडळात घेणार असाल तर आम्हाला आमच्या पाठिंब्याचा फेरविचार करावा लागेल अशा अटी इंदिरा काँग्रेसतर्फे सांगितल्या जात असतात. यशवंतराव चव्हाण यांनी स्वतः होऊन १२ विलिंग्डन क्रेसेण्ट या श्रीमती इंदिरा गांधींच्या निवासस्थानी जाऊन इंदिरा काँग्रेसचं सहकार्य मागावं तरच आम्ही ते देऊ असं इंदिरा काँग्रेसचे पुढारी बोलत असतात; परंतु इंदिरा गांधींकडं आपण मदत मागायला जाणार नाही असं चव्हाणांनी ठरवलेलं असतं. काँग्रेसच्या वतीनं वसंतराव नाईक मात्र इंदिरा गांधींना भेटून आलेले असतात.

खासदार फोडण्यापूर्वी भ्रष्टाचारी मार्गाचाही वापर केला जात असावा असं बोललं जात असतं. एका खासदाराच्या घरासमोर काल रात्री एकदम आठ-दहा मोटारी येऊन दाखल झाल्या. मोटारीतून आलेल्या राजकीय पुढाऱ्यांनी त्या खासदाराला आपल्या गटात सामील होण्याची फार गळ घातली. 'तुला मंत्री बनवू!' असंही सांगितलं; परंतु त्यानं नकार दिला असं दुसरा एक खासदार सांगतो.

गोंधळ इतका असतो की पत्रकारांचीही तारांबळ उडते. कसलाच अंदाज बांधता येत नाही. आज जगजीवनराम यांचं पारडं जड अशी बातमी दिली तर दुसऱ्या दिवशी चरणसिंग यांचे पारडे जड अशी बातमी द्यायची पाळी येते. कारण परिस्थिती क्षणाक्षणाला बदलत असते. अमेरिकेतील एका वर्तमानपत्राच्या भारतातील प्रतिनिधीला त्याच्या वृत्तपत्राकडून केबल आली– 'तुम्ही उलट-सुलट बातम्या देता आहात! तुम्हाला भारतातलं राजकारणच कळत नाही!' त्या पत्रकारानं कपाळावर हात मारून घेतला!

पंतप्रधान होणाऱ्या व्यक्तीची सर्व माहिती आधीच तयार करून ठेवावी म्हणून वृत्तसंस्था, वृत्तपत्रं प्रयत्न करतात. परंतु राजकीय चित्र स्पष्ट नसल्यानं किती जणांची माहिती तयार करून ठेवणार असा प्रश्न पडतो. तेव्हा एक संपादक म्हणतात, 'राजकीय बायोडेटापेक्षा राजकीय 'ऑबिचरीज्' जास्त तयार करून ठेवणं आवश्यक आहे!'

जनता पक्षाच्या दृष्टीनं आज एकच उत्साहजनक वृत्त मिळतं. संसदीय जनता पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक येत्या रविवारी (२२ जुलै) भरवण्यास व त्यापुढं आपली बाजू मांडण्यास मोरारजी देसाई तयार होतात. त्यामुळ मोरारजीभाई नेतेपदी राहण्याचा आग्रह सोडून देतील अशी आशा वाटू लागते. मधु दंडवते पत्रकारांना सांगतात. 'सध्याच्या केअरटेकर सरकारएवजी केअरफुल सरकार देण्याच्या दृष्टीनं आमचे प्रयत्न चालू आहेत.'

ही लढाई चालू असते; परंतु ती हरण्यासाठीच.

## एकवीस जुलै

आज बातम्यांचं केंद्र काँग्रेस पक्ष असतो. यशवंतराव चव्हाण सरकार बनवायला असमर्थ असतात हे सत्य असतं. पत्रकारपरिषद घेऊन ते सांगितलं जाणार असतं इतकंच. रायसीना रोडवरील काँग्रेस पक्ष कार्यालयातील ज्या दालनात स्वर्णसिंग नेहमी पत्रकारांना भेटतात ते दालन छोटसं असतं. काँग्रेस ऐक्याच्या हालचाली चालू होत्या तेव्हा देखील नव्हती इतकी आज गर्दी होते.

टी. व्ही. रेडिओ आणि वृत्तपत्रांचे प्रतिनिधी यांचे थवेच्या थवे जमतात. फुटपाथवर, हिरवळीवर, पोर्चमध्ये आणि आतल्या दालनात पत्रकार स्वर्णसिंग यांची प्रतीक्षा करत असतात. ठरलेल्या वेळेपेक्षा स्वर्णसिंग पाऊण तास उशिरा येतात. पत्रकारपरिषद कुठं घ्यायची याबद्दल चर्चा होते. दालनात सर्व पत्रकार मावणं शक्यच नसतं. तेव्हा पोर्चात पत्रकारपरिषद घ्यायचं ठरतं. कोणी तरी एक खुर्ची आणून ठेवतं. अक्षरशः धक्काबुक्की करत स्वर्णसिंग यांना खुर्चीपर्यंत पोचावं लागतं. कारण चहूबाजूंनी पत्रकारांनी खुर्चीला गराडा घातलेला असतो.

कोठलीही साधी आणि सोपी गोष्ट कमालीची गुंतागुंतीची करून सांगण्यात स्वर्णसिंग यांचा हातखंडा असतो. काही वेळेला ते असंच करतात. चव्हाण सरकार बनवायला असमर्थ असतात आणि त्यांनी चरणसिंग गटाला पाठिंबा देण्याचं ठरवलेलं असतं; परंतु हा निर्णय स्वर्णसिंग किचकट करून सांगतात. ते म्हणतात, 'सरकार बनविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व नव्याने उदयाला आलेल्या गटाला पाठिंबा देण्याचा निर्णय काँग्रेस संसदीय मंडळानं घेतला आहे.'

या गटाचं जनता (एस.) हे नाव ते घेत नाहीत. तसंच विचारलं तेव्हाच या गटाचे नेते चरणसिंग आहेत असं ते सांगतात.

यशवंतराव चव्हाण स्वतः सरकार बनवायला असमर्थ आहेत असं ते सांगत नाहीत. त्यांना खोदून खोदून विचारलं तरी ते उत्तर देत नाहीत. चरणसिंग यांना आमचा काँग्रेस पक्ष पाठिंबा देईल असंच ते वारंवार सांगत राहतात. 'मी ज्या प्रश्नाचं उत्तर देणार नाही तो प्रश्न विचारता कशाला?' असं सुनावून ते पत्रकारपरिषद आटोपती घेतात.

जनता पक्षात नेतेपदाची परिस्थिती 'जैसे थे' असते. मधु लिमये मोरारजीभाईंची तासभर भेट घेतात. चंद्रशेखर यांच्याशी चर्चा करतात. जनसंघाशी जनता पक्षानं काडीमोड घ्यावा, जनता पक्षाची राष्ट्रीय कार्यकारिणी बरखास्त करून नवी कार्यकारिणी निवडावी आदि सूचना असलेली एक योजना मधु लिमये यांनी तयार केलेली असते. कर्पूरी ठाकूर यांनी या योजनेला संमतीही दिलेली असते. चंद्रशेखर या योजनेबाबत चर्चा करतात. 'तुम्ही परत जनता पक्षाचे चिटणीस व्हाल का?' असा प्रश्न चंद्रशेखर लिमयांना विचारतात. तेव्हा लिमये 'मीच काय, माझ्याबरोबर रवी रे यांनाही मी चिटणीस होण्यासाठी राजी करीन' असं आश्वासन देतात; परंतु ही योजना बारगळते.

सेंट्रल हॉलमध्ये त्रैराशिकं मांडण्याचा उद्योग चालूच असतो. मोरारजीभाईंचे पाठीराखे आमची संख्या २७० होणार असा दावा करत असतात तर चरणसिंगांचे चाहते आमच्या सदस्यांची संख्या तीनशेवर जाणार असं म्हणत असतात. जो तो वेगवेगळे दावे करत असतो. ते सर्वच खरे मानले तर लोकसभेची सध्याची सदस्यसंख्या ५३८ ऐवजी एक हजार मानावी लागेल असं एक खासदार म्हणतो. आकड्यांचं हे क्षणोक्षणी बदलणारं गणित लक्षात रहावं म्हणून दुसऱ्या एका खासदारानं चक्क मिनी कॅलक्युलेटर आणलेला असतो. त्याला एकजण विचारतो, 'या कॅल्क्युलेटरवर पाठिंबा देणाऱ्यांची नावं व चेहरा दिसतो का हो?'

चेहरे दिसले तरी काही उपयोग होणार नसतो. कारण राजकारणातील व्यक्तींचे चेहरे व त्यांचं बोलणं किती नकली असतं याचा क्षणोक्षणी प्रत्यय येत असतो. हे सारं उबग आणणारं असतं. इंदिरा गांधी यांच्या पुनरागमनाची चाहूल लागते. जॉर्ज फर्नांडिस यांनी पूर्वी लंडन इथं भाषण करताना : राजकीय नेता हा संपलाय असं कधी समजू नये. त्याला पुरल्याशिवाय आणि पुरलेली व्यक्ती तीच होती ना अशी खात्री झाल्याविना राजकीय नेता संपला आहे असं मानू नये.' असं सांगितलेलं असतं. त्याची सत्यता पटते. फरक एवढाच की ज्या एकाधिकारशाहीविरुद्ध प्राणपणाला लावून फर्नांडिस यांनी झुंज दिली त्याच एकाधिकारशाहीचं स्वागत करायला तुतारी घेऊन पुढं धावणाऱ्यात फर्नांडिस हेच अग्रेसर असतात!

हजारो कामगारांच्या गळ्यातला ताईत असलेले, अंगी कमालीची धडाडी असलेले, बड्या उद्योगपतींना 'रॅटस' म्हणून खडसावणारे जॉर्ज फर्नांडिस अगदी शरण आल्यासारखे वागत असतात. माझा एक मित्र म्हणतो, 'फर्नांडिस यांनी गेल्या पंधरा दिवसांत सर्व चुकीचे निर्णय योग्य वेळी घेतले!'

त्या दिवशी घरी परतताना एक रिक्षावाला म्हणतो, 'मोरारजीभाई आदमी बुरा नहीं है, उसका लक बुरा है।'

'इंदिरा गांधी?'

'संजयको नहीं छोडती ना वो!'

## बावीस जुलै

ठरल्याप्रमाणंच सारं घडत असतं. यशवंतराव चव्हाण राष्ट्रपतींना भेटतात आणि आपण सरकार बनवायला असमर्थ आहोत अशा आशयाचं पत्र त्यांना देतात. आपल्या पत्रात ते चरणसिंग यांचा उल्लेख करत नाहीत. सरकार बनवू शकेल असा विविध पक्ष व गटांचं एक नवं 'कॉम्बिनेशन' तयार झालेलं आहे एवढंच त्यांनी म्हटलेलं असतं.

तिकडे जनता पक्षात तात्पुरता समेट झालेला असतो. आज जनता संसदीय पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत बाबू जगजीवनराम यांनी 'हम दोनो (बाबूजी व मोरारजी देसाई) एक हैं, और सब साथ रहेंगे' असे जाहीर करून टाकलेलं असतं. कुंवर महमूद अली यांनी 'सारी पार्टी आप दोनोंके साथ है' असं सर्वांच्या वतीनं आश्वासन दिलेलं असतं.

चंद्रशेखर मी नेतेपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात नाही असं म्हणत असले तरी त्यांनी तो विचार पूर्णतः सोडलेला नसतो. ते संसदीय जनता पक्षनेतेपदासाठी उभे राहिले तर ते निवडून येण्याची शक्यता अधिक असते. त्याशिवाय मोरारजीभाई हेच नेतेपदी राहण्याची शक्यता असते. कारण मोरारजीभाईंनी नेतेपदाचा राजिनामा द्यावा असं माजी जनसंघनेत्यांनी सुचवलं असलं तरी पक्षाच्या बैठकीत मोरारजीभाईंविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला तर मतदान करायचं नाही असं त्यांनी ठरवलेलं असतं. तेव्हा मोरारजीभाई दूर होऊन त्या जागी आपली निवड होण्याची शक्यता कमी हे बाबूजींना उमगलेलं असतं आणि म्हणूनच ते मोरारजीभाईंशी जुळवून घेतात.

दरम्यान चरणसिंग यांना इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा घ्यावा लागणार हे उघड असतं. चरणसिंग यांनी स्वतः इंदिरा गांधींची भेट घेऊन पाठिंबा देण्याची विनंती करावी अशी इंदिरा काँग्रेस नेत्यांची मागणी असते. राजनारायण श्रीमती गांधींना भेटलेले असतात; परंतु चरणसिंग यांनी स्वतः आपल्यापुढं येऊन हात पसरावा असा श्रीमती गांधींचा आग्रह असतो. 'मी तुमच्याकडं आलो तर किती वाईट दिसेल. लोक काय म्हणतील? तेव्हा एवढा हट्ट सोडा!' अशी चरणसिंग काकुळतीनं विनंती करतात.

हे सारं बघून शिसारी येते. चरणसिंग यांच्या बंगल्याच्या परिसरात चिमण्यांचा चिवचिवाट ऐकू येत असतो. बंगल्यात क्षणाक्षणाला मोटारींची वर्दळ असते. त्यांच्या आवाजानं बिचाऱ्या चिमण्या भेदरून गलेल्या असतात.

बंगल्यात सत्ता मिळविण्यासाठी चाललेला तत्त्वांचा होम मनाला हादरवून टाकत असतो.

## तेवीस जुलै

राजधानीत पावसाचा पत्ता नसतो. हवा एकदम बदललेली असते. उष्मा वाढतो. आकाशात ढगांची पुसटशी खूणही दिसत नाही. सारं कसं शांत शांत असतं. वाराही स्तब्ध असतो. झाडंही स्थिर असतात. त्यांची पानं हलतडुलत नाहीत. यमुनेच्या पात्रात असलेलं थोडंसं पाणीही खळखळाट करत नाही. तेही चूप असतं. बदलत असतं ते राजकारण आणि माणसं. आज राजकीय घडामोडींना अचानक वेग येतो.

राष्ट्रपतींनी जनता पक्षाचे नेते मोरारजी देसाई व जनता (एस) चे नेते चरणसिंग या दोघांनाही पत्रं पाठवून तुमच्या पाठीराख्यांच्या याद्या सादर करा असं सांगितलेलं असतं.

त्यासाठी फक्त अठ्ठेचाळीस तासांची मुदत दिलेली असते. ही पळापळ सुरू होते. राजनारायण यांचं 'सत्ता भरती केंद्र' वेगानं कामाला लागतं. जनता पक्षाची सारी धडपड गळती थांबविण्याकडं असते.

एका बाजूला चरणसिंग इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा मिळवण्याच्या प्रयत्नात गुंतलेले तर दुसऱ्या बाजूला ज्या रा. स्व. संघाच्या प्रश्नावर जनता (एस) चे नेते पक्षातून बाहेर पडले त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी चंद्रशेखर यांची धावपळ चाललेली. आदल्या दिवशी मद्रासहून परतताना वाटेत नागपूर इथं सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांना चंद्रशेखर भेटून आलेले. संघाचे सरचिटणीस राजेंद्रसिंग (राजूभैया), बाळासाहेब देवरस यांचे बंधू भाऊराव देवरस यांनी पंतप्रधानांची भेट घेतलेली. त्यांचं पंतप्रधानांनी चांगलंच 'बौद्धिक' घेतलं !

चंद्रशेखर यांचा मूड न बदललेला. सारं कसं आलबेल आहे असं ते संसदीय जनता पक्ष कार्यकारिणीच्या बैठकीनंतर पत्रकारांना सांगतात. बाबूजी व मोरारजी यांची दिलजमाई झाली का? की दोन-दोन पंतप्रधान होणार? या प्रश्नावर चंद्रशेखर उत्तरतात, 'छे छे ! असं काही असेल तर मग पंतप्रधानपदावरचा माझा हक्क गमावण्याची माझी तयारी नाही !'

चरणसिंग व इंदिरा काँग्रेस यांचं सख्य जमतं. किसान मेळाव्यात इंदिरा गांधींनी चरणसिंग यांना पाठविलेल्या फुलांची परतफेड होते. चरणसिंग श्रीमती इंदिरा गांधींच्या घरी जात नाहीत; पण त्यांना दोन पत्रं लिहितात. त्यांच्याशी फोनवरून बोलतात. 'घरी यायचा आग्रह कृपया करू नका. तुम्ही माझ्या बहिणीसारख्या आहात.' असं चरणसिंग त्यांना म्हणतात. राजनारायण, एस्. एन. मिश्रा व बिहारचे मुख्यमंत्री बनारसीदास हे कमलापती त्रिपाठी, सी. एम. स्टीफन प्रभृती इंदिरा काँग्रेस नेत्यांना भेटतात व त्यांनी पाठिंबा द्यावा अशी विनंती करतात.

काँग्रेसनं पाठिंबा दिलेलाच असतो व इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा मिळालेलाच असतो. त्यामुळं चरणसिंग यांचे चान्सेस वाढलेले असतात. त्यांच्या बारा तुघलक रोड या निवासस्थानापासून एक सफदरजंग रोड (पंतप्रधानांचे निवासस्थान) पर्यंतच्या प्रवासाला सुरुवात झालेली असते.

संध्याकाळी राजनारायण यांची त्यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद असते. हसत, खेळत, जल्लोषाने गाजत, वाजत, मिरवत, लाचारीच्या पालखीत इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा आणण्याचा सोहळा तिथं सुरू असतो. काँग्रेसचे नेते उन्नीकृष्णन, सौगतरॉय, रफिक झकेरिया आलेले असतात. राजनारायण त्यांना पत्रकारपरिषदेत आग्रहानं बसवून घेतात. राजनारायण यांच्या खुर्चीच्या हातावर सौगत रॉय बसतात, झकेरिया मागे उभे राहतात. ज्यांच्याबरोबर कालपरवापर्यंत झुंज दिली त्यांना राजनारायण आज मिठ्या मारत असतात. काँग्रेसची स्तुती करत असतात.

राजनारायण यांच्या घरातील ज्या दालनात पत्रकारपरिषद चालू असते तेथेच काँग्रेसवर टीका करणारं एक जुनं पोस्टर असतं. त्यावर लिहिलेलं असतं–

'कांग्रेसी राजके कूडेको साफ करने और संपूर्ण क्रांतीकी दिशामें एक और कदम उठानेके लिए विधान सभाके चुनावमें जनता पार्टीको बहुमतसे जिताएं–' राजनारायण.

एके काळी काँग्रेसला 'कचरा' म्हणणाऱ्या राजनारायण यांनी आज त्या 'कचऱ्याला'च जवळ केलेलं असतं.

राजनारायण त्या दिवशी कमालच करतात. इंदिरा काँग्रेसची ते बेफाट स्तुती करतात.

'तुम्ही एकाधिकार प्रवृत्तींचा पाठिंबा कसा घेत आहात?' एक पत्रकार विचारतो.

'ते पाठिंबा देत असतील तर तो कशाला नाकारायचा? कोणाचं कोणाशी पटेल हे सांगता येतं का? माझं माझ्या पक्षातील काही जणांशी जेवढं पटतं त्यापेक्षा किती तरी अधिक या उन्नीकृष्णन यांच्याशी पटतं!' असं म्हणून ते उन्नीकृष्णन यांच्या पाठीवर थाप मारतात.

आमच्यासारख्या लोकशाहीवादी प्रवृत्तींना एकाधिकारवादी प्रवृत्तीही पाठिंबा देत आहेत हा लोकशाही शक्तींचा विजय आहे, असं अजब तर्कशास्त्रही ते ऐकवतात !

'जिस तरीकेसे मुरारजी देसाईने चौधरी चरणसिंग और मुझको निकाला था उससे बढकर डिक्टेटरशिपका क्या उदाहरण हो सकता है?' असं सांगून राजनारायण पुढं म्हणतात, 'मुरारजी देसाई इमर्जन्सी का बाप है।'

इंदिरा गांधी कम्युनल नाहीत. असं सांगून ते म्हणतात– 'इंदिरा गांधीको इस वक्त प्राइम मिनिस्टर नहीं बनना है, उनको हमने सलाह दी है और वो यदी उसको मानेंगी तो भगवान जाने क्या होगा।'

ज्या राजनारायण यांनी इंदिरा गांधींना शिव्यांची लाखोली वाहिली, त्या पंतप्रधान असताना त्यांच्या निवडणुकीला हरकत घेणारा दावा लावला, नंतरच्या निवडणुकीत त्यांचा पराभव केला तेच राजनारायण आज सत्तेच्या दोन तुकड्यांसाठी श्रीमती गांधींची मुक्तकंठानं स्तुती करत होते.

या साऱ्या राजकीय लाचारीची भयंकर किळस येत होती. सर्वत्र राजकीय कॅबेरेच चालू होता. लोकशाहीच्या कल्पनेवरचा विश्वास उध्वस्त होत होता. गेल्या निवडणुकीत कशासाठी आपण जनता पक्षाला निवडून दिलं असा विचार मनात डोकावत होता. नागड्या राजकारणाचं भयकारी दर्शन सुन्न बनवत होतं, बधिर करून टाकत होतं. सत्तेचा कैफ सोडा, त्याच्या नुसत्या वासानंच मंडळी बेहोष झाली होती. आपण कोठल्या मूल्यांचा सौदा करतो आहो याचं त्यांना भान नव्हतं.

## चोवीस जुलै

मोरारजी देसाई यांच्या जनता पक्षानं लढाई हरली आहे याचा अंदाज येऊ लागलेला असतो. इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा चरणसिंग यांनी घेतला याबद्दल काँग्रेसमधील दक्षिणेकडील राज्यांतील अनेक खासदार नाराज झालेले असून ते बंड करणार अशी बातमी असते. अशा खासदारांची संख्या ३५ आहे असं सुरुवातीला बोललं जात असतं; पण नंतर ती २८ आहे असा दावा केला जातो प्रत्यक्षात दुसऱ्या दिवशी सूर्यनारायण राव, देवव्रत बारुआ. अल्गेसन आदि फक्त पाच खासदारांनीच आपला चरणसिंग–काँग्रेस–इंदिरा काँग्रेस युतीला पाठिंबा नाही असं लिहून दिलेलं असतं.

खासदार व आमदारांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यात भाग घेऊ नये या सूचनेचा विचार करण्याची आमची तयारी आहे; परंतु त्यासाठी संघाच्या घटनेत बदल करावा लागेल. तेव्हा संघाच्या प्रतिनिधिसभेपुढं ही सूचना मांडली जाईल असं राजेंद्रसिंग जाहीर करतात; परंतु हे पत्रक फार उशिरा निघालेलं असतं. अवघा एक दिवस उरलेला असतो. तेव्हा केवळ आपलं संख्याबळ वाढावं म्हणून उशिरा सुचलेला हा उपाय असतो हे स्पष्ट होतं. ही घोषणा व त्याबरोबर चंद्रशेखर यांचं पक्षात परत येण्याचं आवाहन याला यत्किंचितही प्रतिसाद मिळत नाही.

खेळ संपायला आलेला असतो. आम्हीच सरकार बनवू शकू असं जनता पक्षाचे नेते म्हणत असले तरी त्यांचा आत्मविश्वासही ढळू लागलेला असतो.

एसेम पाटण्याला जाऊन जयप्रकाश नारायण यांना भेटून आलेले असतात. जयप्रकाशांची प्रकृती पुन्हा बिघडलेली असते. त्यांना मुंबईला न्यावं लागणार की काय, असं वाटत असतं. जयप्रकाश मुंबईला जायला तयार नसतात. 'गंगाके गोदमें आये हैं, अभी नहीं जायेंगे।' असं त्यांनी एसेमना सांगितलेलं असतं. 'दिल्लीत काय परिस्थिती आहे?' असं ते विचारतात तेव्हा एसेम त्यांना म्हणतात, 'फिफ्टी–फिफ्टी चान्सेस आहेत.'

चरणसिंगांचा जोर वाढत असतो. खरं तर सगळा सत्तास्पर्धेचा तराजू इंदिरा गांधींच्या हातात असतो.

घरी परतताना रिक्षावाला म्हणतो, 'साब, इंदिराजी आयेंगी तो हम इंग्लिस की (विदेशी दारू) पार्टी करेंगे!'

## पंचवीस जुलै

आजचा दिवस निर्णायक असतो. अठ्ठेचाळीस तासांची मुदत संपते. चरणसिंग व मोरारजी देसाई या दोघांनी आपापल्या याद्या राष्ट्रपतींना सादर केलेल्या असतात. दोन्हीही याद्यांत २७९ नावं असतात! याचा अर्थ एकूण ५५८ नावं असतात. लोकसभेची सदस्यसंख्या ५३८ असते. याचा अर्थ २० जणांची नावं दोन्ही याद्यांत जास्त असतात. त्याशिवाय तटस्थ राहणाऱ्या गटांची संख्या लक्षात घेतली तरी एकूण ५० नावं दोन्ही याद्यांत आहेत असा अर्थ होतो.

अनिश्चितता शिगेला पोहोचलेली. सेंट्रल हॉलमध्ये सायंकाळी जनता संसदीय पक्षाची बैठक होते. ती संपल्यावर चंद्रशेखर भेटतात. आज ते जास्त बोलत नाहीत. त्यांच्याशी झालेला तुटक संवाद असा होता–

'क्या हुवा?'
'मीटिंग!'
'मीटिंगमें क्या हुआ?'
'भाषन!'
'किसने किया?'
'नेताओंने!'
'क्या कहा?'
'पार्लमेन्टरी पार्टीके सेक्रेटरीको पूछिये!'

–अनिश्चितता शिगेला पोचलेली. राष्ट्रपती कोणाला सरकार स्थापन करायला बोलावणार याकडे साऱ्या देशाचं लक्ष लागून राहिलेलं असतं.

## सव्वीस जुलै

बरोबर चार वाजता चरणसिंग यांच्या घरचा फोन वाजू लागतो. राष्ट्रपतिभवनातून फोन आलेला असतो. राष्ट्रपतींनी त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण केलेलं असतं. चरणसिंग त्याच क्षणी आपल्या कुटुंबियांना बातमी सांगत नाहीत; पण थोड्याच वेळात बातमी सर्वत्र पसरते व चाहत्यांचे घोळके चरणसिंगांच्या घराकडं येऊ लागतात. जल्लोषाचा अखंड सोहळा सुरू होतो. साडे-पाच वाजता नियोजित पंतप्रधान राष्ट्रपतींकडे जातात. पत्रकारांची अलोट गर्दी झालेली. राष्ट्रपती चरणसिंग यांना पत्र देतानाच क्षण टिपण्यासाठी छायाचित्रकार पुढे सरसावतात; परंतु पत्राचा पत्ताच नसतो. गडबडीत राष्ट्रपती पत्र आणायलाच विसरलेले असतात. राष्ट्रपतींचे सचिव ते पत्र शोधून घेऊन येतात आणि पाच वाजून सदतीस मिनिटांनी राष्ट्रपती चरणसिंगांच्या हवाली पत्र करतात.

चरणसिंग यांच्या घरापुढं प्रचंड गर्दी होते. बंगल्यात आणि बंगल्याबाहेर माणसांचा सागरच असतो. चरणसिंग आपल्या चाहत्यां-समोर भाषण करतात. लाडू, मिठाई, गूळ वाटला जात असतो. आयाराम-गयारामांचा विजय झालेला असतो. आपली जीवनातली महत्त्वाकांक्षा सफल झालेली आहे असे चरणसिंग सांगत असतात; परंतु इंदिरा काँग्रेसशी अपवित्र युती करून ती साध्य झाल्याचं ते बोलत नाहीत.

सत्तेची नशा वातावरणात भरून जाते. कोलाहल व गजबजाट इतका वाढतो की, निष्पाप चिमण्यांचा चिवचिवाट कोठल्या कुठं विरून जातो!

रात्री आठच्या सुमाराला एक छोटा मोर्चा चरणसिंग यांच्या घराकडं निघालेला असतो ते घोषणा देत असतात–

'चरणसिंगने लायी आँधी,
देशकी नेता इंदिरा गांधी!'

सर्वांच्या मनात असलेली भावनाच या घोषणेच्या रूपानं साकार झालेली असते.

पक्ष फोडणारे विजयी झालेले असतात. एक अनिश्चितता संपलेली असते. भविष्य या अनिश्चिततेपेक्षाही अस्थिर असतं, अंधारमय असतं.

त्या अंधाराच्या भावनेनं शांत असलेल्या यमुनेचंही पाणी थरारतं, आज लाल किल्लाही अवाक झालेला असतो. □

# चित्रपटाबाहेर....

ऋषी–नीतूचा साखरपुडा झाला आणि गेली तीन वर्षं चालू असलेल्या प्रेमप्रकरणावर कायमचं सील बसलं; पण एक आठवड्यापूर्वी गोष्टी काही सरळ दिसत नव्हत्या. 'झूठा कहीं का 'च्या प्रिमिअरला नीतू आली ती खाली मान घालूनच. ( उजव्या पायाच्या डाव्या अंगठ्याने जमीन उकरत वगैरे.) ती बरीच मूडऑफ दिसत होती. थोड्या वेळाने डब्बूचा हात धरून ऋषीही आला. शोनंतर झालेल्या पार्टीमध्येही दोघं जणं फारसा इंटरेस्ट दाखवीत नव्हती. इतर मंडळींची खात्रीच पटू लागली की, आज निश्चितच काही तरी घोळ आहे; पण पार्टी संपली आणि ऋषी–नीतू एकत्रच गाडीतून निघून गेले. या प्रेमिकांना भोवताली जमाना पाहिला की, एकदम नर्व्हसच व्हायला होतं की काय कोण जाणे ! *

लायन्स क्लबतर्फे अमिताभला 'उत्कृष्ट अभिनेता ' म्हणून पारितोषिक देण्यात आलं त्या वेळी तो आजारी असल्याने जयानेच ते जाऊन घेतलं. पांढऱ्याशुभ्र साडीतली जया अजूनही अतिशय मोहक दिसते. तिच्याबरोबरच तिच्या सासुबाई तेजी बच्चनही होत्या. जया हॉलमध्ये शिरल्याबरोबरच जमलेल्या रसिकांनी तिचं उभं राहून टाळ्या वाजवून जे स्वागत केलं त्यावरून खरोखरच अशी शंका यायला लागली की, अमिताभ हा अमिताभ बच्चन म्हणून इतका लोकप्रिय आहे की, 'गुड्डी ' जयाचा पती म्हणून ? *

आत नेमकं काय चाललंय याची निश्चित माहिती करून न घेता जर तुम्ही मेहबूब स्टुडिओच्या रेकॉर्डिंग रूममध्ये शिरला असता तर आतमध्ये एखाद्या तमाशाचीच रंगीत तालीम चालू आहे असं वाटलं असतं. आतमध्ये सर्व वाद्यवृंदाच्या साथीत माधुरी पुरंदरे लावणी म्हणत बसली होती. या लावणीचे नुसते शब्द जरी ऐकले असते तरी तुम्ही गुलाबी (की जांभळे ? ) होऊन गेला असता !

फिल्म फायनान्स कार्पोरेशनने आर्थिक सहाय्य दिलेल्या 'संकेत ' या रंगीत चित्रपटासाठी हे चाललं होतं. महाराष्ट्रातल्या एका खेडेगावात घडलेल्या प्रसंगावर हा चित्रपट आधारित आहे– एका माणसाला म्हणे त्याने गुन्हा केला नसतानाच शिक्षा ठोठावली जाते !

नसिरुद्दीन शाह, स्मिता पाटील, ओम पुरी, अमरीष पुरी इत्यादी बडी बडी मंडळी काम करत असलेल्या या चित्रपटाचं दिग्दर्शन इतकी वर्षं श्याम बेनेगलकडे कॅमेरामन म्हणून काम केलेले गोविंद निहालनी करत आहेत आणि संगीतकार आहेत ए. एस. वर्मन !

'भूमिका ' फेम स्मिता पाटीलही या सिनेमात चमकणार आहे. *

परवा सहज 'तुम एक पैसा दोगे, वो दस लाख देगा. ' हे गाणं गुणगुणत होतो आणि एकदम गाण्याचा संगीतकार रवीची आठवण झाली. कारण या गाण्याची निर्मितीही मनोरंजक आहे.

त्या वेळी रवी एवढा नावारूपाला तर आला नव्हताच; पण बिचाऱ्याला दोन वेळच्या जेवणाचीही काही वेळा भ्रांत असायची, एकदा तो असाच रस्त्याने चालला होता. बरंच अंतर जायचं होतं. तेव्हा रवीने विचार केला की, ट्रामनेच जावं. म्हणून खिशात हात घातला तर खिशात तीन पैसे– आणि ट्रामचं भाडं होतं चार पैसे. मनातला बेत मनातच जिरला. रवी पुन्हा चालायला लागला. चालता चालता तो स्वतःशीच म्हणायला लागला– 'बाबा एक पैसा दे दे ..' नंतर त्याने ही घटना देवेंद्र गोएलला सांगितली आणि गोएलने लगेच आपल्या फिल्ममध्ये गाणं घालून टाकलं. *

मुंबईच्या फिल्म इंडस्ट्रीमध्ये निर्माते आणि दिग्दर्शक यांच्यातील वाद विकोपाला जायला लागले आहेत. 'खुदा गवाह ' सुभाष देसाईच्या फिल्मचं दिग्दर्शन सुरेंद्र मोहन करत होता व सहा-सात रिळं पूर्णदेखील झाली होती; पण या निर्माता–दिग्दर्शकांमध्ये काही तरी बोलाचाली झाली आणि सुरेंद्र मोहनला काढून टाकून सुभाष देसाईने स्वतःच दिग्दर्शनाचं काम हाती घेतलं आहे. दुलाल गुहा विनोद आणि हरीष शाहच्या 'धन–दौलत 'चं दिग्दर्शन करत होता; पण या दोघांनी आता त्याला दाराची वाट दाखवली आहे आणि हरीष शाह स्वतःच दिग्दर्शनाची सूत्रं सांभाळत आहे. रवी आनंदच्या 'सुलतान 'चं दिग्दर्शन रवी टंडनवर सोपवण्यात आलं होतं; पण आता त्याला डच्चू देण्यात आला असून रवी आनंदचा भाऊ मुकुल आनंद या चित्रपटाचं दिग्दर्शन करत आहे.

या चकमकी घडण्याचं मुख्य कारण निर्मात्यांचे 'चमचे ' असल्याचं सांगण्यात येतं. कोणताही दिग्दर्शक स्वतःच्या बुद्धीने काही करू लागला की हे चमचे त्याच्याबद्दल काही तरी खुसपट काढून तो निर्मात्याला डावलत असल्याचा ओरडा सुरू करतात. हिंदी चित्रपटाच्या निर्मात्याचा अहंकार दुखावला जायला एवढं निमित्त पुरतं. दिग्दर्शकही माघार घ्यायला तयार नसतो आणि त्यातूनच ही चकमकींची मालिका सुरू झाली आहे. *

'मुकद्दरका सिकंदर 'चा निर्माता प्रकाश मेहराने हा चित्रपट तयार होत असताना कामगारांना जेव्हा पगारवाटप केलं त्या पगाराबरोबर त्यानं प्रत्येकाला लॉटरीचं एकेक तिकिटही भेट दिलं. या कामगारांपैकी एकाचं भाग्य खुललं आणि त्याच्या तिकिटाचा नंबर लागून त्याला सात लाख रुपये मिळाले. प्रकाश मेहरानं लगेच त्या कामगाराला गाठलं आणि 'मुकद्दरका सिकंदर 'चे आसाम राज्यातील वितरणाचे हक्क त्याला सात लाख रुपयांना विकण्याची तयारी दाखवली. कामगारानं हे हक्क विकत घेऊन टाकले. सध्या 'मुकद्दरका सिकंदर ' आसाममध्ये अतिशय हीट चालला असून त्या कामगारानं लॉटरीच्या पैशाच्या दुप्पट–तिप्पट पैसा मिळवला आहे.

